पुणे, सोमवार, २४ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 16 • वर्ष ४ थे, अंक १६ • किंमत ₹ ६ • पाने : १२


# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



विद्यापीठाचा ८२ कोटी तुटीचा अर्थसंकल्प..!

P३



हैदराबादचा मोठा विजय

१२

## At a Glance

### संभल प्रकरणी जामा मशीदीचे प्रमुख ताब्यात

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशमधील संभलमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणी संभल शाही जामा मशिदीचे अध्यक्ष जफर अलीला त्यांना जबाब नोंदवण्यासाठी ताब्यात घेतले. २४ नोव्हेंबर रोजी त्यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानांनंतर दंगल उसळल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एसआयटीच्या तपासानंतर ही कारवाई करण्यात आल्यावे वृत्त माध्यमांनी दिले आहे. दरम्यान,

» पान ७ वर

### मेहुल चोक्सीला भारतात आणणार?

**नवी दिल्ली :** गीतांजली जेम्सचा मालक आणि १३,८५० कोटी रुपयांच्या बँक घोटाळ्यातील प्रमुख आरोपी मेहुल चोक्सीला भारतात आणण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. सध्या तो पत्नी प्रीतीसह "एफ रेसिडेन्सी कार्ड" वर बेल्जियममधील अँटवर्प येथे राहत आहे. पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यानंतर तो २०१८ मध्ये भारतातून अँटिग्वा-

» पान ७ वर

# चुकीला माफी नाही...!

## मुख्यमंत्र्यांनी केले फोनवर बोलणाऱ्या चालकाला निलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** बसचा प्रवास सुरक्षित मानला जातो. कुठेही बाहेर जाताना बसच्या प्रवासालाच अधिक प्राधान्य देतात. मात्र चालकांकडून प्रवाशांच्या जीवाशी खेळ केल्याच्या घटना अनेकदा समोर आल्या आहेत. त्यात अरेरावीचे प्रकारही समोर आले आहे. यातच मुंबई ते पुणे प्रवासादरम्यान वाहन चालकाने फोनवर बोलत एका हाताने बस पळवल्याचा प्रकार समोर आला. याची माहिती बसमधील एका प्रवाशाने ट्वीट करत मुख्यमंत्री कार्यलयाला दिली. त्या ट्वीटची दखल घेत प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या ड्रायव्हरचे तात्काळ निलंबन करण्यात आले आहे.

नागरिकांमध्ये रहादारीच्या नियमांचा आभाव पाहायला मिळतो. चालकाच्या निष्काळजीपणामुळे अनेक अपघात झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अशात मुंबई-पुणे प्रवासादरम्यान आणखी एक प्रकार समोर आला आणि साडे तीन तासाच्या आत तडकाफडकी निलंबन करण्यात आले आहे. शिवनेरी बसचालकाचा एक फोटो समोर आला आहे. या फोटोमध्ये चालक हा फोनवर बोलत प्रवासी असलेली शिवनेरी बस चालवताना दिसत आहे. रविवारी सकाळी ९.३० वाजता सदर बस दादर ते स्वारगेट बसमधील हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला. सदर बस मध्ये चालकाला वारंवार सांगूनह फोनवर बोलत असल्याचं ट्विटमध्ये प्रवाश्याने लिहलं आहे. नितीन गोडबोले असे चालकाचे नाव आहे. प्रवाशाच्या तक्रारीची थेट मुख्यमंत्री कार्यालयाने दखल घेत चालकाचे निलंबन केले आहे.

### कडक कारवाई करणार

● मुख्यमंत्री कार्यालयाने ट्वीट करत म्हटले आहे की, चालकाचे तात्काळ निलंबन करण्यात आले आहे. तसेच पुढील कार्यवाही सुरू आहे. मागील काही दिवसांपासून चालकाकडून असे प्रकार समोर आले आहेत. त्यातच प्रवाशांच्या जीवाशी खेळही सुरु असल्याचं दिसत आहे. या चालकांच्या अशा वागण्याने अनेक प्रवाशांचा जीव धोक्यात असल्याचं दिसत आहे. अशा चालकांवर यापूर्वी कारवाई करण्यात आली आहे. तरीही बाकी चालकांना धाक असल्याचं दिसून येत नाही आहे. त्यामुळे अशा चालकांवर यापुढे अशीच कडक कारवाई करण्यात येणार असा सूचक इशाराचा मुख्यमंत्री कार्यालयाने दिला आहे.

## संजय निरुपम यांचा दावा

# नागपूर हिंसाचारात बांगलादेशींचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** नागपुरात श्लोकांवर लिहिलेल्या 'पत्र्या' जाळण्याच्या अफवा आणि उजव्या विचारसरणीच्या संघटनांच्या आंदोलनानंतर उसळलेला हिंसाचार सुरूच आहे. या प्रकरणी डझनभर लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे. नागपुरात नुकत्याच झालेल्या हिंसाचारात बांगलादेशच्या लोकांचा सहभाग असल्याचा दावा शिवसेना नेते संजय निरुपम यांनी केला आहे. हा हिंसाचार पूर्वनियोजित आणि मोठ्या कटाचा भाग असल्याचा दावाही निरुपम यांनी पत्रकार परिषदेत केला.

छत्रपती संभाजीनगर येथील मुघल बादशहा औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान १७ मार्च रोजी नागपूर शहरात श्लोक कोरलेली चादर जाळण्यात आल्याची अफवा पसरली होती. या झटापटीत शहराच्या अनेक भागात मोठ्या प्रमाणात दगडफेक आणि जाळपोळ झाली, ज्यात उपायुक्त दर्जाच्या तीन अधिकाऱ्यांसह ३३ पोलिस जखमी झाले. हिंसाचारप्रकरणी अटक करण्यात आलेला एक जण सोशल मीडियाचा वापर करून मुजाहिद्दीन कारवायांसाठी निधी गोळा करत असल्याचा आरोपही निरुपम यांनी केला आहे.

» हिंसाचार

निरुपम यांनी शिवसेनेच्या अशा गटांशी असलेल्या कथित युतीवर टीका केली. शिवसेना मुजाहिद्दीनसोबत युती करत आहे का? ठाकरे आणि संजय राऊत त्यांना पाठिंबा देत आहेत का?

ते महाराष्ट्रात स्वीकारले जाणार

» पान ७ वर

# दंगलखोरांकडूनच वसुली

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा सज्जड दम : जनजीवन पूर्वपदावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपुरात सोमवारी दोन गटांत उफाळलेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या युवकाचा आज मृत्यू झाला. दरम्यान, या प्रकरणी आज मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या पोलिस आयुक्तांबरोबर बैठक घेऊन काही अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेतले असून, नागपुरात झालेल्या दंगलीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परंतु हे नुकसान दंगलखोरांकडूनच वसूल केले जाईल, त्यांनी हे पैसे भरले नाहीत, तर त्यांच्या मालमत्ता विकून पैसे वसूल केले जातील. कोणत्याही परिस्थितीत त्यांना सोडले जाणार नाही, असा सज्जड दम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दंगलखोरांना दिला.

नागपूर शहरात उसळलेल्या हिंसाचारानंतर राज्य सरकार आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज आढावा बैठक घेतली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत दंगलखोरांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. घटनेच्या अनुषंगाने आज नागपूरचे पोलिस आयुक्त, एसपी आणि सर्व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत आढावा घेतला. एकूण घटनाक्रम आणि त्यानंतर केलेली कारवाई या सर्व गोष्टींसंदर्भातील ही आढावा बैठक होती, असे फडणवीस म्हणाले.

यासंदर्भात मुळातच काही गोष्टी सभागृहात स्पष्ट केल्या होत्या. औरंगजेबाची प्रतिकात्मक कबर सकाळी जाळण्यात आली, त्यानंतर काही लोकांनी तक्रार केली. पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली. मात्र, प्रतिकात्मक कबर जाळत असताना कुराणच्या आयत लिहिलेली चादर जळाली, अशा प्रकारचा एक भ्रम तयार करून

» पान ७ वर

### संचारबंदी मागे

● नागपूर शहरात झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर सहा दिवसांनी म्हणजे रविवारी नागपूरमधील उर्वरित ४ भागांमधून संचारबंदी उठवण्यात आली आहे. त्यामुळे आता जनजीवन पूर्वपदावर येत आहे. २३ मार्च रोजी दुपारी ३ वाजता संचारबंदी पूर्णपणे उठवल्याचे नागपूर पोलिसांनी सांगितले. परंतु काही ठिकाणी पोलीस बंदोबस्त कायम असणार आहे. नागपूर शहरातील हिंसाचाराच्या घटनेनंतर शहरातील बाजारपेठांमध्ये शुकशुकाट होता. संचारबंदी लावल्याने हिंसाचारग्रस्त भागात पोलीस बंदोबस्तामुळे वर्दळ थांबली होती. परंतु आता शहर पूर्वपदावर येत आहे. नागपुरात बाजारपेठही सुरु झाली आहे. वर्दळ सामान्य होऊ लागली आहे. या ठिकाणची संचारबंदी उठवली असली तरी पोलीस प्रशासन परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून आहेत. महाल, गांधीबाग, इतवारी या भागात नागपूर शहरातील मोठ्या आणि जुन्या होलसेल बाजारपेठ आहेत, त्या ठिकाणी पोलिसांचे लक्ष आहे. नागपुरातील संचारबंदीमुळे पहिल्याच दिवशी सुमारे २५० कोटींचा व्यापार प्रभावित झाला होता.



### चीनमधील आयातीला भारताने लावले शुल्क

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताने चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर अँटी-डंपिंग शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. चीनमधून येणाऱ्या स्वस्त आयातीपासून वाचण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. चीनमधून येणाऱ्या एकूण ४ वस्तूंवर अँटी-डंपिंग शुल्क लागू करण्यात आले असून, या वस्तूंमध्ये व्हॅक्यूम फ्लास्क आणि ॲल्युमिनियम फॉइलचा समावेश आहे.

अँटी-डंपिंग शुल्क हे आयात करण्यात आलेल्या वस्तूंवर लावले जाते. आयात करण्यात आलेल्या वस्तूंचा दर हा देशांतर्गत वस्तूंच्या किमान मूल्यापेक्षा कमी असतो. यामुळे स्थानिक उद्योगांना तोटा सहन करावा लागतो. स्थानिक उद्योग आणि व्यावसायिकांना संरक्षण देण्यासाठी आणि अनियंत्रित आयात कमी करण्यासाठी सरकारकडून हे शुल्क लावले जाते.

चीनमधून भारतात सामान्य किंमतीपेक्षा कमी

» पान ७ वर

# सुप्रिया सुळे-चाकणकर भिडल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काही राजकीय मंडळींना आपल्या शिक्षण संस्थांवर टाच येणार याची जाणीव झाल्यामुळेच त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम अचानक उफाळून आल्याचे म्हणत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली आहे.

दरम्यान, यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा (सीबीएसई) अभ्यासक्रम (पॅटर्न) लागू होणार आहे. याबाबत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळात घोषणा केली होती. या घोषणेनंतर आता नवा वाद सुरू झाला आहे. याच घोषणेवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली होती. तर 'सीबीएसई' अभ्यासक्रमाची अंमलबजावणी म्हणजे राज्य शिक्षण मंडळ संपूर्णत: बंद करण्याचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला होता.



सुळेंच्या या आरोपावर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या तथा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पटलवार केला आहे. याबाबत चाकणकर यांनी एक्स आणि फेसबुकवर एक पोस्ट शेअर करत राज्य सरकारचा निर्णय ऐतिहासिक असल्याचे म्हटले आहे.

तसेच सध्याच्या स्पर्धेच्या युगात खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांच्या तुलनेत सरकारी शाळेतील विद्यार्थी कुठेतरी कमी पडतो. मग हा अभ्यासक्रम सरकारी शाळेत लागू झाल्यावर तेथील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात क्रांती घडेल. काही राजकीय मंडळींना आपल्या शिक्षण संस्थांवर टाच येणार याची जाणीव झाल्यामुळेच त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम अचानक उफाळून आल्याचे म्हटले आहे.

### स्वत: व त्यांची मुले ही परदेशात शिकली

● सुप्रिया सुळेंना या निर्णयामुळे महाराष्ट्राची ओळख पुसणार अशी शंका वाटते. मग संसदेत काम करत असताना तुम्ही मराठीतच का बोलत नाहीत? तिथे मराठी बोलताना लाज वाटते का? असा खरमरीत सवाल चाकणकर यांनी केला आहे. तसेच अभिजात भाषा मराठी, संस्कृती, परंपरा याचा विचार सुप्रिया सुळे करतात कारण त्या स्वत: व त्यांची मुले ही परदेशात शिकून आलेत! असाही टोला रुपाली चाकणकर यांनी लगावला आहे.

### कोकण रेल्वे वाहतूक विलंबाने

**मुंबई :** ओव्हरहेड वायर तुटल्याने विस्कळीत झालेली कोकण रेल्वेची वाहतूक सलग दुसऱ्याही विलंबाने धावत होती. अनेक गाड्या चार ते पाच तास उशीराने धावत आहेत.

कोकणकन्या पाच तास उशीराने, तुतारी एक्सप्रेस एक तास, वंदे भारत एक्सप्रेस अर्धा तास, तेजस एक्सप्रेस अर्धा तास तर केरळ संपर्क क्रांति एक्सप्रेस अर्धा तास उशीराने धावत आहे.

रत्नागिरीहून मुंबईला जाणारी रत्नागिरी दिवा गाडी एक तास, मंगला एक्सप्रेस सव्वा तास उशिरा, नेत्रावती एक्सप्रेस सुद्धा सव्वा तास उशीराने धावत आह. राजापूर जवळच्या आडवली इथं ओव्हरहेड वायर तुटल्याने कोकण रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यामुळे होळीहुन परतीच्या प्रवासाला निघालेल्या प्रवाशांमधून नाराजीचे सूर उमटत आहेत.

## संघाचे दत्तात्रय होसबळे यांचे स्पष्ट मत

# आक्रमक मानसिकता धोक्याची

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांनी आता औरंगजेब प्रकरणावर भाष्य केलं आहे. तसंच वक्फ प्रकरणावरही त्यांनी भाष्य केलं आहे. सरकार यासंदर्भात योग्य दिशेने काम करत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

१४ फेब्रुवारी या दिवशी देशभरात छावा हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्यानंतर औरंगजेब हा मुद्दा महाराष्ट्रात चर्चेत आला. भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी केली आहे. तसंच इतरही हिंदुत्ववादी संघटना यासाठी आक्रमक झाल्या आहेत. महाराष्ट्रात हा विषय ताजा असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रय होसबळे यांनीही या विषयावर भाष्य केलं आहे.



समाजात कुठलाही विषय समोर येऊ शकतो. औरंगजेब मार्गाचं नाव बदलून ते अब्दुल कलाम रोड असं करण्यात आलंच. जे लोक गंगा आणि यमुना यांचा आदर करतात अशा लोकांनी औरंगजेबाला त्यांचा आयकॉन बनवलं. असे लोक औरंगजेबाच्या भावाविषयी काहीही बोलत नाहीत. बाहेरुन येणाऱ्या व्यक्तीला आदर्श ठरावयचं की इथल्या भूमीतील लोकांचा सन्मान करायचा हा खरा प्रश्न आहे. असं दत्तात्रय होसबळे यांनी म्हटलं आहे.

आक्रमक मानसिकतेचे लोक भारतासाठी संकट आहेत. अशाच प्रवृत्तीचे लोक औरंगजेबाचं महत्त्व वाढवत आहेत. अशी थेट भूमिका होसबळे यांनी मांडली त्याचप्रमाणे त्यांनी वक्फबाबतची त्यांची मतं मांडली आहेत. वक्फबाबत ज्या चर्चा सुरु आहेत त्या समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक आहेत असंही त्यांनी म्हटलं आहे. तसंच अयोध्येत झालेलं राम मंदिर हे फक्त संघ नाही तर संपूर्ण समाजाच्या प्रयत्नांचं प्रतीक आहे असंही ते म्हणाले आहेत.

बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत. त्या विरोधात आम्ही संघाच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर केला आहे. बांगलादेशातील अल्पसंख्य हिंदूंवर होणारे अन्याय, त्यांच्या विरोधात कट करुन केली जाणारी हिंसा, त्यांच्यावरचे अन्याय तसंच शोषण याबाबत आम्ही निषेध नोंदवला आहे हिंदू समाजाने एकत्र आलं पाहिजे आणि एकजूट करुन राहिलं पाहिजे असंही होसबळेंनी म्हटलं आहे.

### बच्चू कडू यांचं आंदोलन मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी रायगडच्या पायथ्याशी सुरू केलेलं अन्नत्याग आंदोलन आज मागे घेतलं. मंत्री भरत गोगावले यांनी त्यांना शिरा आणि लिंबूपाणी देऊन आंदोलन मागे घेतलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल त्यांच्याशी फोन वरून चर्चा केली आणि या प्रश्नांवर एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बैठक घेण्याचे आश्वासन दिलं.

आज मंत्री भरत गोगावले आणि योगेश कदम यांनी बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी रोजगार हमी योजनेतून दिव्यांगाना रोजगाराची संधी मिळवून देण्याचं आश्वासन भरत गोगावले यांनी दिलं. त्यानंतर कडू यांनी आंदोलन थांबवत असल्याचं जाहीर केलं. २२ तारखेपासून बच्चू कडू यांचं आंदोलन सुरू होतं.

# दक्षिणेतील राज्ये केंद्राविरोधात एकवटली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** सीमांकनाच्या मुद्द्यावरून आतापर्यंत दक्षिण भारतातील राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया उमटत होत्या परंतु आता या मुद्द्यावर आरपारची लढाई होण्याची चिन्हे आहेत. चेन्नई इथे आज या मुद्द्यावर बैठक घेण्यात आली. या ५ राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सहभागी झाले होते. ३ अन्य राज्यांच्या नेत्यांनीही या बैठकीत भाग घेतला. बैठकीतील सर्व लोकप्रतिनिधींनी सीमांकनामुळे आपापल्या राज्यात होणा-या परिणाम मांडले.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांच्या नेतृत्वात या बैठकीचे आयोजन होते. त्यात केरळाचे मुख्यमंत्री पी. विजयन, तेलंगानाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी भाग घेतला. ओडिशाच्या विरोधी पक्षातील बीजू जनता दल आणि आंध्र प्रदेशातील विरोधी पक्ष वायएसआर काँग्रेस यांच्या प्रतिनिधींनीही बैठकीत सहभाग नोंदवला. सर्वांनी या बैठकीत सीमांकनावर भाष्य केले.

सीमांकनाचा अशा राज्यांवर वाईट परिणाम होणार ज्यांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजनावर अधिक भर दिला आणि त्यात यश मिळवले. आम्ही सीमांकनाच्या विरोधात नाही परंतु निष्पक्ष सीमांकन झाले पाहिजे. लोकसंख्येच्या आधारावर सीमांकन झाल्यास संसदेत आमचे प्रतिनिधित्व कमी होईल आणि तसे झाले तर केंद्र सरकारकडून निधीसाठी आम्हाला संघर्ष करावा लागेल.

» पान ७ वर

# मनसेत राज ठाकरेंचे मोठे संघटनात्मक बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत खाते न उघडू शकलेल्या राज ठाकरे यांनी आता पुन्हा संघटनात्मक पातळीवर जोर देण्यास सुरुवात केली आहे. मनसेमधील नवीन रचना आणि संघटनात्मक बदल जाहीर केले आहेत. मनसेने पहिल्यांदाच मुंबईसाठी अध्यक्षपदाची नेमणूक केली आहे. त्याशिवाय, राज ठाकरे यांचे पुत्र, मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावरही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

नुकत्याच झालेल्या एका बैठकीत राज ठाकरे यांनी नेत्यांना प्रमुख शहराच्या जबाबदा-या वाटून

» पान ७ वर

### अमित ठाकरेवर महत्त्वाची जबाबदारी

● मुंबई शहर अध्यक्षपदी संदीप देशपांडे यांच्यानंतर कुलाबा ते माहीम-शीवपर्यंतची जबाबदारी उपाध्यक्ष यशवंत किल्लेदार, पश्चिम उपनगरची जबाबदारी शहर उपाध्यक्ष कुणाल माहिमकर, शहर उपाध्यक्षपदी असलेल्या योगेश सावंत यांच्याकडे पूर्व उपनगरची जबाबदारी असणार आहे. मनसेच्या संघटनेत शिवसेनेप्रमाणे शाखा प्रमुख, शाखा अध्यक्ष ही महत्त्वाची पदे आहेत. त्यामुळे अमित ठाकरे यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी असणार आहे.

# दहावी, बारावीच्या परिक्षेत कॉपीमुक्त अभियानाची मोहिम फत्ते...!

### अभियान

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी, बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी राबवलेल्या कॉपीमुक्त अभियानामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दहावी आणि बारावी या दोन्ही परीक्षांतील गैरप्रकारांची संख्या घटली आहे. यंदा राज्यभरात दहावीच्या परीक्षेत ८९, तर बारावीच्या परीक्षेत ३६० गैरप्रकारांची नोंद झाली.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य मंडळाने नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि बारावीची परीक्षा घेतली. या परीक्षेमध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्रांच्या परिसरात जिल्हा प्रशासनाकडून ड्रोनद्वारे परीक्षा केंद्रांची निगराणी, परीक्षा केंद्रांबाहेर दृक् श्राव्य चित्रीकरण, सर्व परीक्षा केंद्रांवर



भरारी पथके, बैठ्या पथकांची नियुक्ती, परीक्षा केंद्रावर नियुक्त केंद्रसंचालक, पर्यवेक्षक, परीक्षेशी संबंधित सर्व घटकांची 'चेहरा पडताळणी व्यवस्थे'द्वारे (फेस रेगक्निशन) तपासणी, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करणे, अशा विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच, गैरप्रकार घडणाऱ्या शाळा, महाविद्यालयांतील परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्याचा इशाराही देण्यात आला होता.

### छत्रपती संभाजीनगर विभागात गैरप्रकार सर्वाधिक

● दहावी आणि बारावी या दोन्ही परीक्षांमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक गैरप्रकार नोंदवले गेले. दहावीच्या परीक्षेत ३७, तर बारावीच्या परीक्षेत २१४ प्रकरणे उघडकीस आल्याची माहिती राज्य मंडळाकडून देण्यात आली. दहावीच्या परीक्षेत पुणे विभागात १५, नागपूर विभागात २१, मुंबई विभागात ३, लातूर विभागात १३ प्रकरणांची नोंद झाली. कोल्हापूर, अमरावती, नाशिक आणि कोकण चार विभागांत एकही गैरप्रकार नोंदवला गेला नाही. बारावीच्या परीक्षेत पुणे विभागात ४२, नागपूर विभागात ३२, मुंबई विभागात ९, कोल्हापूर विभागात ७, अमरावती विभागात १०, नाशिक विभागात १२, लातूर विभागात ३३, तर कोकण विभागात एका प्रकरणाची नोंद झाली आहे.

गेल्या वर्षीची परीक्षा आणि यंदाच्या परीक्षेतील गैरप्रकारांच्या आकडेवारीची तुलना करता यंदा गैरप्रकारांची संख्या कमी झाल्याचे दिसते. गेल्या वर्षी दहावीच्या परीक्षेत २९९, तर यंदा ८९ गैरप्रकार नोंदवले गेले आहेत. गेल्या वर्षी बारावीच्या परीक्षेत ४५२, तर यंदा ३६० प्रकरणांची नोंद झाली आहे. दहावीच्या परीक्षेत २१०, तर बारावीच्या परीक्षेत ९२ गैरप्रकार कमी झाले.

#रा



## यशस्वी महिलांची प्रकट मुलाखत संपन्न

**पुणे :** पुणे मॅनेजमेंट असोसिएशन व एसएमजे कंन्सलटंन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मार्केटिंग आणि सेल्स या क्षेत्रात उत्तुंग कार्य करण्याऱ्या महिलांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. आयएमडीआर सभागृह येथे झालेल्या या कार्यक्रमात वेदवती राजे(लीडर फ्लीटगार्ड फिल्टर्स),शितल ब्रम्हे(सीईओ एनी टाईम बार्टल),अंजली पाटील (फाउंडर डायरेक्टर इल्यूमीना कन्सल्टिंग) यांची मुलाखत मृणालिनी सचान यांनी घेतली. या कार्यक्रम प्रसंगी पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रदीप तुपे, एसएमजे कंन्सलटंन्सचे राहुल जोशी आदी मान्यवरांच्या बरोबरच मार्केटिंग व सेल्स विभागात कार्य करणारे अधिकारी वर्ग उपस्थित होते. या वेळी मुलाखतीत यशस्वी महिलांनी मार्केटिंग व सेल्स याची सखोल माहिती, काय करू नये व काय करावे याविषयी माहिती देत असतांनाच भावी काळातील आव्हाने व त्याचे निराकरण याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.



## डॉ.मेघा फिरोदिया यांच्या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन

**पुणे :** ऑटीझम रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग सेंटरच्या मदतीसाठी आयोजित चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन नियोजित प्रांतपाल संतोष मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. रजा रविवर्मा कलादालन घोले रोड येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी नियोजित प्रांतपाल संतोष मराठे,चित्रकार डॉ.मेघा फिरोदिया, ऑटीझम रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग सेंटरच्या चेअरमन कीर्ती केळकर डॉ.मनीष फिरोदिया आदी मान्यवरांच्या बरोबरच नागरिक उपस्थित होते.



## सावनी शेंडे यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध !

**पुणे :** हृद्य स्पर्श – हॅव अ हार्ट फौंडेशनच्या वतीने किराणा घराण्याच्या प्रख्यात गयिका विदुषी सावनी शेंडे यांच्या गायनाचा बहारदार कार्यक्रम पीवायसी जिमखाना येथील सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रम प्रसंगी डॉ.सुधीर भाटे(संस्थापक हृद्य स्पर्श), डॉ.समीर भाटे,कॅप्टन डॉ.अजय बदामीकर, विवेक देशपांडे, कर्नल निखिलेश पराडकर आदी मान्यवरांच्या बरोबरच नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते. यावेळी सावनी शेंडे यांनी मारू बिहार रागातील "रतिया मै तो "ने सुरुवात केली, बसंत बहार व अन्य रागातील विविध गाणी सुरेलपणे सादर करून रसिकांची मने जिंकली. यावेळी बोलतांना डॉ.सुधीर भाटे यांनी हृदयाच्या आरोग्यासाठी जनजागृती व्हावी या साठी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी यांनी केले.



## प्राथमिक शिक्षकांसाठी कार्यशाळा संपन्न

**पुणे :** पी एम श्री केंद्रीय विद्यालय क्र. 2, वायु सेना स्थल पुणे येथे आज प्राथमिक शिक्षकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य भारत भूषण व मुख्याध्यापक संजय कुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेतील प्रमुख स्रोत व्यक्ती म्हणून श्रीमती दीपा ढेंबरे व श्रीमती मानसी कुमारी यांनी मार्गदर्शन केले. श्रीमती दीपा ढेंबरे यांनी फाउंडेशन लिटरसी अँड न्यूमरेसी (FLN) या विषयावर सखोल माहिती दिली, तर श्रीमती मानसी कुमारी यांनी फोनिक्स शिक्षण पद्धती या विषयावर उपयुक्त सत्र घेतले.

एकूण १७ प्राथमिक शिक्षकांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. सतत व्यावसायिक विकास या उपक्रमाअंतर्गत कार्यशाळा घेण्यात आल्याचे मुख्याध्यापक श्री. संजय कुमार पाटील यांनी सांगितले. शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात सातत्याने सुधारणा व्हावी आणि विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी शिक्षण देता यावे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

## एक किलो धान्य पक्ष्यांसाठी...!



पुणे वृक्षमित्र आणि पर्यावरणप्रेमी यांनी वाढदिवसानिमित्त हार अथवा पुष्पगुछ न आणता पक्ष्यांसाठी एक किलो धान्य आणण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला विविध संघटना आणि राजकीय कार्यकर्त्यांनी प्रतिसाद देत ४५२ किलो धान्य जमा केले, या अभिनव वाढदिवसाचे परिसरात कौतुक होत आहे.

## पक्ष्यांना धान्य देऊन वाढदिवस साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** हार, फुले,शाल नारळ न आणता पक्षांसाठी एक कीलो बाजरी आणन्यास केलेल्या आव्हानाला शेकडो नागरिकांनी साद देत ४५२ किलो धान्य जमा केले. चंद्रकांत वारघडे यांची वृक्ष मित्र,पक्षी प्रेमी, गोसेवक, निसर्ग प्रेमी अशी ओळख पंचक्रोशीत आहे ते २०१७पासून बकोरी येथे वृक्षलागवड करत आहेत आजपर्यंत त्यांनी बकोरी येथे ७०००० वेगवेगळ्या जातींची औषधी झाडे लावली आहेत आणि त्याचे संगोपन नियमित चालू आहे झाडे वाढल्याने त्याठिकाणी मोठ्याप्रमाणात पक्षांचा वावर वाढला आहे त्यामुळे २०२२ पासून वारघडे त्याठिकाणी असलेल्या पक्षांना डिसेंबर ते जून पाऊस पडेपर्यंत धाना पाणी देत असतात या दिवसात पक्षांना खाद्य नसल्याने मोठ्याप्रमाणात पक्षी याठिकाणी जमा होत असता रोत ४० किलो पेक्षा जास्त धान्यं लागत असते, त्यामुळे त्यांनी एक कीलो बाजरी आणण्याबाबत आव्हान केले होते.

प्रत्येक नागरिकाने आपला वाढदिवस साजरा करत असताना तो फळे कापून साजरा करावा त्यातून दोन फायदे होतात फळे खाणे शरीराला चांगले असते आणि फळे कापून वाढदिवस साजरा केल्यामुळे रोज लाखो फळे विकली जातील.

# जलवाहिन्यांची 'कुंडली गायब'..!

### महापालिका प्रशासनाचा हलगर्जीपणा; दुरूस्तीसाठी प्रशासनच 'वेटिंग'वर

महापालिकेच्या पाणीपुरवठ्याच्या वाहिन्या कालबाह्य झाल्या आहेत; त्यामुळे नागरिकांना दूषित आणि मलयुक्त पाणी प्यावे लागत असून त्यांच्या आरोग्याचा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे त्यातूनच साथीच्या रोगांचा जोरदार फैलाव होत आहे; हे वास्तव असतानाच महापालिका प्रशासनाचा उरफाटा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या जलवाहिन्यांचे नकाशेच प्रशासनाच्या दफ्तरी अस्तित्वात नाहीत, त्यामुळे दुरुस्तीसाठी चक्क प्रशासनच 'वेटिंग'वर असल्याचे चित्र सध्यातरी आहे. त्यासाठी प्रशासनाला यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधावा लागणार आहे, अन्यथा पुणेकरांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागण्याची शक्यता आहे.



> नवीन जलवाहिनीवरून नळजोड देण्यात येत असले, तरी अद्यापही अनेक जुन्या जलवाहिन्या सुरूच आहेत. त्यांचे नकाशेच उपलब्ध नसल्याने अडचणी येत आहेत.
>
> **-पृथ्वीराज बी. पी.,** अतिरिक्त महापालिका आयुक्त



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या शहराला नवीन जलवाहिन्यांसोबत जुन्या जलवाहिन्यांमधूनही पाणीपुरवठा होत आहे. या जलवाहिन्यांमधून होणारी पाण्याची गळती रोखण्यात प्रशासनास अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अशा जलवाहिन्यांच्या नोंदी शोधून त्या बंद करण्याचे काम प्रशासनाकडून हाती घेण्यात येणार आहे. महापालिकेकडून शहरात समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नवीन जलवाहिन्या टाकण्यात येत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात पाणी गळती रोखण्यास पालिकेस यश आले असले, तरी अनेक मुख्य जलवाहिन्या जुन्याच असून, त्या जमिनीखालून नक्की कुठून गेल्या आहेत, याचे नकाशेच महापालिकेकडे नाहीत.

शहरासाठी महापालिकेकडून दरवर्षी सुमारे १८ ते २० टीएमसी पाणी पाटबंधारे विभागाकडून घेतले जात आहे. त्यातच महापालिकेस केवळ १४.६२ टीएमसी पाणीसाठा मंजूर असल्याने महापालिकेस वाढीव पाण्यासाठी पाटबंधारे विभाग तीनपट बिल आकारत आहे. त्याचबरोबर महापालिकेने जादा पाणी घेतल्याने शेतीच्या सिंचनासाठी पाणी कमी पडत असून, महापालिकेने पाणीवापर कमी करण्याची मागणी केली जात आहे. परिणामी महापालिका आणि पाणीपुरवठा विभागात नवीन वादाला तोंड फुटले आहे.

**असा करावा लागतोय सामना**

- जलवाहिन्यांची माहितीच नाही
- दुरुस्तीसाठी खटाटोप, परंतु नाईलाज
- विविध ठिकाणी करावी लागतेय रस्त्याची खोदाई
- मनुष्यबळ आणि आर्थिक खर्चाचा पडतोय भुर्दंड
- प्रशासन हतबल, नागरिकही हैराण

त्यामुळे महापालिकेकडून शहरासाठीच्या समान पाणी योजनेत शहराच्या वेगवेगळ्या भागांत नव्याने सुमारे १६०० किलोमीटरच्या जलवाहिन्या टाकण्याचे काम सध्या सुरू आहे. याशिवाय या जलवाहिन्यांवर पाण्याचे मीटरही बसविले जात आहेत. त्यामुळे एकाच जलवाहिनीवरील दोन वेगवेगळ्या ठिकाणांच्या मीटरवरून नेमके कोणत्या भागात पाणी कमी जात आहे, तसेच जलवाहिनीला गळती आहे, हे शोधण्यात प्रशासनाला यश आले आहे.

मात्र, या नवीन जलवाहिन्या सुरू झाल्यानंतर जुन्या जलवाहिन्यांचा पाणीपुरवठा बंद करणे गरजेचे आहे. मात्र, या जुन्या जलवाहिन्या कोठून आणि कशा जातात, तसेच जलवाहिन्यांचे जाळ कसे पसरले आहे, याचे नकाशे उपलब्ध नसल्याने पाण्याची गळती होत असल्याने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाची डोकेदुखी वाढली आहे.

# फेब्रुवारीत १९ हजार १२ मालमत्तांची नोंदणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मध्य पुणे, हवेली तालुका, पुणे महापालिका परिसर, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत पुणे जिल्ह्यातील 76 टक्के सदनिकांची विक्री झाली आहे. मावळ, मुळशी आणि वेल्ह्याचा वाटा १२टक्के असून, उर्वरित पुण्याचा वाटा ११ टक्के आहे. शहर आणि परिसरात फेब्रुवारी महिन्यात १९ हजार १२मालमत्तांची नोंदणी झाली. त्यातील ३२ टक्के घरे ८०० आणि त्यावरील चौरस फुटांची आहेत. पुणेकरांकडून प्रशस्त घरांनी अधिक मागणी असल्याचे दिसून येत आहे.

मुद्रांक महानिरीक्षक आणि नोंदणी कार्यालयातील नोंदीच्या आधारे नाइट फ्रँकने केलेल्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये पुणे शहर आणि परिसरात १८ हजार ७९१ मालमत्तांची नोंदणी झाली होती. गतवर्षीच्या तुलनेत त्यात एक टक्क्याची किरकोळ वाढ झाली आहे. मात्र, सरकारच्या तिजोरीत यंदा ७१७ कोटी रुपयांची भर पडली आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये ६६२ कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा झाले होते. यंदा महसुली उत्पन्न ७.६ टक्क्यांनी वाढले आहे.

जानेवारी २०२५ मध्ये १७ हजार ४४९ मालमत्तांची नोंदणी झाली असून, ६३८ कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा झाले आहेत. मालमत्ता नोंदणीत १२ टक्क्यांनी आणि महसुलात ७४ कोटींनी वाढ झाली आहे. फेब्रुवारी महिन्यात विक्री झालेल्या एकूण घरांमध्ये एक कोटी आणि त्यावरील मालमत्तांचा वाटा लक्षणीय आहे. खरेदीदारांना घर प्रशस्त हवे असल्याचे दिसून येत आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये एक कोटी आणि त्यावरील घरांचा वाटा १४टक्के होता. त्यात यंदा १६ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. तसेच, ८०० आणि त्यावरील चौरस फुटांच्या घरांचा टक्का २४ वरून ३२ टक्क्यांवर गेला आहे.

## पथ विक्रेता कायदा परिषदेस चांगला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडिया (महाराष्ट्र), पथारी व्यावसायिक संस्था पुणे मर्यादित, टपरी पथारी हातगाडी पंचायत आणि पथ विक्रेता एकता समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पथ विक्रेता कायदा -२०१४' च्या अंमलबजावणीचा आग्रह धरण्यासाठी विशेष परिषद आयोजित करण्यात आली होती. ही परिषद शुक्रवार, २१ मार्च रोजी पुणे श्रमिक पत्रकार संघ, कॉन्फरन्स हॉल येथे पार पडली.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडियाच्या स्ट्रीट फूड प्रोग्राम हेड संगिता सिंग या होत्या. कार्यक्रमाचे आयोजक गुरूनाथ सावंत (प्रोग्राम मॅनेजर, नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडिया), मोहन चिंचकर (जिल्हा अध्यक्ष, पथारी व्यावसायिक संस्था, पुणे), दीपक मोहिते (अध्यक्ष, पथ विक्रेता एकता समिती, महाराष्ट्र राज्य) आणि सुनिल भादेकर (उपाध्यक्ष, पथ विक्रेता एकता समिती, महाराष्ट्र राज्य) हे होते. दीपक मोहिते यांनी स्वागत केले.नव नियुक्त टीव्हीसी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

पुणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि लोणावळा नगर परिषद क्षेत्रातील सर्व पथ विक्रेते, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.



पुणे टाऊन व्हेंडिंग कमिटीवर राज्यात प्रथम निवडून गेलेल्या सदस्य भीमाताई लांडगे यांचा सत्कार करताना संगीता सिंग, दीपक मोहिते, गुरुनाथ सावंत, मोहन चिंचकर , सुनील भादेकर

# सायबर सुरक्षेसाठी रोटरीने पुढाकार घ्यावा : डॉ. दीपक शिकारपूर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सायबर गुन्ह्यांचे प्रमाण समाजात दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. समाजमाध्यमांवर (सोशल मीडिया) सतत कार्यरत असणारी तरुण पिढी सायबर गुन्हेगारांचे लक्ष्य ठरते आहे. तरुण पिढी गुन्ह्यांमध्ये कशी ओढली जाते हे त्यांनाही समजत नाही. मोबाईलचा वापर किती आणि कसा करावा याविषयी पालक मुलांना सजग करत नसल्यानेही मुलांच्या हातून चुका घडत आहेत. समाजातील ही परिस्थिती पाहता रोटरी क्लबने सायबर सुरक्षेबाबत जागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी, रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. दीपक शिकारपूर यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ पुणे विस्डमतर्फे व्यावसायिक सेवा आणि गुणवत्ता पुरस्कारांचे वितरण डॉ. शिकारपूर आणि जिल्हा व्यावसायिक संचालिका मधुमिता बर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी डॉ. शिकारपूर बोलत होते. कोथरूड येथील गांधी भवनात आयोजित कार्यक्रमात आयजीपी, महाराष्ट्र इंटेलिजन्स अकॅडमीचे संचालक डॉ. राजेंद्र डहाळे यांचा व्यावसायिक गुणवत्ता पुरस्काराने तर हेल्दी फूड बँकेची स्थापना करणाऱ्या डॉ. प्रतिभा कोलते यांचा व्यावसायिक सेवा पुरस्काराने गौरव करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ पुणे विस्डमचे अध्यक्ष निलेश धोपाडे, सचिव पूजा वाडेकर मंचावर होते.

समाजात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा रोटरी क्लब ऑफ पुणे विस्डमतर्फे गौरव करण्यात येत आहे, याबद्दल मधुमिता बर्वे यांनी क्लबच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

सायबर गुन्हेगारीला आळा बसावा यासाठी डॉ. दीपक शिकारपूर यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरल्याचे सांगून डॉ. राजेंद्र डहाळे म्हणाले, बँकेसंदर्भातील माहिती अनेकजण मोबाईलमध्ये ठेवतात. अनावश्यक फोन कॉल्सला प्रतिसाद दिल्यामुळे गोपनिय माहिती सायबर गुन्हेगारांच्या हाती लागते, त्यामुळे मोबाईल वापरताना सजग राहून योग्य तऱ्हेने हाताळावा. सेवानिवृत्तीनंतर समाजकार्यात स्वत:ला वाहून घ्यायचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी आहार, विहार आणि व्यवहारात सुधारणा झाली पाहिजे, अशी अपेक्षा डॉ. प्रतिभा कोलते यांनी व्यक्त केली.

# पाऊणेदोन टक्के वाहनांनाच 'एचएसआरपी'

## अडीच लाख वाहनचालक 'वेटिंग'वर; नागरिक आणि प्रशासनही हतबल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील २५ लाख जुन्या वाहनांपैकी केवळ पाऊणेदोन टक्केच वाहनांना 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (एचएसआरपी) लावल्याचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) दिलेल्या आकडेवारीवरून समोर आले आहे. शुक्रवारपर्यंत केवळ ४५ हजार वाहनांना पाटी बसवून झाली आहे, तर अडीच लाख वाहनधारकांनी नोंदणी केली असून, ते पाटी लावण्याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे नागरिकांसह प्रशासनही हतबल झाले असून यातून कसा मार्ग काढायचा असा प्रश्न त्यांना पडला आहे.

राज्य सरकारच्या निर्देशानुसार एक एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना ३० एप्रिलपर्यंत 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' लावणे बंधनकारक करण्यात आले होते. पुणे शहरातील वाहनांसाठी रोस्मार्टा कंपनीची नियुक्ती करत वाहनचालकांना तातडीने संबंधित पाटी लावण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र, तांत्रिक बिघाडामुळे निर्माण होत असलेला अडथळा, नोंदणीसाठी प्रतीक्षा, बनावट संकेतस्थळे यामुळे गैरसोय झाली.



तसेच, सुरुवातीच्या काळात अवघी ५९ केंद्रे सुरू करण्यात आली. पाटी बसविण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिल्याने नोंदणीत वाढ झाली. परंतु, केंद्रांवर कुशल मनुष्यबळाचा अभाव असल्याने पाटी बसविण्यासाठी विलंब होत असल्याने वाहनचाचक आणि केंद्रचालकांमध्ये वादावादीच्या घटना घडल्या. त्यामुळे 'आरटीओ'ने कंपनीला केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत निर्देश दिल्यानंतर १२५ केंद्रे सुरू करण्यात आली. मात्र, वादावादीच्या घटना घडत असल्याने एक-दोन केंद्रचालकांनी केंद्रच बंद केले. परिणामी, नोंदणीधारकांची संख्या वाढत गेली, तर तुलनेत पाट्या बसविण्याचे प्रमाणेत अत्यंत तुरळक असल्याचे स्पष्ट झाले.

पुणे शहरात एक एप्रिल २०१९ पूर्वीची २५ लाखांहून अधिक वाहने असून, शुक्रवारपर्यंत सुमारे दोन लाख ४० हजार वाहनचालकांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी केवळ ४५ हजार ५०० वाहनांना पाटी बसविण्यात आली आहे, उर्वरीत एक लाख ९५ हजार ५०० वाहनचालक प्रतीक्षेत असल्याची माहिती 'आरटीओ' प्रशासनाकडून देण्यात आली.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

### आकडे बोलतात...!

- पुणे शहरातील जुनी वाहने : २५ लाख
- नोंदणी केलेली वाहने : २ लाख ४४ हजार ५०० (९.६२ टक्के)
- पाट्या बसविलेली वाहने : ४५ हजार ५०० (१.८२ टक्के)

राज्य सरकारच्या निर्देशानुसार जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी लावण्यासाठी वाहनचालकांचा प्रतिसाद अत्यंत कमी आहे. दरम्यान, कंपनीलाही केंद्रांची संख्या वाढविण्यासाठी सूचना करण्यात आल्या असून, प्रादेशिक परिवहन आयुक्तांच्या निर्देशानुसार दोन महिन्यांची (३० जूनपर्यंत) मुदत वाढवून देण्यात आली आहे. वाहनचालकांनी लवकर पाटी बसवून घ्यावी.

**-स्वप्नील भोसले,** पप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे



जुन्या वाहनांची संख्या असल्याने ही नोंदणी राज्य शासन आणि परिवहन कार्यालयाने नेमून दिलेल्या वेळेत पूर्ण करणे शक्य होणार नाही; याची जाणीव यापूर्वीच करून देण्यात आली होती. त्याशिवाय अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील नंबर प्लेटचे दर खूपच आहेत, या बाबींचा विचार करून हे दर कमी करावेत आणि त्यासाठी मुदत वाढवून देण्याची गरज आहे.

**-बाबा शिंदे,** अध्यक्ष, चालक मालक वाहतूकदार संघटना, महाराष्ट्र राज्य

## पोलीसांची तत्परता; महिलेला दागिने परत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रिक्षातून प्रवास करताना गहाळ झालेले तीन तोळ्यांचे मंगळसूत्र समर्थ पोलिसांनी केलेल्या तत्पर तपासामुळे ज्येष्ठ महिलेला परत मिळाले. तीन तोळ्यांचे मंगळसूत्र परत मिळाल्यानंतर ज्येष्ठ महिलेने आनंद व्यक्त केला.

राधा अशोक अंकम (वय ६६) या रिक्षाने प्रवास करत होत्या. कसबा पेठेतील फडके हौद चौकातून त्या रिक्षाने निघाल्या. रास्ता पेठेतील पॉवर हाऊस चौकात त्या उतरल्या. प्रवासादरम्यान त्यांचे तीन तोळ्यांचे मंगळसूत्र गहाळ झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी मंगळसूत्र गहाळ झाल्याची तक्रार दिली. त्यानंतर तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक जालिंदर फडतरे आणि तपास पथकाने रिक्षाचालाकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. चित्रीकरण पोलिसांनी तपासले. अंकम ज्या रिक्षातून प्रवास करत होत्या. त्या रिक्षाचा क्रमांक एके ठिकाणी चित्रीकरणात आढळून आला. रिक्षा क्रमांकावरून चालकाचा शोध घेण्यात आला. तेव्हा रिक्षा भीमा रमेश भोजेय हा चालवित असल्याचे आढळून आले. त्याने हे मंगळसूत्र निगडीतील नातेवाईक भरत सोलंकी यांना दिले होते. सोलंकी हे समर्थ पोलीस ठाण्यात आले आणि त्यांनी तीन तोळ्यांचे मंगळसूत्र पोलिसांना परत केले.



## इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पुरस्कार प्रदान

**पुणे :** अनेक प्रकारच्या सामाजिक सेवा देणाऱ्या पुना नॉर्थ रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रेफ्रिजरेशन व कोल्ड चेन या क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील सल्लागार एसीआर प्रोजेक्ट कन्सल्टन्टस् पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना शिषवृत्त्या व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्याची निवड गुणवत्ता, रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग ह्या विषयातील प्राविण्य व आर्थिक गरज ह्या तत्वावर करण्यात आली व १३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रमाणपत्रे दिली अशी माहिती कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक एसीआर प्रोजेक्ट कन्सल्टंन्टस् पुणे चे अध्यक्ष अरविंद सुरंगे यांनी दिली.

या समारंभाच्या वेळी रोटरी क्लब ऑफ पुना नॉर्थच्या अध्यक्षा शांती श्रीधर, पूना नॉर्थ ट्रस्टचे अध्यक्ष जे. श्रीधर ,दीपक टक्कर , एसीआर प्रोजेक्ट कन्सल्टन्टस् पुणे चे अध्यक्ष अरविंद सुरंगे प्रा.डॉ. विजय भटकर ,डॉ. विकास देऊळगावकर,डॉ. प्रा.पी.एस.पुरंदरे,विद्यार्थी तसेच ईशरे आणि एशेर व शैक्षणिक संस्थेतील मान्यवर उपस्थित होते.

या वेळी जावीर हरिदास ,अजित भोर , फापले ज्ञानेश्वरी , रितेश कथवते ,अश्विनी शिवकुमार ,रमेश राठोड ,ऋशिकेश उंडाळकर ,असफान नाखवा ,अक्षदा साळुंके .हरीश शेवाळे ,क्षीरसागर केशव ,ओंकार येवले ,कृष्णा सरोद या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रशस्ती पत्रे देण्यात आली.

## किशोर सरपोतदार यांना मानद पीएचडी प्रदान

**पुणे :** एशियन कंट्रीज चेंबर ऑफ हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीतर्फे (ACOHI) पूना गेस्ट हाऊसचे संचालक किशोर



सरपोतदार यांना मानद पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. पूना गेस्ट हाऊसच्या माध्यमातून किशोर सरपोतदार यांनी हॉटेल व्यवसायात गुणवत्ता, सचोटी आणि व्यावसायिक प्रगती यांच्या माध्यमातून या व्यवसायातील मानकांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याबद्दल त्यांना हा बहुमान देण्यात आला आहे. एशियन कंट्रीज चेंबर ऑफ हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्री ही संस्था भारतासह आशिया खंडातील हॉटेल व्यावसायिक आणि हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी मान्यताप्राप्त संस्था आहे.

# विद्यापीठाचा ८२ कोटी तुटीचा अर्थसंकल्प..!

विद्यापीठाच्या अधिसभेने ८२ कोटी तुटीचा अर्थसंकल्प जाहीर केला; गेल्या वर्षीच्या तुलनेत ही तुट १७ कोटी रूपयांनी कमी झाली आहे. विद्यार्थ्यांसाठीच्या चार शिष्यवृत्तींसाठीची तरतूद एक कोटी ८५ लाख रुपयांनी वाढवण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजनेसाठी १ कोटी २५ लाख रुपये, महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख रुपये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख रुपये, स्वामी विवेकानंद अर्थसहाय्य योजनेसाठी २ कोटी २५ लाख रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेअंतर्गत ७ कोटी ५० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ५६६ कोटी रुपये जमा आणि ६४८ कोटी रुपये खर्च असलेला अर्थसंकल्प मांडण्यात आला. यंदा अर्थसंकल्पात ८२ कोटी रुपयांची तूट दाखवण्यात आली असून, गेल्यावर्षीच्या तुलनेत १७ कोटी रुपयांनी तूट कमी झाली आहे. अर्थसंकल्पात चार शिष्यवृत्ती योजना, संशोधन, गुणवत्तावाढ, विद्यार्थी विकास, विद्यार्थी वसतिगृह अशा घटकांवरील भरीव तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा शनिवारी झाली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिसभेला प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे आदी उपस्थित होते. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाला अधिसभेने मान्यता दिली.

अर्थसंकल्पात विद्यार्थी विषयक सेवा व सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम, उपकेंद्रांचे बांधकाम यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच संशोधन प्रकल्प प्रसिद्धी, नाविन्यता जागरुकता योजना, बौद्धिक संपदा हक्क यासाठीही अर्थसंकल्पात विशेष तरतुद करण्यात आली आहे. संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थी वसतिगृहाच्या चौदा मजली दोन स्वतंत्र इमारती बांधण्यात येत आहेत. प्रत्येक वसतिगृहात ५१३ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होणार आहे. तसेच वसतिगृह क्षमता वाढ, आणि देखभाल आणि विकासासाठी २९ कोटी ५६ लाख रुपयांची तरतुद आहे.

### अर्थसंकल्पातील प्रमुख तरतुदी

- क्रांतीवर बिरसा मुंदडा आदिवासी अध्यासन स्थापना – पाच लाख रुपये
- नाशिक, अहिल्यानगर उपकेंद्र इमारत बांधकाम – प्रत्येकी पाच कोटी रुपये
- प्राणीगृह बांधकाम – तीन कोटी रुपये
- विद्यार्थी विकास मंडळाच्या देखभाल आणि विकास – १२ कोटी ९६ लाख रुपये

# धक्कादायक...! तुपात होते पामतेलाची भेसळ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ वाढली आहे. तुपात देखील पाम तेलाची भेसळ होत असून शासकीय यंत्रणा कारवाई करते आहे. परंतु कारवाईची व्याप्ती वाढवायला हवी. छापा टाकून ॲनालॉग पनीर पकडल्यानंतर संबंधित व्यावसायिकाचे नाव जाहीर करायला हवे. नकली पनीरची विक्री वाढल्यामुळे दुधापासून बनविलेल्या पनीर विक्रीत अडथळे तयार झालेले आहेत. त्यामुळेच गुटखा बंदीसारखीच ॲनालॉग पनीरवर राज्यात कायमची बंदी घालणे योग्य ठरले, असा आग्रह आम्ही अन्न व औषध मंत्रालयाकडे धरला आहे, अशी माहिती डेअरी उद्योग सूत्राने दिली.

दुधापासून पनीर बनते. मात्र ॲनालॉग पनीर बनविण्यासाठी दुधाची गरज नसते. पाम तेल, स्टार्च आणि इतर रसायने टाकून ॲनालॉग पनीरची निर्मिती केली जाते. त्याची किंमत कमी असल्यामुळे खाद्यपदार्थ विक्री केंद्रे किंवा उपहारगृहांमधून या पनीरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

दूध भेसळ खरोखर रोखायची असल्यास आता शासकीय यंत्रणेला थेट गावपातळीवरील बल्क मिल्क कुलरपर्यंत धडक देत तपासणी करायला हवी. दुधामध्ये कमी प्रतिची भुकटी तसेच पशुखाद्य आहारातदेखील नकली पदार्थांची भेसळ होत असल्यामुळे दुधाची पातळी खालावली आहे. दुधाचा दर्जा घसरल्यामुळे राज्यात ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न तयार झाला आहे, असेही डेअरी उद्योगाचे म्हणणे आहे. राज्यात रोज लाखो रुपयांचे नकली ॲनालॉग पनीर विकले जात असून त्यामुळे दुधापासून पनीन तयार डेअरी उद्योग त्रस्त झाला आहे. ॲनालॉग पनीरवर तातडीने बंदी आणावी, असे साकडे राज्य सरकारला घातले आहे.



## फार्मसी करंडक क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या पूना कॉलेज ऑफ फार्मसी आयोजित राज्यस्तरीय ३८ व्या फार्मसी क्रिकेट करंडक स्पर्धेचे दिनांक १७ ते २१ मार्च २०२५ दरम्यान आयोजन केले होते.

या स्पर्धेत विविध महाविद्यालये व औषधनिर्माणशास्त्र कंपन्यांचे ११ पुरुष संघ व ६ महिला संघ सहभागी झाले होते.

स्पर्धेत पुरुष गटात जीवनधारा फार्मा ,तर महिला गटात इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी हा संघ विजेता ठरला.

महिला गटात शिवनगर विद्या प्रसारक मंडळ (एस . वी.पी.एम) यांचे कॉलेज ऑफ फार्मसी आणि इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्यात खेळला गेला . एस . वी.पी. एम कॉलेज ऑफ फार्मसी ने प्रथम फलंदाजी करताना ६ गडी गमावत ८ ओव्हर मध्ये २९ धावा केल्या.त्याला उत्तर देताना इंदिरा कॉलेज ने एक ही गडी न गमावत ३० धावा केल्या आणि विजेतेपदाला गवसणी घातली.

पुरुष गटात अंतिम सामना जीवनधारा फार्मा आणि सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी (वडगाव) यांच्यात खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना सिंहगड कॉलेज ने २० ओव्हर मध्ये १५९ धावा ७ गडी गमावत केल्या. त्याला प्रतिउत्तर देताना जीवधारा संघाने ५ गडी गमावत १६३ धावा करून विजेतेपद पटकावले.

सामनाविराचा मान जीवनधारा संघाच्या अमोल नंजन ह्याला मिळाला.

# आश्वासक कलाकारांनी जिंकली प्रेक्षकांची मने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवोदित गायिका रागेश्री वैरागकर यांचे गायन, ईशान घोष यांचे दमदार तबलावादन आणि अनिरुद्ध ऐथल यांच्या आश्वासक सादरीकरणाने १९ व्या पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवामध्ये युवा कलाकारांनी उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

आपला परिसर आणि तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव सुरु असून आजच्या तिसऱ्या दिवसाॅंह्या सकाळच्या 'युवोन्मेष' या सत्रामध्ये तीन युवा कलाकारांनी आपली कला सादर केली आणि प्रेक्षकांची वाहवा मिळवली. पं शौनक अभिषेकी, उज्ज्वल केसकर, पं. सत्यशील देशपांडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते

आजच्या दिवशीच्या पहिल्या सत्राची सुरुवात किराणा घराण्याचे गायक पं शंकरराव वैरागकर यांची शिष्या व पुतणी रागेश्री वैरागकर यांच्या सुश्राव्य गायनाने झाली. रागेश्री यांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात ललत रागाने केली. त्यामध्ये त्यांनी 'म्होरे घर आयो...' ही बंदिश सादर केली. नंतर आपल्या गुरू गायत्री जोशी यांची 'ओ मोरी नैया पार करो रे...'



आणि 'जोगिया म्होरे घर आये...' या बंदिशी त्यांनी गायल्या. रागेश्री यांनी आपल्या सादरीकरणाची सांगता पं. शंकरराव वैरागकर यांनी स्वरबद्ध केलेल्या 'या रे नाचू प्रेमानंदे...' या अभंगानी केली. रागेश्री यांना यांना कार्तिक स्वामी (तबला), लीलाधर चक्रदेव (संवादिनी) आणि ज्ञानेश्वर दुधाणे (पखवाज) या कलाकारांनी साथसंगत केली. या संगीत महोत्सवात नवोदित कलाकारांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

## वाघोलीतील चारजण दोन वर्षांसाठी हद्दपार

**वाघोली :** वाघोली पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील व कोयता गॅंग मधील चार गुन्हेगारांना दोन वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. रोहन ऊर्फ मोन्या रामप्यारे गिरी (वय-२-वर्षे), विकास राजु जाधव (वय-२० वर्षे), आदित्य दिपक कांबळे (वय-१८ वर्षे ३ महिने), वैभव सुभाष पोळ वय (१८ वर्षे ३ महिने) (सर्व रा. वाघोली) अशी चौघांची नावे आहेत.

वाघोली बाजारतळ तसेच आसपासच्या भागात कोयत्याच्या सहायाने दहशत निर्माण करीत होते. गंभीर दुखापत व तोडफोड करुन लोकांना कायम दहशतीखाली ठेवुन त्यांना वारंवार त्रास देत होते. वाघोली पोलीस ठाण्याने त्यांच्या हद्दपारीचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्याकडे पाठविला होता. त्यांनी हद्दपारीचा आदेश काढला.

# कृत्रिम बुध्दीमत्तेला भारतीय तत्वज्ञान हा उत्तम पर्याय : हर्डीकर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॅट जीपीटी आणि कृत्रिम बुद्धीमत्ता यांचा मूळ स्त्रोत चिनी तत्वज्ञान आणि चिनी ग्रंथात आढळून येतो. चीनच्या तुलनेत भारतीय तत्वज्ञान आणि ग्रंथ परंपरा अधिक समृध्द आहे. त्यामुळे केवळ कृत्रिम बुध्दीमत्ता या तंत्रज्ञानाच्या मागे न धावता भारताच्या समृध्द वारश्याला आणि परंपरेला मानवी प्रज्ञेची जोड मिळाल्यास जागतिक स्तरावर भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांवर भारत उत्तरे शोधू शकतो, असा विश्वास ज्येष्ठ लेखक आणि संपादक आनंद हर्डीकर यांनी व्यक्त केला.

मिहाना पब्लिकेशन्सतर्फे मेजर (निवृत्त) मोहिनी गर्गे-कुलकर्णी लिखित 'अपराजिता' या भारतीय वीरांगनांच्या समर्पणाची अमर यशोगाथा असलेल्या पुस्तकाचा प्रकाशन आज राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ज्येष्ठ लेखक आणि संपादक आनंद हर्डीकर बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर मेजर जनरल (निवृत्त) शशिकांत पित्रे, लेखिका मेजर (निवृत्त) मोहिनी गर्गे-कुलकर्णी आणि मिहाना पब्लिकेशन्सच्या संचालिका अमृता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मेजर जनरल (निवृत्त) शशिकांत पित्रे म्हणाले की, सैन्यदलातील महिलांच्या समावेशाबाबत मी स्वतः केवळ साशंक नव्हतो, तर माझा या गोष्टीला विरोध देखील होता. युध्दकाळात महिला काम करू शकतील का, हा प्रश्न मला भेडसावत होता. परंतू या शंका फोल ठरवत भारतीय विरांगनांनी स्वतःच्या क्षमता सिध्द केल्याचे दिसून येत आहे.

मिहाना पब्लिकेशन्सच्या संचालिका अमृता कुलकर्णी यांनी प्रकाशकीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनया देसाई यांनी केले.



भारतीय भूमी ही नररत्नांबरोबर नारीरत्नांची देखील खाण आहे. 'अपराजिता' या पुस्तकांच्या माध्यमातून कितीतरी वीरांगनांविषयी नव्याने माहिती मिळाली. मॅकेलेच्या शैक्षणिक रणनितीमुळे भारतीय समाजावर न्यूनगंड बिंबवला गेला. माझ्या मते पानिपतचे युद्ध हे पराभवाचे द्योतक नसून शौर्याचा इतिहास आहे..

**—प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी,** राज्यसभा खासदार

## शंकरशेठ रस्त्यावर १२लाखांचा गांजा जप्त

**पुणे :** कर्नाटकातून गांजा विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने शंकरशेठ रस्त्यावर पकडले. त्याच्याकडून १२ लाख रुपयांचा ६० किलो गांजा जप्त करण्यात आला.

नदीम मोईज शेख (वय २८, रा. बिदर, कर्नाटक) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. शेख फॅब्रीकेशनचे काम करतो. त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ विक्री प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी, कर्मचारी शंकरशेठ रस्त्यावर गस्त घालत होते. त्या वेळी सेव्हन लव्हज चौकात (झोले पाटील चौक) एक जण मोटारीत थांबला असून, त्याच्याकडे गांजा असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने मोटार अडवली आणि तपासणी केली. मोटारीत पोत्यात गांजा भरुन ठेवल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने मोटारीसह ६० किलो गांजा असा १७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक उल्हास कदम, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे, हवालदार सुजीत वाडेकर, सचिन माळवे, संदीप शिर्के यांनी ही कामगिरी केली.

# गटशेतीचे नवे धोरण आणून आर्थिक मदत वाढवू : फडणवीस

## पुण्यात 'सत्यमेव जयते शेतकरी चषक' पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्र्यांचे सूतोवाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राज्य शासनाच्या वतीने 2016 सालापासून वीस शेतकरी व 100 एकर जमीन असेल तर गटशेतीला आतापर्यंत एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. आता राज्य सरकार गटशेतीचे नवे धोरण आणणार असून आर्थिक मदत वाढवू. त्यातून गटशेतीला आपण आंदोलनाचे स्वरूप देऊ, अशी महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली.

बालेवाडी येथील शिवछत्रपती शिवाजी क्रीडा संकुलात येथे पाणी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'सत्यमेव जयते शेतकरी चषक २०२४'च्या भव्य पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आमीर खान आणि किरण राव यांनी स्थापन केलेली ही संस्था २०१६ पासून दुष्काळमुक्त आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचे काम करत आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह आमीर खान, किरण राव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मनोरंजन आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक सेलिब्रिटींनी या कार्यक्रमात ग्लॅमरची भर घातली. यावेळी मान्यवरांनी सर्व सहभागी शेतकरी गटांचे कौतुक केले. तसेच त्यांनी त्यांच्या एकतेचे कौतुक केले आणि शेतीमुळे निर्माण झालेल्या अनिश्चितता आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीतील सामूहिकीकरण कसे महत्त्वाचे आहे यावर भर दिला.

यंदाच्या शेतकरी चषक स्पर्धेत महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांतील ४,३०० पेक्षा अधिक शेतकरी गटांनी (सुमारे २००० महिला गट) भाग घेतला. यात सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील तेरती या गावातील 'भाग्योदय शेतकरी गट' संघाने राज्य पातळीवरील प्रथम पारितोषिक पटकावत २५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, तसेच प्रतिष्ठेची शेतकरी चषक ट्रॉफी जिंकली. सातारा जिल्ह्यातील भोसरे (ता. खटाव) येथील सरसेनापती प्रतापराव गुजर महिला शेतकरी गट आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोबलगाव (ता. खुलताबाद) या दोन संघांना संयुक्तरीत्या १५ लाख रुपयांचे राज् पातळीवरील द्वितीय पारितोषिक देण्यात आले. तर हिंगोली जिल्ह्यातील कवडा (ता. कळमनुरी) येथील जय बिरसा मुंडा शेतकरी गट आणि वाशिम जिल्ह्यातील नागी (ता. मंगरूळ पीर) येथील माऊली शेतकरी गटाने संयुक्तरीत्या १० लाख रुपयांचे तृतीय पारितोषिक जिंकले.सर्व महिला गटांना दोन राज्यस्तरीय पारितोषिके आणि तालुकास्तरीय प्रत्येकी ५० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली.



> ईश्वरानंतर खरी सृजनशीलता कोणामध्ये असेल तर ती बाळाला जन्म देणाऱ्या आईमध्ये आणि पिकाला जन्म देणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये असते. शेती व जलसंधारणाच्या क्षेत्रात आमची एक लाख माणसे काम करत आहेत. त्यांना आम्ही पाणी फाऊंडेशनच्या मागे उभे करू.
> **-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

ते पुढे म्हणाले;जोपर्यंत शेतकरी व लोक पाण्याचे शास्त्र शिकत नाहीत, जलसंधारणात लोकसहभाग वाढत नाही तोपर्यंत महाराष्ट्र दुष्काळीच राहील. राज्य सरकारच्या वतीने शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

यावेळी बोलताना पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमीर खान यांनी २०२६ पासून पाणी फाऊंडेशन आपले कार्य संपूर्ण महाराष्ट्रात करणार असल्याची घोषणा केली. यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी चषक स्पर्धेचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

आमीर खान आणि किरण राव यांनीही आपल्या भाषणात शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. खान यांनी पाणी फाऊंडेशनच्या व्यापक दृष्टीकोनाबद्दल सांगितले. आर्थिक आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम महाराष्ट्र घडविण्यासाठी फाऊंडेशन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय मराठी मालिकेच्या टीमने सादर केलेले प्रहसन तसेच पाणी फाऊंडेशनने सादर केलेला मल्टिमीडिया परफॉर्मन्स हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. या सादरीकरणात महाराष्ट्रातील तीन महिला शेतकऱ्यांनी आपल्या जिद्दीच्या आणि यशाच्या कहाण्या सांगितल्या, तसेच सुप्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक फुलवा खामकर व त्यांच्या पथकाने मनमोहक संगीत, गीत तसेच नृत्य सादर केले.



## पुण्यातील सीसीटीव्हीचे नियंत्रण पुणे पोलिसांकडेच

**पुणे :** पुणे शहरात एकूण ५१५१ आणि पुणे शहर पोलीस यांचे १३४१ असे एकूण ६४९२ सीसीटीव्ही आहेत. कॅमेऱ्यांचा स्विकारण्याकामी पुणे पोलीस नियंत्रण कक्ष तसेच संबंधित पोलीस ठाणे, पोलीस चौकी स्तरावर उपलब्ध करून दिलेला आहे,पुण्यातील सीसीटीव्ही प्रकल्प टप्पा १ मधील उभारलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती मे. अलाईड डिजिटल सर्व्हिस लिमीटेड या आस्थापनांकडे असून हे आस्थापन कुठलीही तक्रार आल्यास तात्काळ दुरुस्ती करते. असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत लेखी उत्तरात स्पष्ट केले.

यासंदर्भात सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभागृहाचे लक्ष वेधले होते. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून २०१५ मध्ये १३४१ सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. २८८६ अतिरिक्त कॅमेऱ्यांना मान्यता दिली असून त्याचे काम चालू आहे.

# लोकअदालतीत १.३८ लाख दावे निकाली

## तडजोड शुल्क वसूल, सर्वसामान्य नागरिकांना दिलासा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली २२ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये वादपूर्व १ लाख २५५ व तडजोडचे ३८ हजार ५७० असे एकूण १ लाख ३८ हजार ८२५ दावे निकाली काढण्यात आले आहेत.

लोक अदालतीमध्ये बँकेचे कर्जवसूली ८ हजार ८१९, तडजोड पात्र फौजदारी ३१ हजार ५३७, वीज देयक ३२९, कामगार विवाद खटले १८, भुसंपादन १११, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण १६३, वैवाहिक विवाद ७४, निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १ हजार ९९४, इतर दिवाणी ५१४, इतर २ हजार ६७३, महसूल ७ हजार ७३१, पाणी कर ८४ हजार ८६०, ग्राहक वादविवाद २ अशी एकूण १ लाख ३८ हजार ८२५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

तडजोडीसाठी ठेवण्यात आलेल्या ९७ हजार ६४४ प्रलंबित प्रकरणांमधून ३८ हजार ५७० प्रकरणे निकाली काढण्यात आली आणि यात ३२० कोटी ६८ लक्ष १२ हजार ४०७ तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. वादपूर्व २ लाख ४२ हजार ९८७ दाव्यापैकी १ लाख २५५ दावे निकाली काढण्यात येऊन २५६ कोटी ७० लाख ९८ हजार ७४९ रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. एकूण १ लाख ३८ हजार ८२५ प्रलंबित दावे निकाली काढण्यात येऊन ५७७ कोटी ३९ लाख ११ हजार १५६ रुपये तडजोड शुल्क म्हणून वसूल करण्यात आले.

पुणे जिल्ह्याने राष्ट्रीय लोक अदालतीच्या आयोजनादरम्यान दावे निकाली काढण्यात अग्रेसर राहण्याची परंपरा कायम राखली आहे. या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्याच्या सर्व न्यायालयातील अधिकारी-कर्मचारी, पोलीस विभाग, महानगरपालिका, विविध शासकीय विभाग आणि नागरिकांचे चांगले सहकार्य मिळाले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी दिली.

## मारहाण करून तरूणाला लुटले




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ॲपवरुन झालेल्या ओळखीतून लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पिंपरीतील एका तरुणाला संगम पूल परिसरात बोलावून चौघांनी त्याला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. त्याच्याकडील रोकड लुटून पसार झालेल्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका तरुणाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, शाहरुख टॉप नावाचा आरोपी, तसेच त्याच्याबरोबर असलेल्या तीन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण पिंपरी परिसरात राहायला आहे. आरोपींची त्याची एका 'गे ॲप'वरुन ओळख झाली होती. आरोपींनी १८ मार्च रोजी त्यांना मंगळवार पेठेतील आरटीओ चौकात भेटण्यासाठी बोलाविले. त्यानंतर रेल्वे रुळालगत असलेल्या मोकळ्या जागेत त्याला नेण्यात आले. आरोपींनी तरुणाला धमकावून पैशांची मागणी केली. आरोपींनी त्याला मारहाण करुन त्याच्याकडील पैसे काढून घेतले. त्यानंतर त्याच्याकडे आणखी पैशांची मागणी केली. तरुणाचा मोबाइल संचात तांत्रिक फेरफार (फॉरमॅट) करुन आरोपी पसार झाले.

या घटनेनंतर घाबरलेल्या तरुणाने नुकतीच बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील लोहार तपास करत आहेत. समलैंगिकांमध्ये मैत्रीसंबंध निर्माण करण्यासाठी एका ॲपचा वापर केला जातो. या ॲपचा वापर करुन चोरट्यांनी गेल्या दोन महिन्यात पाच ते सहा जणांन लुटले आहे. धायरी भागात एका व्यावसायिकाला धमकावून चोरट्यांनी लुटले होते, तसेच मगरपट्टा सिट्टी भागात एका संगणक अभियंत्याला धमकावून लूटमार करण्यात आल्याची घटना घडली होती.



## मागण्यांसाठी मनपा कामगारांचे आंदोलन

**पुणे :** महापालिकेतील सर्व कामगारांना तत्काळ ई-पेहचान कार्ड, वेतन चिठ्ठी व नियुक्तिपत्र प्रदान करणे बंधनकार करावे, या मागणीसाठी कामगार हितरक्षक संघ या संघटनेच्या वतीने महापालिकेसमोर आंदोलन करण्यात आले. महापालिकेच्या कंत्राटदारांकडून कामगारांना ई-पेहचान कार्ड, वेतन चिठ्ठी, नियुक्तिपत्र प्रदान केले जात नाही, या प्रश्नासाठी कामगार हितरक्षक संघटनेच्या वतीने महापालिकेसमोर आंदोलन करण्यात आले. आंदोलनात महापालिकेच्या कंत्राटदारांनी त्यांच्याकडील कामगारांना तातडीने ई-पेहचान कार्ड, वेतन चिठ्ठी, नियुक्तिपत्र प्रदान करावे, संबंधित सूचनांचे पालन न करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी या वेळी संघटनेचे अध्यक्ष शरद भाकरे यांनी केली.

## दृढ निश्चयातून समाजाला दिशा देण्याचे कार्य : झिरपे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाजकार्यात महिला शक्ती किती सक्षम असू शकते हे 'स्नेहाधार गौरव पुरस्कारा'तून समाजापुढे येत आहे. सामाजिक कार्यातून समाजाला दिशा व प्रेरणा मिळते. सामाजिक क्षेत्रात समाजकंटक मोठ्या प्रमाणात त्रासदायक ठरतात. परंतु विरोधाला न डगमगता, दृढ निश्चयाने कार्यरत असणाऱ्या वासंती देव आणि मनिषा पवार यांचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन निष्णात गिर्यारोहक, गिरीप्रेमी संस्थेचे संस्थापक उमेश झिरपे यांनी केले.

स्नेहालय, अहिल्यानगर संचलित स्नेहाधार पुणे परिवारातर्फे 'स्नेहाधार गौरव पुरस्कारां'चे वितरण झिरपे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. निवारा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात पेण येथील 'अहिल्या महिला मंडळ'च्या संस्थापिका वासंती श्रीकांत देव आणि कळसंबर (ता. बीड) येथे 'आपला परिवार' वृद्धाश्रमाची स्थापना करणाऱ्या मनीषा भाऊराव पवार यांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी होते. प्रसिद्ध व्यावसायिक कृष्णा राजाराम अष्टेकर यांची विशेष उपस्थिती होती. स्नेहाधार परिवार, पुणेच्या सहसंचालिका गौरी पाळंदे मंचावर होत्या.



पुणे 'स्नेहाधार गौरव पुरस्कार' वितरण सोहळ्यात उपस्थित (डावीकडून) गौरी पाळंदे, मनीषा पवार, उमेश झिरपे, वासंती देव, सुहास मापारी, कृष्णा राजाराम अष्टेकर.

# देशाला आकार देण्यात आर्किटेक्टची भूमिका महत्वपूर्ण -अभय पुरोहित




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बांधकाम क्षेत्रात नवीन पद्धतीचे प्रकल्प स्पर्धात्मक भावनेने उभे रहात आहे. देशाच्या प्रत्येक शहरात पायाभूत सुविधा निर्माण होत असून, त्यामध्ये आर्क्टिकेट बहुमूल्य योगदान देत आहेत. इंजिनिअर आणि आर्क्टिकेट यांची देशाला नवीन आकार देण्यात महत्वपूर्ण भूमिका आहे," असे प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरचे अध्यक्ष आर्कि. अभय पुरोहित यांनी केले.

आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनतर्फे (एईएसए-एसा) आयोजित 'एईएसए वार्षिक पुरस्कार' वितरण सोहळ्यात पुरोहित बोलत होते. एनडीए रस्त्यावरील रॉयल कोर्ट बँक्वेट्स येथे झालेल्या या सोहळ्यावेळी आर्कि. संजय तासगावकर, 'एईएसए'चे चेअरमन आर्कि. महेश बांगड, अध्यक्ष आर्कि. राजीव राजे, संयोजक इंजि. पराग लकडे, आर्कि. विश्वास कुलकर्णी, इंजि. जयंत इनामदार आदी उपस्थित होते. प्रसंगी पुरोहित यांच्यासह विनायक पै व अशोक बेहेरे यांना 'एईएसए'चे मानद सदस्यत्व सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

आर्कि. अंकुर कोठारी यांना 'रोहन यंग अचिवर्स अवॉर्ड', फिनिक्स अकीला टॉवरला पुणे शहराबाहेरील 'नॉन रेसिडेन्शियल प्रकल्प बांधणी पुरस्कार', आर्कि. राहुल गोरे (हाउस ऑफ अँम्बी व्हॅली) यांना 'सिंगल रेसिडेशनशियल प्रकल्प बांधणी पुरस्कार', आर्कि. ओंकार काळे यांना पुण्यात 'नॉन रेसिडेन्शियल हॉस्पिटॅलिटी प्रकल्प बांधणी पुरस्कार', आर्कि. रवी कान्हेरे यांना 'नॉन रेसिडेन्शियल पब्लिक अँड कल्चर पुरस्कार', आर्क्टि. हेमंत महाजन यांना 'नॉन रेसिडेन्शियल अडॅप्टिव रियूज प्रकल्प पुरस्कार' व 'रेसिडेन्शियल सिंगल फॅमिली होम पुरस्कार', पुण्यातील 'सिंगल रेसिडेन्शियल प्रकल्प पुरस्कार' आर्कि. दर्शन मेढी, आर्कि. विनोद दुसिया यांना 'पुणे रेसिडेन्शियल स्टँड अलोन मल्टी टेनिमेंट बिल्डिंग पुरस्कार', तर आर्कि. सितेश अग्रवाल यांना 'रेसिडेन्शियल ग्रुप हौसिंग पुरस्कार' प्रदान करण्यात आला.


> व्यावसायिकांनी एकत्रितपणे चांगले काम केल्यास कोणतेही काम मोठे किंवा छोटे असा भेदभाव राहत नाही. पुढील चार दशकात देश मोठ्या प्रमाणात विकास साधणार आहे. त्याचे साक्षीदार व साथीदार होण्याची संधी आपल्याला आहे..
> **—आर्कि.अभय पुरोहित**

## विद्यार्थ्याचा खाणीत बुडून दुर्दैवी मृत्यू

**येरवडा :** विमाननगर येथे राहणाऱ्या आणि अकरावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा पोहोताना बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी दुपारी घडली. त्याच्यासोबत पोहण्यासाठी गेलेल्या दुसऱ्या एका मुलाला बुडताना वाचवण्यात यश आले आहे.

विमानतळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत विद्यार्थ्याचे नाव सौरभ संजय बोदक (वय 16, रा. म्हाडा कॉलनी, विमाननगर) असे आहे. सौरभ आणि त्याचे इतर चार मित्र शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास लोहगाव विमानतळाशेजारी असलेल्या दगड खाणीत मित्रांसोबत पोहण्यासाठी गेले होते.

सौरभला पोहोता येत नसल्याने थर्माकोलच्या साह्याने तो आणि त्याचा मित्र पोहण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी थर्माकोलवरील तोल जाऊन खोल पाण्यात ते दोघे बुडू लागले. त्यातील एका मित्राला वाचवण्यात आले. परंतु तोपर्यंत सौरभ खोल पाण्यात बुडाला. धानोरी येथील अग्निशामक दलाच्या जवानांनी दोन तासानंतर सौरभला पाण्यातून बाहेर काढले. त्यानंतर त्याला उपचाराकरिता ससून रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले.



## महिलेचा विनयभंग; एकाविरुध्द गुन्हा

**पुणे :** महिलेचा पाठलाग करून तिला अश्लील मेसेज करणाऱ्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महंमदवाडी परिसरात गेल्या तीन महिन्यांपासून हा प्रकार सुरू होता. महिलेने याबाबत काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सचिन सोमनाथ जांभूळकर (वय २२, रा. भैरोबानाला, सोलापूर रस्ता) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा फिर्यादी यांना सातत्याने फोन करून त्रास देत होता. त्यानंतर त्याने फिर्यादी यांच्याकडे शरीर सुखाची मागणी केली. १८ ऑक्टोंबर २०२४ ला त्याने फिर्यादी यांची गाडी अडविण्याचा प्रयत्न करून घरापर्यंत पाठलाग केला. फिर्यादी यांच्याशी अश्लील कृत्य केले. दरम्यान, जांभूळकरवर यापूर्वी एका ज्येष्ठ नागरिकांकडे खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल आहे.



## चार सराईतांना अटक, पिस्तूल व काडतुसे जप्त

**वाघोली :** खंडणी विरोधी पथक दोनने वाघोलीतील बकोरी रस्त्यावरील एका सदनिकेवर छापा टाकून चार सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चार पिस्तूल व आठ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत.

अमन ऊर्फ मुन्ना दस्तगीर पटेल (रा. बकोरी फाटा, वाघोली), इशाप्पा ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी (रा. गोकूळ पार्क, वाघोली) गोपाळ संजय यादव (रा. वाघोली) व देवानंद शिवाजी चव्हाण (रा. शिरूर) अशी अटक केलेल्या चौघांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिस उपनिरीक्षक गौरव देव व हवालदार अनिल कुसाळकर यांना हे चार जण वाघोलीत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी सापळा रचून सदनिकेत छापा टाकला. पोलिस निरीक्षक छगन कापसे, उपनिरीक्षक गौरव देव, कर्मचारी सुनील पवार, अनिल कुसाळकर, चेतन आपटे, अजिनाथ येडे, अमोल घावटे यांनी ही कामगिरी केली.



## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; एकास शिक्षा

**पुणे :** अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा आदेश दिला.

भीमराव मुकिंदा कांबळे (वय २७, रा. सांडस, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर परिसरात २०१८ मध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली होती. या प्रकरणी कांबळे याच्यावर हडपसर पोलिस ठाण्यात लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात तपासी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलिस निरीक्षक कल्याणी शिंदे यांनी काम पाहिले

## माजी नगरसेवकाचा 'प्रताप'...!



**पुणे** शहरातील काळभोर नगर मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर अनेकांनी दुचाकी पार्क केल्या होत्या. राजू दुर्गे यांनी त्या दुचाकी आडव्या पाडल्या असून मोबाईलमध्ये व्हिडिओ रेकॉर्ड केला आहे.

## माजी नगरसेवकाचा प्रताप, पार्किंगच्या गाड्या पाडल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी- चिंचवड मध्ये भाजपचे माजी नगरसेवक राजू दुर्गे यांचा एक प्रताप समोर आला आहे. या संदर्भात राजू दुर्गे यांनी स्वतः फेसबुक पोस्ट करत माहिती दिली आहे. शहरातील काळभोर नगर मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर अनेकांनी दुचाकी पार्क केल्या होत्या. राजू दुर्गे यांनी त्या दुचाकी आडव्या पाडल्या असून मोबाईलमध्ये व्हिडिओ रेकॉर्ड केला आहे. अनेकांना प्रश्न पडला आहे. की राजू दुर्गे यांनी असं का? केलं. यावर त्यांनी फेसबुक पोस्ट करत माहिती दिली आहे.

काळभोर नगर प्रभाग क्रमांक १४ या ठिकाणी नामांकित कंपनीचं सर्विस सेंटर आणि शोरूम आहे. यामुळे त्या रस्त्यावर अनेक दुचाकी आणि चार चाकी पार्क केल्या जातात. काळभोर नगर मध्ये प्रवेश करणाऱ्या नागरिकांना याचा अडथळा निर्माण होतो. यामुळे अनेक नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. अनेकदा नागरिकांचे वाद देखील झाले आहेत. असं राजू दुर्गे यांनी फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं आहे. आज मात्र माझा राग अनावर झाला. प्रचंड मानसिक त्रास झाल्यामुळे शोरूम समोर पार्क केलेल्या दुचाक्या आडवा केल्या अस राजू दुर्गे यांनी म्हटलं आहे.

# शिवाजीनगर येथे 'न्याय आपल्या दारी'

### दोन मजले खाली उतरून न्यायाधीशांनी दिला दिव्यांग महिलेला न्याय

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत गुन्ह्यांची आणि त्यातून न्यायालयातील खटल्यांची संख्या खूपच वाढली आहे; हे वास्तव असले तरी त्या तुलनेत केवळ राज्यातच नव्हे तर देशातील न्यायालयात न्यायाधीश आणि कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यातूनच पक्षकारांना न्याय मिळण्यासाठी 'तारीख पे तारीख'चा सामना करावा लागत आहे; त्यामुळे न्यायालयाची पायरी चढायला 'नको रे बाबा' असे गंमतीने म्हणले जाते. मात्र; पुण्यात राष्ट्रीय लोकअदालतीत एका दिव्यांग शेतकरी महिलेला न्याय देण्यासाठी चक्क न्यायाधीशच दोन मजले खाली उतरून आले. त्यांच्या या कृतीने ही दिव्यांग महिलाच काय भले भलेही चकित झाले.

> संबधित दिव्यांग शेतकरी महिलेची व्यथा तिच्या वकिलांनी न्यायालय आणि पॅनेलच्या निदर्शनास आणून दिली; त्यामुळे माणुसकीच्या भावनेतून दोन मजले खाली येऊन आम्ही या महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. या महिलेला न्याय मिळाल्याने आम्हाला त्याचे निश्चितच समाधान आहे.
>
> **-ॲड. अतुल गुंजाळ,** पॅनेल न्यायाधीश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेचा प्रत्यय शनिवारी शिवाजीनगर न्यायालयात आला. न्याय मिळविण्यासाठी एरवी पक्षकारांना न्यायालयाची पायरी चढावी लागते. मात्र, अपघातात अपंगत्व आलेल्या शेतमजूर महिलेला न्याय देण्यासाठी न्यायाधीश दोन मजले उतरून खाली आले. तिचे म्हणणे ऐकून घेत तिला न्यायही दिला. तिला १५ लाख रुपये देण्याचे मान्य करण्यात आले. राष्ट्रीय लोकअदालतीत न्यायालयाची एक वेगळी बाजू पक्षकारांना पहायला मिळाली.

सुनिता अनिल गायकवाड असे अपंग शेतमजूर महिलेचे नाव आहे. सप्टेंबर २०२१ मध्ये वारजे भागातील माई मंगेशकर रुग्णालय परिसरातून रस्ता ओलांडत असताना सुनिता यांना मोटारीने धडक दिली. अपघातात त्यांना अपंगत्व आले. याप्रकरणात नुकसान भरपाई मिळावी, यासाठी त्यांनी ॲड. स्मिता पाडोळे यांच्यामार्फत त्यांनी येथील मोटार अपघात न्यायप्राधिकरणात दावा दाखल केला. राष्ट्रीय लोकअदालतीत मोटार अपघात न्यायप्राधिकरणाचे प्रमुख सदस्य जिल्हा आणि सत्र न्यायाधीश बी. पी. क्षीरसागर आणि ॲड. अतुल गुंजाळ यांच्या पॅनल पुढे हा दावा तडजोडीसाठी ठेवला होता.

राष्ट्रीय लोकअदालतीत सहभागी होण्यासाठी सुनिता या रिक्षामधून शिवाजीनगर येथील जिल्हा सत्र न्यायालयातील नवीन इमारतीसमोर झाल्या. मणक्याला दुखापत झाल्याने त्यांना दुसऱ्या मजल्यावर जाणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी सत्र न्यायाधीश बी.पी. क्षीरसागर आणि पॅनेल न्यायाधीश ॲड. अतुल गुंजाळ दुसऱ्या मजल्यावरून खाली उतरले. नवीन इमारतीसमोर रिक्षात असलेल्या गायकवाड यांची विचारपूस केली. ॲड. स्मिता पाडोळे यांच्यामार्फत गायकवाड यांनी त्यांचे म्हणणे पॅनेल पुढे मांडले. सत्र न्यायाधीश क्षीरसागर यांनी आस्थेने चौकशी करुन न्यायालयीन प्रक्रिया मार्गी लावली. ॲड. पाडोळे यांना ॲड. शीतल शिंदे आणि ॲड. स्नेहा भोसले यांनी सहकार्य केले.

## नियमाचे उल्लंघन; रेस्टॉरंटला दणका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीच्या निर्देशानुसार, भारतातील सर्व हॉटेल्स व रेस्टॉरंटचालकांना ग्राहकांकडून सेवा शुल्काची वसुली न करणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमाचे उल्लंघन करून ग्राहकाला त्रुटीयुक्त सेवा दिल्याप्रकरणी अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने बाणेरच्या 'द टेंथ फ्लोअर रेस्टॉरंट'ला दणका दिला आहे. हॉटेलने तक्रारदारांकडून सेवा शुल्कापोटी घेतलेले

७२७ रुपये तसेच नुकसानभरपाईपोटी आणि तक्रारीच्या खर्चापोटी एकत्रितपणे १० हजार रुपये तक्रारदाराला द्यावेत, असे आदेश आयोगाने दिले आहेत. आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर, सदस्या सरिता पाटील आणि शुभांगी दुनाखे यांनी हा निकाल दिला.

आदेशाची प्रत मिळाल्यापासून ४५ दिवसांच्या आत ही रक्कम न दिल्यास ७२७ रुपयांवर वार्षिक ८ टक्के व्याज आकारण्यात येईल, असेही निकालात नमूद करण्यात आले आहे. याबाबत नारायण पेठेत राहणारे सत्येंद्र राठी यांनी बाणेर रस्त्यावर असलेल्या 'द टेंथ फ्लोअर' या रेस्टॉरंटविरोधात तक्रार दिली होती.

तक्रारदार राठी हे 16 जानेवारी 2022 रोजी 'द टेंथ फ्लोअर' या रेस्टॉरंटमध्ये सहकुटुंब जेवण करायला गेले होते. त्याचे एकूण ८हजार ३० रुपये बिल झाले होते. ज्यात पाच टक्के व्हॅट आणि दहा टक्के सेवा शुल्क आकारण्यात आले होते. सेवाकर भरणे ही प्रत्येक ग्राहकाची वैयक्तिक निवड आहे, असे सांगूनही रेस्टॉरंटने राठी यांना सेवा शुल्क भरायला लावले व त्यांच्याशी गैरवर्तन केले.

या प्रकरणात रेस्टॉरंटने सेवा शुल्क म्हणून घेतलेले ७२७ रुपये आणि त्यांना मानसिक त्रासाची नुकसानभरपाई मिळावी, यासाठी तक्रारदार यांनी ॲड. श्याम माहेश्वरी यांच्यामार्फत आयोगात तक्रार दाखल केली होती. तक्रारदार यांनी स्वेच्छेने सेवाकर दिला असून, तो देण्याबाबत त्यांच्यावर दबाव आणला नाही. 'बिलावर 10 टक्के सेवा शुल्क आकारण्यात येईल, हे आम्ही आधीच ग्राहकाला सांगतो आणि मेन्यू कार्डवरही त्याचा उल्लेख करण्यात आला आहे,' अशी भूमिका रेस्टॉरंट व्यवस्थापकाने घेतली होती.

केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीच्या निर्देशानुसार, भारतातील सर्व हॉटेल्स व रेस्टॉरंटची ग्राहकांकडून सेवा शुल्काची वसुली न करण्याची जबाबदारी आहे. हा नियम हॉटेल आणि रेस्टॉरंटचालकांना बंधनकारक असूनही, त्यांनी नियमांचे उल्लंघन करून ग्राहकाला त्रुटीयुक्त सेवा दिली आहे.

## पिंपरीत उच्चशिक्षित तरूणाला अटक; ६ लाखांचा १० किलो गांजा जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी- चिंचवडमध्ये गांजा विक्री करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला अंमली पदार्थ विरोधी पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. हरीश मगन सोनवणे अस अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून सहा लाखांचा १० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हरीश सोनवणे हा उच्चशिक्षित आहे. तो पिंपरी-चिंचवड मध्ये कंत्राट पद्धतीवर नोकरी करतो. त्याचा भाऊ देखील उच्चशिक्षित असून स्पोर्ट टीचर आहे. पैशांच्या हव्यासापोटी हरीश सोनवणे ने गांजा विक्री करत होता.

हरीश सोनवणे च मूळ गाव हे मध्यप्रदेशाच्या बॉण्ड्री वर असलेल्या धुळे जिल्ह्यातील शिरपूर गाव आहे. मध्यप्रदेश मधून त्याने गांजा आणला असल्याचा अंदाज पोलिसांना आहे. सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळे सौदागर परिसरातील प्रथम वाईनच्या समोर उभा राहून तो गांजा विक्री करण्याचा प्रयत्न करत होता. दुचाकी वरील बसलेल्या हरीश च्या पाठीवर सॅग आणि पुढे ट्रॅव्हल बॅग मध्ये दहा किलो गांजा होता. याबाबतची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस कर्मचारी विजय दौंडकर आणि कलाटे यांना मिळाली.

पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एक टीम तयार करण्यात आली. तात्काळ घटनास्थळी पोहचले. पिंपळे सौदागर मधील प्रथम वाईनच्या समोर हरीश सोनवणे हा दुचाकी वर बसलेला असताना त्याला ताब्यात घेतलं. त्याची पंचासमोर झडती घेण्यात आली. त्याच्या बॅगेमध्ये दहा किलो गांजा आढळला आहे. हा गांजा मध्यप्रदेशातून आणला असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात हरीश सोनवणे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड यांच्या टीम ने केली आहे.




**पुणे** चिंचवडमध्ये गांजा विक्री करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला अंमली पदार्थ विरोधी पथकाने बेड्या ठोकल्या आहेत.त्याच्याकडून सहा लाखांचा १० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

# मुक्तछंद म्हणजे स्वातंत्र्य आहे; स्वैराचार नाही : डॉ. सदानंद मोरे




**पुरस्कार**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुक्तछंद म्हणजे स्वातंत्र्य आहे; स्वैराचार नाही. ज्या कविंना आपले विचार कोणत्याही छंदात, वृत्तात मावत नाहीत, छंदांचे बंधन वाटते त्यांनीच मुक्तछंदात काव्य लिहावे. कविता प्रकार अत्यंत सोपा आहे, असे आजच्या काळातील कवींना वाटते. त्यामुळेच कुणीही उठतो आणि कवी होतो. यातूनच कवींची बहुतेकवेळा अवहेलना, टिंगल, चेष्टा होते आणि कविता या साहित्यप्रकाराला तसेच कवीला गांभीर्याने घेतले जात नाही, अशी स्पष्टोक्ती महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केली.

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य जीवनगौरव पुरस्काराने 'वृत्तबद्ध कविता : कला आणि शास्त्र' या ग्रंथाच्या लेखिका आणि ज्येष्ठ कवयित्री वर्षा कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे वितरण डॉ. मोरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, कार्याध्यक्ष मैथिली आडकर मंचावर होते.

आजच्या कवींना ओवीबद्ध, छंदबद्ध लिखाणाचे तंत्र, शास्त्र अवलंबावे असे वाटत नाही, असे नमूद करून डॉ. मोरे म्हणाले, अशा परिस्थितीत वृत्तबद्ध कविता : कला आणि शास्त्र या पुस्तकातून कविता या साहित्य प्रकाराविषयी मोलाची माहिती लोकांसमोर आणण्याचे कार्य वर्षा कुलकर्णी यांनी केले आहे. प्रास्ताविकात ॲड. प्रमोद आडकर यांनी पुरस्कार वितरण सोहळ्याविषयी माहिती सांगितली. परिचय आणि सन्मानपत्राचे वाचन प्राजक्ता वेदपाठक यांनी केले तर सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आयोजित कविसंमेलनात प्रभा सोनवणे, स्वप्नील पोरे, तनुजा चव्हाण, वैजयंती आपटे, नचिकेत जोशी, मिलिंद छत्रे, डॉ. मृदुला कुलकर्णी-खैरनार, डॉ. मंदार खरे, डॉ. ज्योती रहाळकर, ज्योती उटगीकर-देशपांडे, सुजाता पवार यांचा समावेश होता. सूत्रसंचालन निरुपमा महाजन यांनी केले.

> काव्य लेखन करताना कवितेचा आशय, आत्मा, कला आणि शास्त्र यांचा संगम करत काव्याचे बीज पुरेसे रुजल्यानंतर बहरू द्यावे. आयुष्यभर विद्यार्थी राहून संपूर्णत्वाचा अट्टाहास न धरता कला व्रत म्हणून जोपासली जावी..
>
> **— वर्षा कुलकर्णी,** ज्येष्ठ लेखिका, कवयित्री

संपादकीय विशेष

# व्यापारसंधी जपताना...

अलिकडे काही देशांमधील युद्धजन्य परिस्थिती, युरोपमधील अस्थिरता आणि अमेरिकेच्या बदललेल्या तसेच 'अमेरिका फर्स्ट' धोरणाच्या कठोर अंमलबजावणीच्या परिणामस्वरुप जवळपास सर्वच राष्ट्रांची बाहेरुन घेतलेली कर्जे वाढत आहेत. अशा वाढीव कर्जांचा भार पडल्यामुळे त्यांचे उत्पादन आणि मागणी-पुरवठ्याची स्थिती प्रभावित झाली असून अर्थव्यवस्था गर्तेत जाण्याचा धोका आहे. या स्थितीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज जाणवते. अलिकडे कामगारांच्या विविध क्षेत्रांमध्ये बरेच बदल झाले आहेत. काही क्षेत्रातील कामगारांना चांगले दिवस आहेत तर काही क्षेत्रात स्थिती चताजनक आहे. खेरीज ग्राहकांच्या सवयीदेखील बदलत आहेत. डिजिटल व्यवहार, ई-कॉमर्स, वर्क फ्रॉम होम यासारख्या बाबी अधिक प्रमाणात स्विकारल्या जात असल्यामुळेही एकंदरच अर्थव्यवस्थेवर परिणाम दिसत आहेत.

यातील सगळ्यात मोठा परिणाम ट्रम्प यांच्या आक्रमक आर्थिक धोरणांच्या अनुषंगाने बघायला हवा. कारण त्यांनी राबवण्यास सुरूवात केलेले विविध राष्ट्रांसंदर्भातील प्रशुल्काचे (टॅरिफ) धोरण भीतीमध्ये भर घालत असून जागतिक वातावरण अस्थिर करण्यातील त्याचा वाटा मोठा आहे. परिणामी मंदीची चता दाटत आहे. भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांमध्ये तर ही चता अधिक गहिरी होताना दिसते. शेअर बाजारात सातत्याने दिसून येणारी घसरण, डॉलरपुढे सातत्याने घसरणाऱ्या रुपयाच्या चढ-उताराची तौलनिक स्थिती, रुपयाच्या गटांगळ्या या सर्व परिस्थितीद्वारे आपण भारतात ही स्थिती अनुभवतच आहोत. त्याचप्रमाणेच अलिकडेच ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडा या दोन देशांकडून आयात होणाऱ्या वस्तूंवरील प्रशुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवरील शुल्कही जवळपास दुपटीने वाढवले आहे. येत्या एक एप्रिलपासून ते आणखी वाढवण्याचे संकेतही मिळत आहेत. वॉरेन बफेट या जगातील सर्वात मोठ्या आणि हुशार गुंतवणूकदाराने अलिकडे केलेले एक विधान या दृष्टीने विचारात घ्यावे लागेल, कारण ट्रम्प यांची सध्याची वर्तणूक आपल्याला जागतिक युद्धाकडे नेणारे आहे, असे त्यांनी केलेले प्रतिपादन धोक्याची दाट छायाच दाखवून जाते.

कॅनडा, मेक्सिको आणि चीन या तीनच देशांच्या अमेरिकेशी असणाऱ्या व्यापाराचा विचार करायचा तर तोच जवळपास दोन हजार 20 कोटी डॉलरच्या घरात असल्याचे दिसते. म्हणजेच अमेरिकेच्या आक्रमक पावित्र्याचा परिणाम या देशांमधील आर्थिक उलाढालीवर अगदी थेट होणार असल्याचे उघड आहे. भारताचा अमेरिकेशी असणारा व्यापार सुमारे एक हजार 900 कोटी डॉलर्स इतका आहे. स्वाभाविकच आपल्यावरही त्याचा परिणाम दिसणार आहे. दुसरीकडे, ट्रम्प यांच्या या धोरणामुळे अमेरिकेतील महागाईदेखील वाढत जाणार आहे स्वाभाविकच अशा पद्धतीने महागाई वाढल्यास ती कमी करण्यासाठी यूएस फेडरल रिझर्व्ह सिस्टीमला व्याजदर कमी करावा लागेल. या गोष्टीला अजून वेळ असला तरी ही बाब अटळ वाटते. पण एकदा तिथे व्याजदर कमी झाला की आपल्याकडील व्याजदर अधिक आकर्षक वाटेल आणि गुंतवणूकदार आपल्याकडे आकृष्ट होतील. अलिकडेच अमेरिकेच्या वाणिज्य मंत्र्यांनी तसेच खुद्द ट्रम्प यांनी भारताकडून आकारले जाणारे आयात शुल्क सर्वात जास्त असल्याचे सांगितले. त्यामुळेच भारताबरोबर व्यापार करणे कठीण असल्याचे त्यांचे प्रतिपादन चर्चेत राहिले. इथे लक्षात घ्यायला हवे की, मोठा व्यापारी भागीदार असल्यामुळे अमेरिकेशी असणारा भारताचा व्यापार महत्त्वाचा आहे. मुख्य बाब म्हणजे आयात-निर्यातीतील फरक भारताच्या दृष्टीने फायदेशीर आहे. मात्र अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क वाढवले तर परिस्थिती बदलू शकते. इलेक्ट्रॉनिक्स, दागदागिने, शेती उत्पादने, धान्य, कपडे या सगळ्या क्षेत्रांमध्ये आपण अमेरिकेकडून विविध प्रकारची सामग्री आयात करतो. त्यावरील करशुल्कांमुळे काही बदल घडले तर सर्व क्षेत्रांमध्ये परिणाम बघायला मिळेल. म्हणूनच काही तज्ज्ञांच्या मते, भारताला आपले आयात शुल्क कमी करावे लागले तरी हरकत नाही. भारताने हा निर्णय घ्यायला हवा, कारण वाढीव ड्युटी कमी न केल्याचा दुष्परिणाम विविध क्षेत्रांप्रमाणेच भारतीय अर्थव्यवस्थेवरही होऊ शकतो. अलिकडेच ट्रम्प यांनी भारताने आयात शुल्क कमी केले असल्याचे नमूद केले आहे. अर्थात सरकारकडून त्याची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र तसे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसरी बाब म्हणजे ट्रम्प यांनी उत्पादनावर आयात शुल्क न आकारता विशिष्ट क्षेत्रासाठी समान आयात शुल्क आकारले जावे, असे मत व्यक्त केले आहे. म्हणजेच धान्याचे क्षेत्र घेतले तर गहू आणि तांदूळ या दोन प्रकारांवर आकारले जाणारे आयात शुल्क वेगळे असू शकते. मात्र ट्रम्प यांच्या मते तांदूळ, गहू, डाळी, तेल या सगळ्यावर एकच शुल्क आकारले जावे. याव्यतिरिक्त याच पद्धतीने इलेक्ट्रॉनिक्समधील लहानापासून मोठ्या वस्तूंवर एकच शुल्क आकारले जावे. आता अमेरिकेची ही मागणी भारत मान्य करतो का, हे पहावे लागेल, कारण दोन उत्पादनांच्या आयात शुल्कामध्ये फरक असतो. अमेरिकेशी संबंध जपण्यासाठी काही प्रमाणात आयात शुल्क कमी करावे लागल्यास होणारे उद्योगांचे नुकसान टाळण्यासाठी केंद्र सरकारला आर्थिक पाठबळ पुरवावे लागेल. तेव्हा लवकरच या धोरणांचा विचारही केला जाईल.

चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अलिकडेच एक महत्त्वपूर्ण निवेदन दिले आणि भारत-चीन संबंधांमध्ये फरक पडल्याची कबुली दिली. गेल्या वर्षी नरेंद्र मोदी आणि चीनच्या अध्यक्षांची रशियामध्ये भेट झाली होती. त्यावेळी कदाचित त्यांच्यामध्ये झालेली चर्चा अशा प्रकारे फलद्रुप होत आहे, असे आपण म्हणू शकतो. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा चांगला परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, बांगलादेशमध्ये अस्थिरता राहिल्यास भारत त्याची जागा घेऊ शकतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तयार कपड्यांमध्ये बांगलादेशाचा वाटा 12 टक्के असून आपला वाटा चार टक्के इतका आहे. आपण हा आठ टक्क्यांचा फरक सहज भरुन काढू शकतो. अर्थातच त्यासाठी सरकारने या उद्योगांना साह्य करावे लागेल. म्हणजेच अस्थिरता असली तरी भारत संधींचे सोने करुन परिस्थिती आपल्यासाठी अनुकूल करुन घेऊ शकतो.

# प्रदूषणामुळे १३१ शहरांचा कोंडला श्वास

**भारतातील सर्वाधिक प्रदूषण करणारे सुमारे 80 टक्के कारखाने उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये आहेत. पर्यावरण वाचवण्यासाठी कडक नियम आखले जात असताना आर्थिक चणचण आणि सरकारी दबावामुळे अनेक कारखाने अडचणीत आले असले तरी 131 शहरांमधील हवेत श्वास घेणे म्हणजे साक्षात विष प्राशन करण्यासारखे असल्याचे म्हटले जात आहे. 23 मार्चच्या हवामान दिनाच्या पार्श्वभूमीवर घेतलेला या गंभीर प्रश्नाचा मागोवा.**

पर्यावरण

मिलद बेंडाळे,
पर्यावरण अभ्यासक

भारतातील औद्योगिक विकास देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नवे कारखाने, नवे रस्ते, नवी शहरे वसवली जात आहेत; पण सोबतच प्रदूषणाची समस्या बनली आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका अहवालात दिसून आले आहे, की भारतातील सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांपैकी सुमारे 80 टक्के कारखाने दोन राज्यांमध्ये आहेत. या राज्यांमधील अनेक कारखाने जुन्या पद्धतीने चालत असून त्यामुळे अधिक प्रदूषण होत आहे. अनेक वेळा प्रदूषण कमी करण्यासाठी घालून दिलेले नियम कारखाने पाळत नाहीत. त्यामुळे समस्या आणखी वाढतात. या राज्यांमधील लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यातून निघणारा धूर, घाण पाणी आणि कचरा आपल्या आजूबाजूचे वातावरण प्रदूषित करत आहे. त्यामुळे श्वास घेण्यात अडचण, डिहायड्रेशन, आजार यासारख्या समस्या वाढत आहेत. देशात असे 3519 कारखाने आणि संयंत्रे आहेत, जे सर्वाधिक प्रदूषण करणारे उद्योग (ग्रॉस पोल्युटिंग इंडस्ट्रीज- जीपीआय) मानले जातात. हे उद्योग कठीण टप्प्यातून जात आहेत. त्यांना शासनाचे नियम पाळावे लागतात. पर्यावरण वाचवण्याच्या उपायांकडे लक्ष द्यावे लागते आणि त्याचबरोबर त्यांना आपले आर्थिक अस्तित्व टिकवून ठेवायचे असते. या उद्योगांसमोर तीन मोठी आव्हाने आहेत. प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने कायदे कडक केले आहेत. उद्योगांमधून निघणारा धूर, रसायने आणि घाण पाणी यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे.

नवीन सरकारी नियमांचे पालन करण्यासाठी उद्योगांना अधिक खर्च करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. देशाच्या 'जीपीआय'मध्ये एकट्या उत्तर प्रदेशचा वाटा 47 टक्के आहे. त्यामुळे हे राज्य भारतातील औद्योगिक प्रदूषणाचे सर्वात मोठे केंद्र बनले आहे. हरियाणा दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे एकूण 1140 जीपीआयपैकी 174 ने स्वतःहून काम करणे थांबवले आहे; पण चांगली गोष्ट म्हणजे उर्वरित 966 कारखान्यांपैकी 957 कारखाने पर्यावरणविषयक नियमांचे पालन करत आहेत. म्हणजेच हरियाणातील बहुतांश कारखाने आता प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत; मात्र छत्तीसगड आणि गुजरातमधील बहुतांश कारखाने अजूनही नियमांचे पालन करत नाहीत. छत्तीसगडमध्ये 29 पैकी 8 कारखाने पर्यावरणाला हानी पोहोचवत आहेत. संपूर्ण भारताबद्दल बोलायचे झाल्यास 81 टक्के (2849) 'जीपीआय' अजूनही चालू आहेत तर 19 टक्के कारखाने 670 स्वतः बंद झाले आहेत. आकडेवारी दर्शवते की 97 टक्के 'जीपीआय' पर्यावरणीय नियमांचे पालन करत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) नुसार, 'जीपीआय' कारखाने नदी किंवा नाल्यांमध्ये सांडपाणी सोडतात, घातक रसायने वापरतात किंवा ऑक्सिजनचे पाणी लक्षणीयरीत्या कमी करतात. पर्यावरण वाचवण्याची जबाबदारी केवळ केंद्र सरकारची नाही, तर राज्य सरकारांचीही त्यात महत्त्वाची भूमिका आहे.

आजघडीला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळा (एसपीसीबी) मार्फत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय देशभरातील औद्योगिक युनिट्सवर लक्ष ठेवते. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना यापुढे सोडले जाणार नाही, असा इशारा सरकारने दिला आहे. सर्व ग्रॉस पोल्युटिंग इंडस्ट्रीज (जीपीआय)चे 'ऑनलाईन कंटिन्युअस एफ्लुएंट मॉनिटरिंग सिस्टीम' (ओसीईएमएस) द्वारे रिअल-टाइममध्ये निरीक्षण केले जात आहे. याचाच अर्थ या कारखान्यांकडून नदी-नाल्यांमध्ये घाण पाणी सोडले जात असल्याचे दिसून येत आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या 21 कारखान्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून 73 कारखाने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी 55 उत्तर प्रदेशमध्ये तर पाच हरियाणामध्ये आहेत. 2022 ते 2024 पर्यंत 'सीपीसीबी'ने 268 औद्योगिक युनिट्सची तपासणी केली आहे. 'सीपीसीबी'ने अशा 17 युनिट्सची ओळख पटवली आहे, जिथे प्रदूषण पसरण्याची सर्वाधिक शक्यता आहे. त्यात रासायनिक उद्योग, साखर कारखाने, कापड उद्योग, कागद उद्योग आणि चर्मोद्योगांचा समावेश आहे. डिसेंबर 2024 मध्ये लोकसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर देताना सरकारने म्हटले



होते, की तपासणीदरम्यान एकूण 129 युनिट्स आढळून आली, जी पर्यावरण नियमांचे पालन करत नाहीत. या युनिट्सवर विविध प्रकारे कारवाई करण्यात आली. त्यातील पाच युनिट बंद करण्याचे आदेश देण्यात आले. 67 जणांना 'कारणे दाखवा' नोटीस किंवा तांत्रिक सूचना देण्यात आल्या. 'एसपीसीबी'ला 41 प्रकरणांमध्ये निर्देश देण्यात आले होते.

सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांमध्ये ब्रुअरीज (किण्वन उद्योगांसह) साखर कारखाना (खांडसरी वगळता) खतनिर्मिती संयंत्रे, कागद बनवण्याचे कारखाने (पल्पिंगसह किंवा त्याशिवाय) क्लोर-क्षार उद्योग, औषधनिर्मिती कारखाने (फक्त मूलभूत औषधे, फॉर्म्युलेशन वगळून) पेंट उत्पादन, कीटकनाशके तयार करणारे कारखाने (फॉर्म्युलेशन वगळता) तेल शुद्धीकरण, चामडे उद्योग, पेट्रोकेमिकल उद्योग (फक्त कच्चा माल वापरत नाही तर त्यांचे उत्पादनदेखील), सिमेंट उद्योग, थर्मल पॉवर प्लांट (वीज जनरेटर), लोह आणि पोलाद उद्योग (अयस्क/स्क्रॅप पासून एकात्मिक स्टील प्लांटपर्यंत), जस्त वितळवणारा कारखाना, तांबे वितळवणारे कारखाने, ॲल्युमिनियम स्मेल्टींग प्लांट्स यांचा समावेश असून त्यांना प्रदूषण मर्यादा ठरवून दिल्याचे सरकारचे म्हणणे आहे. 80 हून अधिक उद्योगांसाठी पर्यावरणीय मानके तयार करण्यात आली आहेत.

'एसपीसीबी' कारखाना चालवू शकतो, की नाही हे ठरवते आणि कारखाने नियमांचे पालन करत आहेत की नाही हेदेखील तपासतात. एखाद्या कारखान्याने नियम मोडल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते. प्रदूषण स्तरावर लक्ष ठेवण्यासाठी, सर्व 'जीपीआय'ला 'ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम' (ओईईएमएमएस) स्थापित करणे आवश्यक आहे. देशातील 131 शहरे अशी आहेत, जेथिल हवेत श्वास घेणे म्हणजे साक्षात विष प्राशन करण्यासारखे असल्याचे म्हटले जात आहे.

धक्कादायक म्हणजे देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आला आहे. दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश आहे. त्यानंतर तिसऱ्या क्रमाकांवर आंध्र प्रदेश आहे. सरकारने यापैकी सर्वाधिक 19 शहरांची आकडेवारी जाहीर केली आहे. लोकसभेमध्ये एका सदस्याने विचारलेल्या एका प्रश्नावर केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. देशातील 24 राज्यांमधील 131 शहरांतील प्रदूषणाची पातळी खूपच वाढली आहे. त्यापैकी 19 शहरे अधिक धोकादायक पातळीच्या प्रदूषणाचा सामना करत आहेत. या शहरांना 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' (एक्यूआय) मध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. या शहरातील 'एक्यूआय' पातळीचे सातत्याने निरीक्षण केले जात आहे. सरकारने 2025-26 पर्यंत या शहरातील प्रदूषण 40 टक्क्यांपर्यंत घटवण्याचे टार्गेट ठेवले आहे. हे टार्गेट 'नॅशनल एंबियंट एअर क्वालीटी स्टँडर्ड्स'नुसार निश्चित केले आहे. प्रदूषित शहरांपैकी बहुतांश शहरांची लोकसंख्या 80 लाखाहून अधिक आहे. महाराष्ट्रात 19 सर्वात जास्त प्रदुषित शहरे आहेत, उत्तर प्रदेशामध्ये 17, आंध्र प्रदेशमध्ये 13, पंजाबमध्ये 9, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि ओडीशातील प्रत्येकी सात शहरे सर्वाधिक प्रदूषित आहेत. अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बदलापूर, चंद्रपूर, जळगाव, जालना, कोल्हापुर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, पुणे, सांगली, सोलापुर, ठाणे, वसई, विरार आणि उल्हासनगर ही महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रदूषित शहरे बनली आहेत.

उत्तर प्रदेशमधील आगरा, प्रयागराज, अनपारा, बरेली, फिरोजाबाद, गजरौला, गाजियाबाद, गोरखपूर, झांसी, कानपूर, खुर्जा, लखनऊ, मोरादाबाद, नोएडा, रायबरेली, वाराणसी आणि मेरठ ही शहरे प्रदूषित आहेत. आंध्र प्रदेशमधील अनंतपूर, चित्तूर, एलुरू, गुंटूर, कडापा, कुरनूल, नेल्लोर, ओन्गोले, राजामुंद्री, श्रीकाकुलम, विजयवाडा, विशाखापट्टणम आणि विजयानगर, पंजाबमधील अमृतसर, डेरा बाबा नानक, डेरा बस्सी, गोबिंदगढ़, जालंधर, खन्ना, लुधियाना, नयानांगल आणि पटियाला ही शहरे प्रदूषित आहेत. या शहरांमधील प्रदूषण कमी करण्याचे आव्हान सरकारसमोर आहे.

करिअरवाटा

## व्हा व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट

तुमच्याकडे विविध प्रकारचे आवाज काढण्याचं कौशल्यं असेल तर मनोरंजनक्षेत्रात 'व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट' म्हणून प्रचंड संधी आहेत हे लक्षात घ्या. रुपेरी पडदा आणि टीव्हीसोबतच वेब वाहिन्यांसाठीही अशा कलाकारांची गरज लागते. हॉलिवूडपट हिंदीत डब होतात. दाक्षिणात्य चित्रपटही हिंदीत येतात. सध्याचं डबिंगचं क्षेत्र १५० कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. त्यामुळे 'व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट'या पर्यायाचा गांभीर्याने विचार करा. सध्या बॉलिवूड सेलिब्रिटींनाही व्हॉईस ओव्हरच्या कलेने भुरळ पाडली आहे. काही वर्षांपूर्वी प्रियांका चोप्रा, इरफान खान, अमिताभ बच्चन यांनी 'द जंगल बुक'च्या हिंदी व्हर्जनमध्ये डबिंगची जबाबदारी पार पाडली होती. सध्या या क्षेत्रात भरपूर पैसाही आला आहे. व्हिडिओ, ऑडिओ बुक्स तसंच इतर माध्यमांमुळे व्हॉईस ओव्हर आर्टिस्टना भरपूर काम मिळू लागलं आहे. ऑनलाईन लर्निंग व्हिडिओजनाही आवाज द्यावा लागतो. ॲनिमेशनचं क्षेत्र तर व्हॉईस ओव्हर आर्टिस्टची वाट बघत असतं. जाहिराती, माहितीपट, लघुपट विविध भाषांमध्ये जातात. मल्टीमीडियातही आवाजाला महत्त्व आहे. त्यामुळे आवाजावर हुकूमत असेल तर या क्षेत्रातील सुयोग्य संधी हेरा आणि यशवंत व्हा.



खेचाखेची

## म्हणून नको...


**बायको** : आपल्याला संध्याकाळी लेकासाठी मुलगी बघायला जायचं होतं तो बेत आता रद्द करू या.

**नवरा:** का? ठरलेला कार्यक्रम रद्द करण्याएवढं काय झालं आहे?

**बायको:** – असं तर काही खास कारण नाही. पण... मघाशीच अशी माहिती माझ्या कानावर आली आहे की, मुलीची आई आणि तुम्ही शाळेत एकाच वर्गात शिकत होतात...

वेगळं काही

सोशल मिडियावर सध्या एका लुंगी स्कर्टचा बोलबाला आहे. एका प्रसिद्ध ब्रँडने हा लुंगी स्कर्ट तयार केला आहे. या फॅशनेबल स्कर्टची किंमत ऐकून तुम्ही थक्क व्हाल. हा स्कर्ट ५,७०० रूपयांना उपलब्ध आहे. हा एक फ्लाईंग स्कर्ट असल्याचं कंपनीचं म्हणणं आहे. साधी लुंगी २०० ते ३०० रूपयांना मिळते. त्यामुळे ५७०० रूपये खर्च करून हा लुंगी स्कर्ट कोण घेणार, अशी चर्चा सुरू आहे. अर्थात फॅशनमध्ये वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या महिला हा लुंगी स्कर्ट विकत घेतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. लुंगी वेगवेगळ्या रंगांमध्ये आणि डिझाइनमध्ये मिळते पण प्रत्यक्षात हा लुंगी स्कर्ट राखाडी रंगाचा आहे. तो एकाच रंगामध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.




राशीभविष्य

- **मेष** : प्रकृतीच्या तक्रारींकडे लक्ष द्या. गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. धनलाभाचे योग आहेत.
- **वृषभ** : रखडलेली कामं मार्गी लागतील. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावेत. आर्थिक स्थिती चांगली राहील.
- **मिथुन** : अर्धवट कामांमध्ये प्रगती होईल. नोकरीत कामाचा ताण वाढणार आहे. विचाराने रहायला हवं.
- **कर्क** : जुनी येणी पुन्हा रखडतील. आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. महत्त्वाच्या भेटी रखडतील.
- **सिंह** : परिचयातून कामं मार्गी लागतील. स्थावर प्रश्नाबाबत ज्येष्ठांचा सल्ला घ्यावा. बाकी चिंता नसावी.
- **कन्या** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. मुलांच्या प्रकृतीच्या तक्रारी संभवतात. खर्चाचं प्रमाण वाढेल.
- **तूळ** : व्यवसायात अडचणी येतील. नवे करार लांबणीवर पडतील. आध्यात्मिक कार्याकडे ओढा राहील.
- **वृश्चिक** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. आर्थिक बाबतीत विचारानं रहावं. वाहन काळजीपूर्वक वापरा.
- **धनु** : नव्या विचारांना चालना मिळेल. धरसोडीचं धोरण टाळायला हवं. मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील.
- **मकर** : नव्या ओळखींचा लाभ घ्यायला हवा. कामाचं योग्य मूल्यमापन होईल. रखडलेली कामं होतील.
- **कुंभ** : घर दुरूस्तीला चालना मिळेल. नव्या योजनांवर विचार करावा. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्या.
- **मीन** : अनावश्यक ताण वेळीच दूर करा. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. बाकी चिंता नसावी.

सल्ला मोलाचा

## थीम डेस्टिनेशन वेडिंग

डेस्टीनेशन वेडिंग करण्याच्या विचारात असाल तर पुढील गोष्टी लक्षात ठेवा. ✻ भाषेचा अडसर– इंग्रजी भाषा बोलल्या जाणाऱ्या देशांत भाषेचा अडसर जाणवत नाही पण जपान, स्पेन, जर्मनी सारख्या देशांमध्ये मात्र स्थानिक लोकांशी संवाद साधताना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. ✻ पदार्थांची उपलब्धता– भारताबाहेर डेस्टिनेशन वेडिंग करणार असाल तर भारतीय जेवणाची सोय उपलब्ध असेलच असं नाही. अशा वेळी भारतामधून खानसामा न्यावा लागू शकतो. त्यामुळे लग्नाचं बजेट वाढू शकतं. याशिवाय स्थानिक अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागू शकते. ✻ मेक अपकडेही लक्ष द्या– मेक अप करताना स्थानिक संस्कृती आणि हवामान यांचा विचार करून मेक अपची निवड करणं गरजेचं असतं. ✻ स्थानिक चालीरितींचा अंदाज घ्यावा– डेस्टीनेशन वेडिंग करताना तेथील स्थानिक चालीरितींचा अवलंब करूनही काही तरी हटके करू शकता. ✻ पाहुण्यांची ये–जा– डेस्टीनेशन वेडिंगचं ठिकाण दूरवर असेल तर अनेक पाहुणे ऐनवेळी येणं टाळू शकतात. त्यामुळे पाहुण्यांची यादी करताना येण्याची शक्यता पडताळून मगच तयारी करा.

दिनविशेष

## २४ मार्च

- २०१४ : अभिनेता कुलदीप पवार यांचे निधन.
- २०१५ : सर्वोच्च न्यायालयाने सायबर कायद्यातील वादग्रस्त तरतूद रद्द करण्याचे आदेश दिले.
- २०१६ : 'पीडीपी'च्या नेतेपदी मेहबूबा मुफ्ती यांची निवड.
- २०१७ : फरारी विजय मल्ल्याच्या प्रत्यार्पणास ब्रिटनची मंजुरी.
- २०१८ : राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांना पशुखाद्य गैरव्यवहाराशी संबंधित चौथ्या खटल्यात १४ वर्षे तुरुंगवास,. ६० लाखांचा दंड सुनावला.

नवं संशोधन

## शरीरातल्या उर्जेचा असाही वापर

अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटी ऑफ बफेलोच्या शास्त्रज्ञांनी मानवी शरीरातल्या उर्जेचा वापर करून गॅझेट्स चार्ज करू शकणाऱ्या टॅबची निर्मिती केली आहे. एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूच्या संपर्कात आल्यानंतर उत्तेजित होऊन ट्रायबोइलेक्ट्रिसिटीची निर्मिती करते. ट्रायबोइलेक्ट्रिसिटीचा वापर करण्यासाठी नॅनो जनरेटरची गरज असते. हा जनरेटर तयार करणं खूप कठिण आणि महाग असतं. पण या टॅबमुळे हे शक्य झालं आहे. या टॅबमध्ये सोन्याच्या दोन पातळ पट्ट्यांच्या मध्ये पॉलिमर बसवण्यात आलं आहे. शारीरिक हालचालीमुळे सोनं आणि पॉलिमर यांच्यात घर्षण निर्माण होतं. या घर्षणामुळे सोन्याच्या दोन पट्ट्यांदरम्यान इलेक्ट्रॉनचा वावर वाढल्याने १२४ वोल्टची वीज उत्पन्न होते. एवढ्या विजेमुळे ४८ एलईडी दिवे एकत्रितपणे पेटू शकतात. या उपकरणात सोन्याची मोठी पट्टी बसवून जास्तीत जास्त विजनिर्मिती करण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. तसंच या ही वीज बॅटरीमध्ये साठवून ठेवण्यासाठीचं तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

पंचांग

**सोमवार, २४ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. १०, नक्षत्र : उत्तराषाढा,
चंद्रराशी : धनु, योग : परिघ,
सूर्योदय : ६.४२, सूर्यास्त : ६.४९

फॉरवर्डस


**आपल्याला स्वत:ची खरी ओळख ठाऊक असते, जगाला नव्हे...**

सुलझा हुआ सा समझते हैं मुझको लोग,
उलझा हुआ सा मुझमें कोई दूसरा भी है।

आरोग्यमंत्र

## लक्षणांकडे लक्ष हवं

प्रामुख्यानं पावसाळ्यात डेंग्यूचा कहर बघायला मिळत असला तरी अन्य ऋतूंमध्येही याचा धोका उद्‌भवू शकतो हे आपण लक्षात घ्यायला हवं. म्हणूनच या आजाराची लक्षणं ठाऊक असणं गरजेचं आहे. डेंग्यू तापाचा संसर्ग झाल्यानंतर साधारणपणे चार ते सात दिवसानंतर लक्षणं दिसणं सुरू होतं. अचानक तीव्र ताप येणं, तीव्र डोकेदुखी, लिम्फ ग्रंथी सुजणं, स्नायू आणि सांध्यांमध्ये वेदना होणं, तापानंतर साधारण दोन ते पाच दिवसांदरम्यान त्वचेवर पुरळ वा लालसर चट्टे दिसून येणं, मळमळ आणि उलट्या होणं, पोटात दुखणं, भूक मंदावणं अशी सौम्य डेंग्यू तापाची लक्षणे असतात. ती वेळीच लक्षात आल्यास तपासणी करुन वेळेत उपचार घेणं शक्य होतं. अद्यापही डेंग्यूवर कोणतीही लस उपलब्ध नाही. त्यामुळे पेशंटला जाणवणाऱ्या लक्षणांनुसार उपचार करण्यात येतात. डेंग्यू तापामध्ये रक्तस्त्राव होण्याचा धोका अधिक असल्यानं तापासाठी योग्य ती औषधं द्यावी लागतात. त्यामुळेचं डेंग्यू तापामध्ये कधीही aspirin आणि ibuprofen अशी औषधे दिली जात नाहीत. यासाठी डॉक्टर paracetamol हे औषध देऊ शकतात. डेंग्यू तापामुळे शरीरातील क्षार आणि पाणी कमी होऊन डिहायड्रेशन होऊ शकते. यासाठी आयव्ही फ्लुइड देण्यात येतं. तसंच रुग्णास ओआरएस द्रावण, द्रव पदार्थ किंवा फळांचा रस दिला जातो. डेंग्यूच्या तापात रुग्णानं बेड रेस्ट घेणं आवश्यक असून डॉक्टरांनी दिलेलीचं औषधं वेळेत घ्यावीत.



वाचा तर खरं

विमानापर्यंत इंटरनेट पोहोचवण्याच्या दोन पद्धती आहेत. पहिल्या पद्धतीत जमिनीवरील मोबाईल ब्रॉडबँड टॉवर्स विमानाच्या अँटेनापर्यंत सिग्नल पाठवतात. यामुळे विमान जवळच्या टॉवरकडून नेटवर्क मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. विमान पाण्यावरून किंवा अत्यंत दुर्गम प्रदेशावरून जात असेल तर दुसरी पद्धत उपयोगी पडते. यात जमिनीवर असणाऱ्या रिसिव्हर्स आणि ट्रान्समीटर्सच्या माध्यमातून सिग्नल पाठवले आणि मिळवले जातात. यासाठी उपग्रहांचा वापर केला जातो. या पद्धतीत स्मार्टफोन विमानाच्या अँटेनाच्या माध्यमातून जवळच्या सॅटेलाईट यंत्रणेशी जोडला जातो.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### वाघ्याची समाधी रायगडावरून हटवा

**पुणे :** रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत असलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी हटवावी, अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र लिहित मागणी केली आहे. वाघ्या कुत्र्याचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख नाही. तसेच, ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नाही. त्यामुळे ३१ मे पूर्वी ही समाधी हटवावी, असे छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रात म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात छत्रपती संभाजीराजेंनी म्हटले आहे की, हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे.

# निवडणूक प्रक्रियेचे बळकटीकरण

## निवडणूक आयोगाच्या ठोस उपाययोजना : पक्षांचाही सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) म्हणून ज्ञानेश कुमार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली भारत निवडणूक आयोगाने निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्यासोबत संपूर्ण निवडणूक यंत्रणेला बीएलओ स्तरापर्यंत सर्व मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि मतदान केंद्रांवर त्यांना सुखद अनुभव देण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केली आहे. मुख्य भागधारक असलेल्या राजकीय पक्षांना या बळकटीकरण प्रक्रियेत सामील करुन घेतले जात आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

आयोगाने स्पष्ट केले आहे की, १०० कोटी मतदार लोकशाहीचा आधारस्तंभ आहेत. 'यूआयडीएआय' आणि 'ईसीआय'च्या तज्ज्ञांमध्ये तांत्रिक सल्लामसलत लवकरच सुरू होणार आहे. एक मतदार जरी त्याच्या नियुक्त मतदान केंद्रात मतदान करू शकत असेल, तरी आयोगाने देशभरात ईपीआयसी क्रमांकांमध्ये डुप्लिकेट्स काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. आणि अनेक दशकांपासून चालत आलेली समस्या संपवण्याचे ठरवले आहे. मतदारयादीचे नियमित अद्यतन जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिकाऱ्यांबरोबर समन्वयाने मजबूत करण्यात येत आहे.

लोकप्रतिनिधत्व कायद्यानुसार आयोगाच्या राजकीय पक्षांबरोबरच्या संवादात स्पष्ट करण्यात आले की मसुदा मतदार यादीत कोणताही समावेश किंवा वगळण्यासंदर्भातील बाब संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार अपील प्रक्रियेने नियंत्रित केली जाते. अशा अपीलच्या अभावात, ईआरओने तयार केलेली यादी लागू राहील. ७ मार्च रोजी ईसीआयने स्पष्ट केले होते की विशेष संक्षिप्त पुनरावलोकन प्रक्रियेनंतर फक्त ८९ पहिल्या अपील्स आणि एकच दुसरे अपील दाखल करण्यात आले.



### ग्रामीणभागातही मूलभूत सुविधा सुनिश्चित

- सर्व पात्र नागरिकांची १०० टक्के नोंदणी सुनिश्चित करणे, मतदानाची सोय करणे आणि सुखद मतदान अनुभव देणे हे निवडणूक आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर १२०० पेक्षा जास्त मतदार नसतील याची खात्री करण्यासाठी पावले उचलली जातील आणि ती २ किमीच्या आत असतील. अगदी दूरच्या ग्रामीण मतदान केंद्रावरही मूलभूत सुविधा सुनिश्चित केल्या जातील. शहरी भागातील उदासीनता दूर करण्यासाठी आणि अधिक सहभाग प्रोत्साहित करण्यासाठी, उच्च इमारतींचे क्लस्टर आणि वसाहतींमध्ये देखील मतदान केंद्रे असतील.

# हर्षा भोगलेंची इंडिगोवर सणसणीत टीका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** क्रिकेट समालोचक आणि लेखक हर्षा भोगले यांनी पुन्हा एकदा इंडिगो एअरलाइन्सवर टीका केली आहे. हर्षा भोगले यांनी एक ट्विट करीत आपला संताप व्यक्त केला आहे. यापूर्वीही हर्षा भोगले यांनी इंडिगो एअरलाइन्सच्या निष्काळजीपणावर बोट ठेवलं होतं. आता पुन्हा एकदा इंडिगो एअरलाइन्सवर त्यांनी संताप व्यक्त केला आहे.

यासाठी हर्षा भोगले यांनी उपहासात्मक ट्विट केलं आहे. यामध्ये तचे म्हणतात, एके दिवशी मी इंडिगोच्या लोकांना घरी जेवायला आमंत्रित करणार आहे. आणि जेवण तयार होईपर्यंत आणि टेबलावर जेवण ठेवेपर्यंत त्यांना दारातच उभं करणार आहे.

यावेळी त्यांनी इंडिगो एअरलाइन्सच्या असभ्य वर्तन आणि व्यवस्थापनातील अपरिपक्वपणाबद्दल संताप व्यक्त केला आहे. हर्षा भोगलेंनी इंडिगो एअरलाइन्सवर ट्विट केल्यानंतर अनेकांनी आपल्या व्यथा मांडला. इंडिगो एअरलाइन्सबद्दल अनेकांकडून तक्रारी केल्या जात आहेत. मात्र एअरलाइन्सकडून ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेतली जात नसल्याचं दिसत आहे. त्यामुळे हर्षा भोगलेंच्या ट्विटवर हजारोंनी प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान, हर्षा भोगले यांनी वरील ट्विट कोणत्या घटनेवर लिहिलं हे नमूद केलेलं नाही. मात्र नेटिझन्सने मात्र यावर प्रतिक्रिया देण्यात सुरुवात केली आहे. सर्वात स्वस्त एअरलाइन्स म्हणून इंडिगोचं नाव घेतलं जात असलं तरी व्यवस्थापनेतील गोंधळामुळे ग्राहकांना प्रचंड मनस्तापाला सामोरं जावं लागत असल्याच्या प्रतिक्रिया येत आहेत.

### हर्षा भोगलेंचं जुनं ट्विट..

- यापूर्वी गेल्या वर्षी ऑगस्ट २०२४ मध्ये हर्षा भोगले यांनी इंडिगो एअरलाइन्सच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त केला होता. एका वृद्ध दाम्पत्याने अधिक पैसे भरून चौथी सीट बुक केली होती. मात्र आयत्या वेळी कोणतीही माहिती न देता त्यांना १९ व्या सीटवर पाठवण्यात आलं. त्यामुळे या दाम्पत्याला चिंचोळ्या जागेतून चालत लांबपर्यंत जावं लागलं आणि त्यांना नाहक त्रास सहन करावा लागला होता, हे प्रकरण अधोरेखित करीत हर्षा भोगले यांनी इंडिगो एअरलाइन्सवर टीका केली होती.

# दादरमधील कबुतरखाना हटवणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दादर पश्चिमेतील प्रसिद्ध कबुतरखाना हटविण्याच्या हालचाली अखेर मुंबई महापालिका स्तरावर सुरू झाल्या आहेत. कबुतरांच्या विष्ठा आणि पिसांमुळे होणाऱ्या आरोग्यधोक्याच्या तक्रारींमुळे हा कबुतरखाना वरळी अथवा प्रभादेवी येथे स्थलांतरित करण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे. यामुळे आता शहरातील इतर कबुतरखाने देखील हटवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होऊ लागली आहे.

**मनसेची मागणी :** ग्रेड २ ची हेरिटेज वास्तू असलेला दादरचा कबुतरखाना १९३३ मध्ये पाण्याचा कारंजा म्हणून बांधण्यात आला होता. मात्र, अनेक रहिवाशांनी नंतर तिथे कबुतरांना दाणे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे या जागेला कबुतरखान्याचे स्वरुप झाले. गेल्या काही वर्षांमध्ये स्थानिक रहिवाशांना श्वसनाचा त्रास होत असल्याचं सांगत राज ठाकरे यांच्या मनसेने हा कबुतरखाना म्हणजे कबुतरांचं अनधिकृत खाद्यकेंद्र बंद करण्याची मागणी केली केली होती. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून मनसेकडून या मागणीचा पाठपुरावा केला जात आहे. कबुतरांमुळे दादरमधील अनेक रहिवासी, विशेषतः लहान मुलं आणि वयोवृद्ध नागरिकांना श्वसनाचे विकार जडले आहेत. पक्ष्यांची विष्ठा आणि पिसांमुळे अनेक इमारतींच्या खिडक्या खराब होतात, असे मनसेने पालिकेला पाठवलेल्या पत्रात म्हटले होते. मनसेने २०१७ साली ही मागणी केली होती. त्यावेळी भाजपने त्याला विरोध केला होता. कबुतरखाना हा मुंबई शहराच्या इतिहास आणि वारशाचा भाग आहे. काही समाज कबुतरांना दाणे देत असल्याने धार्मिक भावनाही या वास्तूशी निगडीत आहेत, असा दावा भाजपने केला होता.

गेल्या अनेक वर्षांपासून दादर येथे हा कबुतरखाना असून, येथे कबुतरांची संख्या बेसुमार वाढली आहे. याचा थेट परिणाम स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर होत आहे. घरांच्या खिडक्या, गॅलऱ्यांमध्ये कबुतरांचा वावर वाढला असून, विष्ठेमुळे परिसर अस्वच्छ होत आहे.

कपडे सुकविण्यासाठी लावलेल्या दोऱ्यांवरही कबुतरांचा कब्जा असून, नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आंदोलन केले होते. त्यानंतर महापालिकेने या प्रश्नाची दखल घेत पुढील कार्यवाहीसाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

यासंदर्भात महापालिकेच्या हेरिटेज विभाग, आरोग्य विभाग आणि परिरक्षण विभागाची २५ मार्चला बैठक होणार होती. मात्र, ती पुढे ढकलण्यात आली आहे. तरीही हा कबुतरखाना प्रभादेवीतील कीर्ती महाविद्यालय परिसर किंवा वरळीतील मोकळ्या जागेत हलविण्याचा विचार महापालिका करत आहे. लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

पान १ वरून

## दक्षिणेतील राज्ये केंद्राविरोधात एकवटली

शेतकरी अडचणीत येतील. आमची संस्कृती, विकास धोक्यात येईल. आमचे लोक आपल्याच देशात कमकुवत होतील, त्यांचे कुणी ऐकणार नाही असे तामिळनाडूचे सीएम एमके स्टॅलिन यांनी म्हटले.

भाजप कुठलाही विचार न करता हा मुद्दा पुढे रेटत आहे. जर लोकसंख्येवर सीमांकन झाले उत्तरेकडील राज्यांच्या जागा वाढतील. दक्षिणेकडील खासदारांची संख्या कमी होईल. भाजपासाठी हे फायदेशीर होईल कारण उत्तरेकडे त्यांचा चांगला प्रभाव आहे असं केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन यांनी सांगितले. तर सीमांकनाच्या माध्यमातून भाजपा दक्षिणेकडील राज्यांवर दंड लावू इच्छिते. आम्ही सर्वांचा सन्मान करतो परंतु लोकसंख्येवर सीमांकन आम्ही स्वीकारणार नाही असा इशारा तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी दिला.

**काय आहे सीमांकन मुद्दा?**

मागील ५ दशकापासून देशात सीमांकन झाले नाही. २०२६ नंतर सीमांकन होण्याची शक्यता आहे. लोकसंख्येच्या आधारे सीमांकन होऊन लोकसभा जागा निश्चित होणार आहे. म्हणजे ज्या राज्याची लोकसंख्या अधिक तिथे जास्त जागा, जिथे कमी लोकसंख्या तिथल्या जागा कमी होणार. २०११ साली लोकसंख्या आकडेवारी पाहिली तर उत्तर भारतातील राज्यात लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. दक्षिण भारतात लोकसंख्या नियंत्रणात आहे. त्यामुळे उत्तर भारतात यूपी, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेशसारख्या राज्यात लोकसभा जागा वाढतील तर दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, तेलंगाणासारख्या राज्यात जागा कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच दक्षिण भारतातील राज्य या मुद्द्यावर केंद्र सरकारविरोधात आलेत.

## दंगलखोरांकडूनच वसुली

काही लोकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एक अपप्रचार केला. यातून शहरात दंगल उसळली. जमावाने तोडफोड केली, गाड्या फोडल्या, लोकांवर हल्ला केला. त्यानंतर पोलिसांनी जवळपास ४-५ तासांत दंगलीवर आवर घातला. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईलवरील चित्रिकरण, पत्रकारांनी केलेले चित्रिकरण यात जे दंगेखोर दिसत आहेत, त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. १०४ लोकांना ओळखण्यात आले असून ९२ लोकांना अटक केली आहे. काही लहान बालकांवरही कारवाई सुरू आहे, असेही फडणवीस म्हणाले.

**पोस्ट टाकणा-यांना सहआरोपी करणार**

जो-जो व्यक्ती दंगा करताना दिसतोय, दंगेखोरांना मदत करताना दिसतोय, अशा प्रत्येकावर कारवाई करण्याची मानसिकता पोलिसांची आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. सोशल मीडियाचे ट्रॅकिंग करून ही घटना घडावी म्हणून पोस्ट ज्यांनी केली, त्या सर्वांना दंगेखोरांसोबत सहआरोपी केले जाणार आहे.

भडकवणारे पॉडकास्ट करणा-यांनाही इशारा

जवळपास ६८ पोस्ट ओळखण्यात आल्या असून डिलिट केल्या आहेत. अजून काही पोस्टची माहिती घेणे चालू आहे.. भडकवणारे पॉस्टकास्ट, चुकीच्या पोस्ट टाकून अफवा पसरवून लोकांमध्ये भीती निर्माण केलेल्या लोकांवर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## मनसेत राज ठाकरेंचे मोठे संघटनात्मक बदल

देणार असल्याचे सांगितले होते. तसेच नाशिक, नवी मुंबई, ठाणे जिल्ह्याच्या धर्तीवर मुंबईसाठीही अध्यक्ष नियुक्त करण्यात येणार आहे. मुंबईतील विभाग अध्यक्षांच्या कामावर देखरेख ठेवून त्यांच्यात समन्वय राखण्याची जबाबदारी मुंबई अध्यक्षावर असणार आहे.

मनसेच्या मुंबई शहर अध्यक्षपदी संदीप देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संदीप देशपांडे यांच्यानंतर ३ जिल्हा उपाध्यक्ष असणार आहेत. उपाध्यक्षांनंतर विभाग अध्यक्ष असणार आहेत. मनसेने आतापर्यंत मुंबईसाठी कधीही अध्यक्षांची नेमणूक केली नव्हती. आता मात्र थेट पहिल्यांदाच मुंबई अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली आहे.

मनसेने आपल्या पक्ष संघटनेची सगळी रचना बदलली आहे. मनसेचे पहिले मुंबई अध्यक्षपद संदीप देशपांडे यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. तर, केंद्रीय समितीमध्ये विभाग अध्यक्षांची जबाबदारी नितीन सरदेसाई यांच्याकडे आहे. शाखा अध्यक्षांची जबाबदारी ही अमित ठाकरे यांच्याकडे असणार आहे. गटाध्यक्ष केंद्रीय समितीची जबाबदारी ही बाळा नांदगावकर यांच्याकडे असणार आहे.

## संभल प्रकरणी जामा मशीदीचे प्रमुख...

जामा मशीद समितीच्या प्रमुखांनी २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या दंगलीत पोलिसांनी गोळीबार केल्याचा आरोपही केला होता. या कारवाईनंतर संभलमधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. अनेक पोलिस ठाण्यांमधील पोलिसांव्यतिरिक्त राखीव पोलीस दलही तैनात करण्यात आले आहे. दरम्यान, जफर अली यांचे ताहिर अली यांनी पोलिस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार मशिदीच्या सर्वेक्षण करण्यात आले. याविरुद्ध करण्यात आलेल्या निदर्शनांवेळी झालेल्या हिंसाचारात चार जणांचा मृत्यू झाला होता. तसेच अनेक जण जखमी झाले. जखमींमध्ये बहुतांश पोलीस होते. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. पोलिसांनी घटनास्थळावरून जप्त केलेली शस्त्रे ब्रिटन आणि जर्मनीसह इतर देशांतील निर्मिती असल्याचे तपासात उघड झाले होते. एसआयटीने या हिंसाचाराशी संबंधित बारा प्रकरणांपैकी सहा प्रकरणांमध्ये ४,००० पानांपेक्षा जास्त पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे, ज्यामध्ये १५९ जणांना आरोपी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

## मेहुल चोक्सीला भारतात आणणार?

बार्बुडा येथे पळून गेला. त्याला भारतात आणण्यासाठी, अधिकाऱ्यांनी बेल्जियम सरकारला प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले आहे. मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांच्यावर मुंबईतील पंजाब नॅशनल बँकेच्या ब्रॅडी हाऊस शाखेत १३,८५० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. यापूर्वी, चोकसीने त्याचा पासपोर्ट निलंबित झाल्यामुळे तो भारतात परतू शकत नसल्याचे निमित्त केले होते. २०१८ मध्ये भारत सोडण्यापूर्वी २०१७ मध्येच अँटिग्वा-बार्बुडाचे नागरिकत्व घेतले होते. मेहुलने प्रकृती बिघडल्याचे कारण देत भारतात येण्यास वारंवार नकार दिला. कधीकधी तो फक्त व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे समोर येतो. भारतातील त्याच्या अनेक मालमत्ताही जप्त करण्यात आल्या आहेत. तो मे २०२१ मध्ये अँटिग्वामधून गायब झाला आणि शेजारच्या डोमिनिकामध्ये पोहोचला. येथे त्याला अटक करण्यात आली. त्याचे प्रत्यार्पण करण्यासाठी सीबीआयचे एक पथक डोमिनिका येथे पोहोचले, परंतु त्यापूर्वीच त्याला ब्रिटिश राणीच्या प्रिव्ही कौन्सिलकडून दिलासा मिळाला. नंतर त्याला पुन्हा अँटिग्वाला सोपवण्यात आले.

## नागपूर हिंसाचारात...

नाही, असे शिवसेना नेत्याने स्पष्ट केले. विरोधी पक्ष शिवसेनेचे सध्याचे नेतृत्व आणि पक्षाची राजकीय रणनीती फेटाळून लावत ते म्हणाले, 'मातोश्रीवर (उद्धव ठाकरे यांचे मुंबईतील निवासस्थान) लवकरच शिवसेनासंस्थापक बाळासाहेब ठाकरे आणि शिवाजी महाराज यांच्या छायाचित्राशेजारी औरंगजेबाचा फोटो लावण्यात येणार आहे. नागपूर हिंसाचाराचा परराष्ट्र व्यवहाराशी किंवा बांगलादेशशी काही संबंध आहे की नाही, हे सांगणे घाईचे ठरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले होते.

## चीनमधील आयातीला भारताने लावले शुल्क

दरात वस्तूंची निर्यात केली जात असल्यामुळे सरकारकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे. ज्या उत्पादनावर अँटी-डपिंग शुल्क लावण्यात आले आहे, त्यामध्ये सॉफ्ट फेराइट कोर, व्हॅक्यूम इन्सुलेटेड फ्लास्क,
अॅल्युमिनियम फॉइल आणि ट्रायक्लोरो आइसोसायन्यूरिक ॲसिडचा समावेश आहे.

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने याबाबत वेगवेगळ्या अधिसूचना जारी केल्या आहेत. यानुसार, सॉफ्ट फेराइट कोर, व्हॅक्यूम इन्सुलेटेड फ्लास्क आणि ट्रायक्लोरो आइसोसायन्यूरिक ॲसिडच्या आयातीवर पाच वर्षांसाठी अँटी-डपिंग शुल्क लागू केले जाईल. यापैकी अॅल्युमिनियम फॉइलवर सहा महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात ८७३ डॉलर प्रति टनपर्यंत अँटी-डंपिंग शुल्क लावण्यात आले आहे.

## भारतीय वंशाच्या माणसाची हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ५६ वर्षांच्या एका माणसाला आणि त्याच्या मुलीची अमेरिकेत हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणात एकाला अटक करण्यात आली आहे. अमेरिकेतील व्हर्जिनिया या ठिकाणी एका स्टोअरमध्ये गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात वडील आणि मुलगी या दोघांची हत्या करण्यात आली. २० मार्चला व्हर्जिनियामध्ये एका स्टोअरमध्ये गोळीबार करण्यात आला. या घटनेत प्रदीप कुमार पटेल आणि त्यांची मुलगी या दोघांचीही हल्लेखोराने हत्या केली. ही घटना लँकफोर्ड हायवे या ठिकाणी असलेल्या स्टोअरमध्ये घडली आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका संशयिताला अटक केली आहे.

# शासनाच्या प्रशिक्षणाला शिक्षकांचीच दांडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासह अन्य महत्त्वाच्या विषयांवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने विशेष प्रशिक्षण आयोजिले होते. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील पहिली ते बारावीच्या शाळांवरील (अनुदानित व जिल्हा परिषदेच्या शाळांमधील) जवळपास २४ हजारांवर शिक्षकांची उपस्थिती अनिवार्य होती. मात्र, अनेकांना शाळांनी सोडलेच नाही तर काही प्रशिक्षण संपताना वा सुरवातीला स्वाक्षरी करून गेले. काहींना प्रशिक्षण पूर्ण केल्याची कोरी प्रमाणपत्रे देऊन त्यावर अनुपस्थितांची नावे टाकल्याचेही गंभीर प्रकार समोर येत आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अभ्यासक्रमातील व अध्यापनातील बदल, अभ्यासक्रम आराखडा, गटकार्य अशा महत्त्वाच्या विषयांवर 'एससीईआरटी'ने (स्टेट काउन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अॅण्ड ट्रेनिंग) शिक्षकांसाठी १० फेब्रुवारी ते २२ मार्च या कालावधीत शिक्षक क्षमता वृद्धी २.० प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. सलग पाच दिवसांच्या प्रशिक्षणासाठी सहा टप्पे करण्यात आले होते.

सर्वच शिक्षक प्रशिक्षणासाठी उपस्थित राहावे म्हणून दररोज सकाळी एकदा आणि दुपारी साडेचारनंतर एकदा उपस्थिती नोंदवहीवर स्वाक्षरी करणे बंधनकारक केले होते. याशिवाय शिक्षकांच्या सोयीसाठी माळशिरस तालुक्यात चार, करमाळा, माढा तालुक्यात दोन तर अन्य तालुक्यांच्या ठिकाणी एक केंद्र निश्चित केले होते. तरीही, असे प्रकार समोर आले आहेत. दुसरीकडे अनेक माध्यमिक शाळांनी त्यांच्याकडील शिक्षकांना प्रशिक्षणासाठी सोडलेच नाही. त्यामुळे त्यांनाही प्रशिक्षणाला येता आलेले नाही. सर्वच शिक्षकांनी प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र एकदम देणे अशक्य असल्याने मी सर्वच प्रमाणपत्रांवर एकदम स्वाक्षरी करून प्रत्येक तालुक्यातील समन्वयकांकडे दिली. पण, पाच दिवसांच्या प्रशिक्षणासाठी संबंधित शिक्षक नियमित उपस्थित होते. याची खात्री करूनच समन्वयकाने स्वाक्षरी करून प्रशिक्षण प्रमाणपत्र देणे अभिप्रेत आहे. तरीपण, शिक्षकांची नावे न टाकता समन्वयकांनी स्वाक्षरी करून प्रशिक्षण पूर्ण केल्याची कोरी प्रमाणपत्रे दिली असतील तर चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल असे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे यांनी सांगीतले.

# मुंबई-गोवा महामार्ग बनला मृत्युचा सापळा



**मुंबई :** कोकणातून जाणारा राष्ट्रीय मुंबई-गोवा महामार्ग वाहन चालकांसाठी मृत्युचा सापळा बनला आहे. गेली आठरा वर्ष सुरु असलेल्या महामार्गाचे काम आज ही पुर्ण होण्याचे नाव घेत नाही. मात्र गेल्या वर्षभरात या महामार्गाने रत्नागिरी जिल्ह्यातील १३७ वाहन चालकांचे बळी घेतले आहेत. महामार्गाच्या अर्धवट कामांमुळे ३९९ पेक्षा जास्त अपघातांची नोंद करण्यात आली आहे. महामार्गाचे अर्धवट सुरु असलेले काम आणि होणा-या अपघातांची संख्या बघता हा विषय आता गंभीर बनला आहे.

कोकणाला जलद गतीने मुंबईला जोडण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा घाट घातला. या महामार्गावर आता पर्यत कोठ्यावधी रुपये खर्च करण्यात आले. मात्र तरीही या महामार्गावरील कामे आज ही अर्धवट सुरु आहेत. कोकणातील चाकरमानी दरवर्षी आदळत आपटत शिमगोत्सव अथवा गणेशोत्सवाला येत आहे. या महामार्गाचे काम पुर्ण होण्यासाठी अनेक मंत्र्यांनी पहाणी दौरे करुन वेळेत काम पुर्ण करण्याची आश्वासने दिली. मात्र मुंबई गोवा महामार्गाचे काम आजही पुर्ण होण्याच्या प्रतिक्षेत आहे.

मुंबई गोवा महामार्ग पूर्ण होई प्रयत्न अपघाताचे प्रमाण वाढतच जात आहे. जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२५ अखेर कोकणातील फक्त रत्नागिरी जिल्ह्यात ३९९ अपघात झाले असून त्यात गंभीर स्वरुपाचे १२७ अपघात झाल्याची नोंद करण्यात आली आहे. या अपघातांमध्ये आता पर्यत १३७ लोकांनी आपले जीव गमावले आहेत. कोकणातील रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आकडेवारी बघता बळींची संख्या हजाराच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

या महामार्गाने गंभीर अपघातामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील आतापर्यंत ११५ पुरुषांचे आणि २२ महिलांचे बळी घेतले आहेत. हे सर्व अघातातील बळी मुंबई-गोवा महामार्गाच्या अर्धवट कामांमुळे झाले असल्याचे स्पष्ट झाले आहेत. जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२५ याच कालावधीत ११९ लहान अपघात देखील झाले आहेत. त्यामध्ये १९२ लोक गंभीर जखमी झाले असून यामध्ये २१० पुरुष तर ८२ महिलांचा समावेश आहे. महामार्गावरील किरकोळ स्वरुपाचे ८९ अपघात झाले आहेत. त्यात २६४ लोकांना दुखापत झाल्या आहेत. यात १८७ पुरूष तर ७७ स्त्रियांचा समावेश आहे. तसेच या महामार्गावरील इतर ६४ अपघातांमध्ये फक्त वाहनांचे नुकसान झाले आहे. मात्र यात कोणीही जखमी अथवा मृत्यु झालेले नाही.

## 'जयंत पाटील किरकोळ माणूस'

**सांगली:** राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याबाबत भाजप आमदार गोपिचंद पडळकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. पडळकर हे वादग्रस्त वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असतात. त्यांनी आता जयंत पाटील यांना लक्ष करत ते एक किरकोळ माणूस आहे. शिवाय ते सत्ते शिवाय राहू शकत नाही. सत्तेसाठी त्यांची लाचार होण्याची तयारी आहे. त्यांची ताकद संपलेली आहे, असं वक्तव्य भाजप आमदार गोपिचंद पडळकर यांनी केलं आहे. त्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. या आधीही पडळकर यांनी शरद पवारांबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं होतं.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की माझे अशील श्री सुधाकर शंकर डाळिंबे राहणार धानोरी पुणे, ह्यांचा पत्नी कै.सुनंदा सुधाकर डाळिंबे, दिनांक ०१/११/२०१७ रोजी पुणे येथे मयत झाल्या आहेत. मयत कै. सुनंदा सुधाकर डाळिंबे यांच्या पश्च्यात पती श्री सुधाकर शंकर डाळिंबे, व दोन मुले श्री मधुकर सुधाकर डाळिंबे आणि श्री संतोष सुधाकर डाळिंबे हे मयतास कायदेशीर वारस आहेत. तरी कोणाला कसलाही वरील कायदेशीर वारस आक्षेप असल्यास त्यांनी मला संबंधित कागदपत्रे घेऊन खालील पत्त्यावर सात दिवसांच्या आत कळवावे.

दिनांक- २३/०३/२०२५

अड. वनश्री क्षीरसागर
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड
३६३१३, एफ पी नं -ZISI3, अपार्टमेंट नं ३, दुसरा मजला, ए विंग, ; प्रतिसाद जोग कॉंडोमिनियम, शिवाजीनगर, पुणे -४११००४ - मोब नं - ९८२३५९८८०१, ईमेल - vanashree.kshirsagar@vastuhfc.com



### जाहीर समन्स

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)

**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**

बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२

राजहंस ग्रामीण बि. शेती सह पतसंस्था मर्या. — अर्जदार
पत्ता: करंजे, ता. बारामती, जि. पुणे.

विरुध्द, — जाब देणार

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. मकरंद माधव आपटे रा, राजस सोसायटी सर्व्हे नं.- २५/१-२ गंगा ओशियन पार्क, कात्रज, पुणे. | १ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |
| २. | विकास कोंडिबा गायकवाड रा, जांबे रसिकवाडी, ता. मुळशी, जि पुणे . | २ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |
| ३. | सौ. पुनम विकास गायकवाड रा, जांबे रसिकवाडी, ता. मुळशी, जि पुणे. | ३ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |
| ४. | हेमाराम मांगीलाल परिहार रा. स. न. ४८/७ कृष्णाई मंगल कार्यालयजवळ नऱ्हेगाव ता. हवेली, जि.पुणे. | ४ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २८/०३/२०२५ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.
या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
म्हणून आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

सही व शिक्का
(श्री एस. एम. तांदळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे

## भारतीय लेखिकाचा महिला हॉल ऑफ फेममध्ये समावेश



**सिंगापूर :** सिंगापूर महिला हॉल ऑफ फेममध्ये भारतीय वंशाच्या लेखिका आणि नाटककार कमलादेवी अरविंदन यांच्यासह सहा महिलांचा समावेश करण्यात आला आहे. सिंगापूर कौन्सिल ऑफ वुमेन्स ऑर्गनायझेशनने (एससीडब्ल्यूओ) सुरू केलेल्या वुमन्स हॉल ऑफ फेममध्ये स्त्री-पुरुष समानतेतील प्रगतीचा उत्सव साजरा केला जातो आणि सिंगापूरचा इतिहास, समाज आणि प्रगतीमध्ये महिलांच्या योगदानाचा गौरव केला जातो. चॅनल न्यूज एशियाने दिलेल्या वृत्तानुसार, ७५ वर्षीय अरविंदन तमिळ आणि मल्याळम या दोन्ही भाषांमध्ये लिहितात.

## १२ वर्षांच्या मुलाला दारू पाजणाऱ्या महिलेला अटक



**इडुक्की (केरळ) :** केरळमधील इडुक्की जिल्ह्यातील पिरुमेडू येथे एका मुलाला काळ्या चहाचे आमिष दाखवून दारू पाजल्याप्रकरणी एका २८ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली आहे. प्रियांका असे या आरोपीचे नाव असून ती मलमळा येथील रहिवासी आहे. १२ वर्षीय मुलाच्या कुटुंबियांच्या ओळखीच्या या महिलेने शुक्रवारी दुपारी त्याला ब्लॅक टी असल्याचे पटवून दारू पाजली.

## पायाभूत सुविधांचे झाले नुकसान



**हावडा (पश्चिम बंगाल) :** पश्चिम बंगालमधील हावडा शहरात जमीन खचून, पायाभूत सुविधांचे नुकसान झाल्याने रहिवाशांना पाणी किंवा विजेपासून वंचित राहावे लागत असले तरी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. हावडा शहरातील बेलगाचिया भागात २१ मार्च रोजी सकाळी जमीन खचून १ किमी लांबीच्या पाण्याच्या पाईपलाईनसह महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. जलवाहिनी फुटल्यामुळे हावडा महानगरपालिकेच्या अनेक प्रभागांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून हजारो रहिवाशांना त्याचा फटका बसला आहे.

## यूएनएलएफचे चार दहशतवादी जखमी



**इंफाळ :** मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात मेतेई कट्टरपंथी संघटना अरामबाई तेंगोल च्या सदस्यांसोबत झालेल्या चकमकीत बंदी घालण्यात आलेल्या युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (पम्बेई) संघटनेचे किमान चार दहशतवादी जखमी झाले आहेत. यूएनएलएफ (पंबेई) या चार जखमी दहशतवाद्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन रुग्णालयात उपचार केले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. शनिवारी दुपारी अरामबाई तेंगोलच्या १५ ते २० सदस्यांनी कोंगपाल चिंगांगबाम लेईकाई येथील युएनएलएफ अतिरेक्याच्या इरेंगबाम नंदकुमार सिंग (५६) या दहशतवाद्याच्या घरात घुसून इंफाळ खोऱ्यातील संघटनेच्या बंडखोरांवर हल्ला केला.

## गुजरातमधून फरार आरोपीला अटक

**मुंबई :** २०१५ मधील हत्येप्रकरणी गुजरातमधील मेहसाणा येथून एका आरोपीला मुंबई गुन्हे शाखेने अटक केली आहे. इम्रान साबिर शेख याला गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने शेजारच्या राज्यातील सिद्धपूर येथून अटक केली. एप्रिल २०१५ मध्ये नागपाडा येथील रहिवासी रियाज हुसेन अब्दुल कुरेशी (४४) यांची वसीम अक्रम शेख, साजिद अली आशिक अली चौधरी आणि इम्रान शेख यांनी हत्या केली होती. त्यावेळी वसीम आणि साजिद अली यांना अटक करण्यात आली होती, तर इम्रान पळून गेला होता. राहिल साबिर शेख या नव्या नावाने तो गुजरातमध्ये वास्तव्यास होता.

# बांगलादेशच्या युनूसना हवी मोदींची भेट

## केंद्र सरकारने अद्यापही दिली नाही भेटीची वेळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**नवी दिल्ली :** बांगलादेशाच्या हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी आगामी बिम्सटेक शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याची विनंती भारत सरकारकडे केली आहे. मात्र, सरकारने अद्याप त्यांना भेटीची वेळ दिलेली नाही. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना संसदीय समितीने बैठकीबाबत विचारले असता ते म्हणाले की, हा विषय अद्याप विचाराधीन आहे. संसदीय सल्लागार समितीची ही पहिलीच बैठक असून, या बैठकीत अनेक खासदारांनी बांगलादेशातील हिंदू समुदायावरील हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली आणि यासंदर्भात भारताने उचललेल्या पावलांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

एस. जयशंकर यांनी खासदारांना सांगितले की, बांगलादेशातील हिंदू समुदायावर होणारे हल्ले राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा ढाका येथील हंगामी सरकारने केला असून, त्यांना अल्पसंख्याकांचे लक्ष्य मानले जाऊ नये, असे म्हटले आहे. जयशंकर यांनी बांगलादेश, मालदीव, म्यानमार आणि श्रीलंकेशी असलेल्या भारताच्या संबंधांची माहिती खासदारांना दिली. मात्र, पाकिस्तान आणि चीन यांच्यातील मुद्द्यांवर नंतर चर्चा करण्याचे संकेत त्यांनी दिले आणि या बैठकीत हे मुद्दे स्वतंत्रपणे मांडण्याबाबत चर्चा केली.

पाकिस्तानच्या भूमिकेमुळे सार्क (दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना) निष्क्रिय झाली आहे आणि म्हणूनच भारत बिम्सटेकला बळकटी देण्यासाठी प्रयत्नशील आहे, असेही परराष्ट्र मंत्र्यांनी सांगितले.

थायलंडमधील बँकॉक येथे २ ते ४ एप्रिल दरम्यान होणाऱ्या बिम्सटेक परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहू शकतात, असे संकेत जयशंकर यांनी दिले असले तरी या भेटीस त्यांनी दुजोरा दिला नाही.

या बैठकीत विविध खासदारांनी बांगलादेशातील हिंदू समुदायावरील हल्ल्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन भारत सरकारने याविरोधात ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली. विशेषतः बांगलादेशातील हिंदू समाजावर झालेले हल्ले आणि त्यांच्याविषयी तात्पुरते सरकारचे वक्तव्य चर्चेचा विषय ठरले. जयशंकर यांनी बांगलादेश सरकारचे मत व्यक्त केले की, हे हल्ले कोणतेही धार्मिक किंवा अल्पसंख्याक आधार नसून राजकीय कारणांनी प्रेरित आहेत.

बिम्सटेक परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहभागाला परराष्ट्रमंत्र्यांनी दुजोरा दिला नसला, तरी ही भेट होण्याची शक्यता असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. बँकॉक येथे २ ते ४ एप्रिल दरम्यान ही शिखर परिषद होणार असून त्यात पंतप्रधान मोदी यांच्या सहभागामुळे भारत-बांगलादेश आणि बिम्सटेक देशांसोबतचे सहकार्य अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे.

### बिमस्टेकची भूमिका

- बंगालच्या उपसागराभोवती असलेल्या देशांना एका व्यासपीठावर आणण्याचे काम बिमस्टेक करते. यामध्ये भारताची रणनीती अत्यंत महत्त्वाची आहे. सार्कच्या निष्क्रियतेमुळे भारत बिम्सटेक सक्रिय करण्यासाठी आणि दक्षिण आशियात आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य वाढविण्यासाठी पावले उचलत असल्याचे जयशंकर यांनी नमूद केले. बिमस्टेकच्या सदस्य देशांमध्ये बांगलादेश, भारत, म्यानमार, श्रीलंका, थायलंड, नेपाळ आणि भूतान यांचा समावेश आहे. बहुपक्षीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्याला चालना देणे हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे.

# सुशांतसिंह राजपूतची आत्महत्याच

## रिया चक्रवर्तीला क्लीन चिट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** अभिनेता सुशांतसिंह राजपूत आत्महत्या प्रकरणात रिया चक्रवर्तीला क्लीन चिट देण्यात आली आहे. सुशांतसिंह राजपूत याने आत्महत्याच केल्याचे सीबीआयच्या क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले आहे. रिया चक्रवर्तीविरोधात कुठलाही पुरावा न सापडल्याने तिला क्लीन चिट देण्यात आली आहे. तब्बल चार वर्षे चार महिन्यांनी सीबीआयकडून कोर्टात क्लोजर रिपोर्ट सादर करण्यात आला आहे, त्यामध्ये सुशांतसिंह राजपूत याने आत्महत्याच केल्याचे म्हटले आहे.

सुशांतसिंह राजपूत प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. सीबीआयने या प्रकरणात क्लोजर रिपोर्ट सादर केला आहे. या क्लोजर रिपोर्टमध्ये या प्रकरणातील मुख्य संशयित रिया चक्रवर्तीला क्लीन चिट देण्यात आली आहे.

तिच्याविरोधात कोणतेही पुरावे न सापडल्याने अखेर सीबीआयने या प्रकरणाचा तपास बंद केला आहे. प्रकरणाच्या चार वर्षे चार महिन्यांनंतर सीबीआयकडून या प्रकरणात क्लोजर रिपोर्ट सादर करण्यात आला आहे. अभिनेता सुशांतसिंह राजपूतने आत्महत्याच केल्याचे या क्लोजर रिपोर्टमधून सांगण्यात आले आहे.

या सर्व प्रकरणामध्ये आतापर्यंत अनेकदा आरोप झाले आहेत. रिया चक्रवर्तीसह अनेकांवर गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले होते. सुरुवातीला मुंबई पोलिसांनी जो काही तपास केला होता, त्यामध्ये सुशांतसिंह राजपूतने आत्महत्या केली आहे,

यामध्ये कुठलाही संशय नाही असे मुंबई पोलिसांनी म्हटले होते. मात्र यामध्ये जेव्हा गंभीर स्वरूपाचे आरोप होऊ लागले तेव्हा या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे वर्ग करण्यात आला होता, आणि सीबीआयने या प्रकरणाचा आतापर्यंत म्हणजे चार वर्षे चार महिन्यांमध्ये तपास केला. त्यानंतर सीबीआयने क्लोजर रिपोर्ट सादर केला आहे. यामध्ये सर्वांत मोठी संशयित होती ती म्हणजे रिया चक्रवर्ती, तिला क्लीन चिट देण्यात आली आहे.



# दक्षिण गाझा पट्टीत इस्रायलचे हल्ले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दक्षिण गाझा पट्टीत इस्रायलने रविवारी रात्रभर केलेल्या हल्ल्यात हमासच्या एका वरिष्ठ नेत्यासह किमान १९ पॅलेस्टिनी ठार झाले. अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. दरम्यान, येमेनमधील इराणसमर्थित हौथी बंडखोरांनी इस्रायलवर आणखी एक क्षेपणास्त्र डागल्याने एअर स्ट्राईकचे सायरन वाजले. इस्रायलच्या लष्कराने सांगितले की, हे क्षेपणास्त्र मध्येच पाडण्यात आले असून जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

दक्षिण गाझामधील दोन रुग्णालयांनी सांगितले की, रात्रभर झालेल्या हल्ल्यात ठार झालेल्या महिला आणि मुलांसह १७ जणांचे मृतदेह रुग्णालयात आणण्यात आले आहेत. हमासने म्हटले आहे की, खान युनूसजवळ झालेल्या हल्ल्यात त्यांच्या पॉलिटिकल ब्युरो आणि पॅलेस्टिनी संसदेचे सदस्य सलाह बरदाविल आणि त्यांची पत्नी ठार झाली. बरदाविल हा हमासच्या राजकीय शाखेचा प्रसिद्ध सदस्य होता.

रुग्णालयांनी दिलेल्या मृतांमध्ये हमासचा नेता आणि त्याच्या पत्नीचा समावेश नाही. इस्रायलने लेबनॉनमधील अनेक ठिकाणांना लक्ष्य केले असून यामध्ये किमान ६ जण ठार झाल्याची माहिती आहे. इस्रायलने शनिवारी पूर्व आणि दक्षिण लेबनॉनला लक्ष्य करून केलेल्या हवाई हल्ल्यात किमान सहा जण जखमी झाले आहेत. लेबनानच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

दक्षिण लेबनॉनमधील टायर शहरासह अनेक खोरे आणि गावांना लक्ष्य करून इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात सहा जण ठार तर २२ जण जखमी झाल्याची माहिती लेबनॉनच्या पब्लिक हेल्थ इमर्जन्सी ऑपरेशन सेंटरने दिली. पूर्व लेबनॉनमध्ये झालेल्या हल्ल्यात सहा जण जखमी झाले आहेत. दरम्यान, इस्रायलने शनिवारी सायंकाळपर्यंत १५ हवाई हल्ले केल्याची माहिती लेबनानच्या सुरक्षा सूत्रांनी दिली.

# कठोर कारवाई गरजेची : ॲड निकम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा हे त्यांच्या निवासस्थानी सापडल्यापासून त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणी ज्येष्ठ वकील आणि भाजप नेते उज्ज्वल निकम यांनी निवेदन दिले आहे. त्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली आहे.

वकील निकम म्हणाले की, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात सापडलेली कठोर रोकड सापडली. आज न्यायालयाने आपल्या संकेतस्थळावर जे प्रसिद्ध केले आहे, त्यावरून हा मोठ्या तपासाचा विषय असल्याचे दिसते. आणि मला वाटते की सर्वोच्च न्यायालय यात कठोर भूमिका घेईल. ही केवळ बदली, निलंबन किंवा बडतर्फी नाही. याबाबत फौजदारी कारवाईही होऊ शकते. न्यायमूर्ती यशवंत वर्मा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सुरू केलेल्या अंतर्गत चौकशीचे निकाल सर्वोच्च न्यायालयाने आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहेत. पारदर्शकता हा आपल्या न्यायव्यवस्थेचा आत्मा आहे, असेही ते म्हणाले.



> कोणत्याही राष्ट्राचे स्थैर्य दोन घटकांवर अवलंबून असते. पहिली गोष्ट म्हणजे सामान्य माणसाचा त्या देशाच्या चलनावर विश्वास असायला हवा. दुसरं म्हणजे सामान्य माणसाचा त्या देशाच्या न्यायव्यवस्थेवर विश्वास असायला हवा.
>
> **—ॲड. उज्ज्वल निकम,** ज्येष्ठ विधिज्ञ

# न्या. यशवंत वर्मांच्या घराजवळ सापडले नोटांचे तुकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा गेल्या काही दिवसांपासून चांगलेच चर्चेत आले आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानाला लागलेल्या आगीनंतर त्यांच्या घरात बेहिशोबी रोकड सापडल्याचा प्रकार उजेडात आला होता. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने वर्मा यांच्यावरील आरोपांचा सविस्तर अहवाल सार्वजनिक केला आहे. यादरम्यान न्यायमूर्ती वर्मा यांच्या घराच्या जवळपासच्या परिसरात सफाई कर्मचाऱ्यांना पाचशे रुपयांच्या जळालेल्या नोटांचे तुकडे सापडले आहेत. या नोटांच्या तुकड्यांचे व्हिडीओ देखील समोर आले आहेत.

जवळपासच्या परिसराची स्वच्छता करणारे स्वच्छता कर्मचारी इंद्रजीत यांनी कचरा गोळा करताना ५०० रुपयांच्या नोटांचे जळालेले तुकडे आढळल्याची माहिती दिली आहे. तसेच त्यांन काही दिवसांपूर्वीही असेच पैशांचे तुकडे आढळले होते असेही नमूद केले आहे. पण घरात आग कशी लागली याबद्दल माहिती नसल्याचे सांगितले. आम्ही येथे सर्कलमध्ये काम करतो, आम्ही रस्त्यावरून कचरा गोळा करतो. ४-५ दिवसांपूर्वी आम्ही येथे स्वच्छता करताना कचरा गोळा करत होतो तेव्हा आम्हाला ५०० रुपयांच्या नोटेचे १-२ लहान-लहान तुकडे मिळाले... आग कुठे लागली होती आम्हाला माहिती नाही. आमचं काम फक्त कचरा गोळा करण्याचं आहे, असे इंद्रजीत यांनी सांगितले.



**इटली** इटलीच्या माऊंट एटना पर्वतावर ज्वालामुखीचा उद्रेक झाला असून, मोठ्या प्रमाणात लावा रस येथून बाहेर पडत आहे.

# नाशिक कुंभमेळ्यासाठी सीएम फडणवीसांचा मेगाप्लॅन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** २०२७ मध्ये होणाऱ्या नाशिकच्या कुंभमेळ्याची तयारी सुरु झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे रविवारी नाशिक दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचाही आढावा घेतला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्याच्या तयारीबाबत महत्त्वाची माहितीही दिली.

त्र्यंबकेश्वर येते जाऊन मी आज पाहणी केली. त्र्यंबकेश्वरसाठी एक विकास आराखडा तयार करण्यात आले आहे.मी त्या संदर्भात बैठक देखील घेतली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आम्ही जसा नाशिकचा विकास करणार आहे तसा त्र्यंबकेश्वरचा दखील विकास करणार आहे.

दोन टप्प्यात ही कामे करणार आहे तसे कुंडाचे आणि मंदिरांचा देखील विकास करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कुंभमेळ्यात वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी देखील करण्याचा विचार आहे. लवकरच या आराखड्याला मान्यता देणार आहे. नाशिकमध्ये ११ पुल आम्ही तयार करणार आहे. मोठ्या प्रमाणात रस्ते देखील तयार करण्याचा मानस आहे. उत्तरप्रदेश सरकारने ज्या प्रकारे कायदा केला त्याप्रकारे आपण देखील कायदा करणार आहोत. मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या माध्यमातून आम्ही सर्व प्लॅन करणार आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



> कुंभमेळा हा सगळ्या टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून करू. हा आस्थाचा महा कुंभ होईल , टेक्निकली महाकुंभ होईल. इथले प्रशासकीय टीम सक्षम आहे. सर्व लोक काम करतात. प्रयागराजचा अनुभव पाहता मी तिथे पोलीस कर्मचाऱ्यांसोबत पण संवाद साधला, त्या ठिकाणी १८ तास ड्युटी करत होते, कोणी कंप्लेंट करत नव्हतं. ते म्हणत होते आम्हाला कुंभाने ताकद दिली. नाशिक आणि महाराष्ट्राचे युवा या कुंभमेळ्यात जोडले गेले पाहिजे, वेगळ्या पद्धतीने ते जोडले गेले पाहिजेत.
>
> **—देवेंद्र फडणवीस** मुख्यमंत्री

# देवसंस्थानच्या भूमिकेला ग्रामस्थांचा विरोध






## मल्हार सर्टिफिकेशनवरून वाद चिघळला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** मल्हार सर्टिफिकेशनला जेजुरीकर ग्रामस्थांचा विरोध आहे. मल्हार सर्टिफिकेशनला समर्थन करणाऱ्या श्रीमार्तंड देवसंस्थानच्या विश्वस्त मंडळाने देवाच्या भाविकांची व ग्रामस्थांची लेखी माफी मागावी; अन्यथा विश्वस्त मंडळाला गावबंदी व जेजुरी बंदचा इशारा ग्रामस्थ मंडळाने दिला आहे.

मत्स्य व्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी मांस विक्री करणाऱ्या दुकानाला मल्हार सर्टिफिकेशन नाव देण्याचा निर्णय घेतला आहे. या नावाला ग्रामस्थ मंडळाचा विरोध असून, देवसंस्थानच्या पाच विश्वस्तांनी मंत्री नितेश राणे यांची भेट घेऊन समर्थन दिले होते.

मल्हार सर्टिफिकेशनला विरोध व देवसंस्थानच्या विश्वस्त मंडळाचा निषेध करण्यासाठी शनिवारी (दि. २२) ऐतिहासिक छत्री मंदिर परिसरात ग्रामस्थ मंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीत मंत्री नितेश राणे व जेजुरी देवसंस्थानचा निषेध करण्यात आला. विश्वस्त मंडळाने भाविकांना सोयी-सुविधा द्यावेत, राजकरण करू नये, विश्वस्त मंडळाने मल्हारी मार्तंड, भाविक व ग्रामस्थांची लेखी माफी मागावी. आठ दिवसांत माफी न मागितल्यास विश्वस्तांना गावबंदी करून गावबंदचा इशारा देण्यात आला. बैठकीत ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, माजी विश्वस्त संदीप जगताप, देवाचे मानकरी व इनामदार राजेंद्र पेशवे, छबन कुदळे, मंगेश जेजुरीकर, शैलेश राऊत, गिरीश झगडे, खोमणे व माळवदकर पाटील, प्रसाद अत्रे, अनिल झगडे, रसिक जोशी यांनी मनोगते व्यक्त केली. या वेळी कृष्णा कुदळे, रोहिदास माळवदकर, संतोष खोमणे, जाफर पानसरे, दीपक राऊत व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

> ग्रामस्थ मंडळाच्या वतीने मल्हार सर्टिफिकेशनला विरोध करून खंडोबा देवाचे मल्हार नाव यासाठी देऊ नये, यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री नितेश राणे, तसेच धर्मादाय आयुक्तांकडे निवेदन देणार असल्याचे आहे.
>
> — **जालिंदर खोमणे** अध्यक्ष, ग्रामस्थ मंडळ.

> श्रीमार्तंड देवसंस्थानच्या विश्वस्त मंडळाने भाविकांना सोयीसुविधा द्याव्यात, त्यांनी राजकारण करू नये अन्यथा ग्रामस्थ मंडळ त्यांच्या विरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतील.
>
> — **हेमंत सोनवणे,** माजी नगरसेवक.

# भीमाशंकरला सर्वोत्कृष्ट कारखाना पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** दत्तात्रयनगर,पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक, येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांचा सन २०२३-२४ करीता "देशातील वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार" जाहीर झाला आहे.

देशातील २०२३-२४ च्या गाळप हंगामामध्ये साखर उद्योगात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कारखान्यांना नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांच्यामार्फत या पुरस्काराची शुक्रवारी घोषणा करण्यात आली, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

बाळासाहेब बेंडे म्हणाले की, मूल्यमापनाच्या आधारे पुरस्कार निवड समितीने श्रेणी अंतर्गत पुरस्कारासाठी निवड केली आहे. पुरस्कार वितरण सोहळा नवी दिल्ली येथे होणार आहे. माजी सहकारमंत्री व कारखान्याचे संस्थापक दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक वर्षात केलेली ऊस उत्पादकता, तांत्रिक गुणवत्ता, वित्तीय व्यवस्थापन, अधिकतम ऊस गाळप, साखर उतारा, ऊस वाढीच्या योजना, कर्ज परतफेड, व्याज, खर्चात केलेली बचत, कमीत कमी उत्पादन खर्च, केलेली गुंतवणूक, वेळेत अदा केलेला ऊस दर, ऊस उत्पादकांना दिलेली ठेवीची पासबुके, संचित नफा, कारखान्याचे नक्त मुल्य, शिल्लक कर्ज उभारणी मर्यादा, कारखान्याने उभारणी केलेला व उपलब्ध निधी, विनियोगासाठी केलेले नियोजन, शिक्षण क्षेत्रातील योगदान व सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून केलेली कामे या सर्व बाबींचा विचार करून कारखान्यास हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

संस्थापक व माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे दुरदृष्टी नेतृत्व व मार्गदर्शन, संचालक मंडळाचे धोरण, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सुयोग्य व्यवस्थापन, ऊस उत्पादक व सभासद वर्गाची साथ यामुळेच पुरस्कार प्राप्त करणे शक्य झाले आहे. यापूर्वी कारखान्यास देश पातळीवरील १३ व राज्य पातळीवरील १५, असे एकूण २८ पुरस्कार प्राप्त झालेले आहे.



### सातव्यांदा पुरस्कार

● "देशातील वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार" ७ वेळा मिळविणारा देशातील एकमेव साखर कारखाना आहे, अशी माहिती उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी दिली. कारखान्याचे संस्थापक व माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कारखान्याचे संचालक मंडळ, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.






## विघ्नहरने राखली पुरस्काराची परंपरा कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा पारदर्शक कारभार आणि शेतकरी हिताचे निर्णय तसेच सभासद, ऊस उत्पादकांच्या असलेल्या विश्वासाच्या जोरावर विघ्नहर कारखान्याने आपली पुरस्कार मिळविण्याची परंपरा कायम राखली असून गळीत हंगाम २०२३-२४ करीता नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांचा उच्च साखर उतारा विभागातील प्रथम क्रमांकांचा उत्कृष्ट ऊस विकास हा पुरस्कार जाहिर झाला असल्याची माहिती अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी दिली.

सत्यशील शेरकर म्हणले, विघ्नहरने २०२३-२४ चे गळीत हंगामात १० लाख २३ हजार ४२४ मे. टन ऊसाचे गाळप केले असून ११ लाख ५० हजार क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन झाले आहे. तर ११.३६ टक्के साखर उतारा राखण्यात यश मिळविले आहे. तसेच सहवीज निर्मीती प्रकल्पातून ४ कोटी १२ लाख ६३ हजार २०० युनिट वीज निर्यात केली. कारखान्याचा विस्तारीत डिस्टीलरी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू असून डिस्टीलरी प्रकल्पातून ९५ लाख १७ हजार ८३९ लिटर अल्कोहोलची व ७० लाख ७९ हजार ७५८ लिटर इथेनॉल निर्माती झाली आहे.

कारखान्याचे ६,२०,०९० मे. टन इतके गाळप झालेले असून सहवीज निर्मिती २,३१,६९,००० युनिट झालेली आहे. तसेच डिस्टीलरी प्रकल्पातून ५५,६८,९६५ लिटर अल्कोहोल निर्मिती झालेली आहे. चालू गळीत हंगामामध्ये कारखान्याचे १०,००,००० टन गाळप करण्याचे उद्दिष्ट आहे.

दरम्यान, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याने साखर कारखानदारी संबंधीत विविध संस्थांचे आत्तापर्यन्त ६३ पुरस्कार मिळविलेले असून, यंदाच्या मिळालेल्या या पुरस्काराने विघ्नहरला मिळालेल्या एकूण पुरस्कारांची संख्या ६४ झाली असल्याचे शेरकर यांनी नमूद केले.

## भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना स्मृतीस्थळावर अभिवादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारक हुतात्मा भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या पुण्यस्थिती (शहिद दिन) निमित्त राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु स्मृतीस्थळ आणि हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ वाड्यावर मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

येथील हुतात्मा स्मृती शिल्पातील हुतात्मा राजगुरु, भगतसिंग, सुखदेव यांच्या पुतळ्यास म्हाडाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ वाड्यावर उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी पोलिस उपअधीक्षक अमोल मांडवे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, नायब तहसीलदार राम बीजे, पोलिस निरीक्षक प्रभाकर मोरे, सत्यशील राजगुरू, हुतात्मा राजगुरू स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख, भाजपचे राम गावडे, माजी सरपंच शांताराम घुमटकर, शिवसेनेच्या विजया शिंदे, गणेश सांडभोर, हुतात्मा राजगुरू ट्रस्ट चे कोंडीभाऊ टाकळकर, मुकुंद आवटे, प्राचार्य शिरीष पिंगळे, जि.र शिंदे, मारुती सातकर, सुनील वाळुंज, बाळासाहेब सांडभोर, विनायक घुमटकर, नरेंद्र गायकवाड, सुशील मांजरे यांच्यासह विविध पक्ष, संघटना, संस्था यांचे पदाधिकारी, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी नागरी उपस्थित होते.



# बारामतीत शासकीय कार्यालयातील लाचखोरी उघड




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती नगरपरिषदेत नुकताच लाचखोरीचा प्रकार समोर आला; मात्र हा प्रकार केवळ नगरपालिकेपुरता मर्यादित नसून शासनाच्या सर्वच कार्यालयात चिरीमिरी घेणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. याशिवाय अनेक कार्यालयांमध्ये एजंटांचाही सुळसुळाट आहे. एजंटशिवाय काम होत नसल्याने बारामती तालुक्यातील नागरिक हैराण झाले. शासनाचे अधिकारी व कर्मचारी एजंटकडून आलेलेच काम मार्गी लावत आहेत, तर थेट गेल्यावर हेलपाटे मारायला लावत आहेत.

बारामती शहरातील प्रशासकीय भवनातील काही कार्यालयांसह अन्य कार्यालयातही एजंटांचा मुक्त वावर आहे. विशेष म्हणजे पोलिस ठाण्यांच्या आजूबाजूला देखील या एजंटांची संख्या वाढली आहे. एजंटशिवाय कोणतेच काम होत नाही. काही एजंट तर स्वतःच अधिकारी असल्यासारखे वागत असतात. प्रत्येक कार्यालयात अनेक एजंटाची उठबस असते. कार्यालय बंद झाल्यानंतर रात्री उशिरापर्यंत या कार्यालयात अनेकदा कामे सुरु असतात. नेमकी रात्री कोणती कामे केली जातात हे न उलगडणारे कोडे आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे यासंबंधी सातततत्याने अधिकाऱ्यांना तंबी देतात. पक्षाच्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना तसेच अधिकाऱ्यांना चांगले वागून सर्वसामान्यांची कामे करण्याची सूचना देतात; मात्र त्यांच्या बोलण्याकडे बारामती तालुक्यातील शासकीय अधिकारी कायमच दुर्लक्ष करत आलेले आहेत. वारंवार तंबी देऊनही बारामतीतील सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सर्वच शासकीय कार्यालयांच्या ठिकाणी वाढलेला भ्रष्टाचार आणि पडलेला एजंटांचा विळखा यामुळे सर्वसामान्य बारामतीकरांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पैसे दिल्याशिवाय कोणतेच काम होत नसल्याने नेमकं सरकार कोणत्या योजना फुकट देत आहेत, याबद्दलही जनतेच्या मनात आता सवाल उठू लागले आहेत. वास्तविक अधिकाऱ्यांनी खुर्च्या सोडल्या तर शेतकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे अनेक प्रश्न मार्गी लागतील; मात्र बारामतीत असे प्रकार होताना दिसत नाहीत.

तालुक्यासह शहरातील पोलिस ठाण्यातही स्वतःला सामाजिक कार्यकर्ते म्हणून घेणाऱ्यांची उठबस वाढली आहे. काही अवैध धंदेवाल्यांकडून एजंटाकरवी पोलिसांना पैसे दिले जातात. अवैध धंदे सुरु राहावेत यासाठी मध्यस्थी करणाऱ्यांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढत चालली आहे, यावर उपाययोजना करणे तर दूरच पोलीसच अशांना पाठीशी घालत आहेत. त्यामुळे बारामती तालुक्यात दिवसेंदिवस भ्रष्टाचाराची कीड वाढत चालली आहे. यातून अनेक अधिकाऱ्यांनी माया जमवली असल्याची चर्चा तालुक्यात होत आहे. नगरपरिषदेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्यानंतर तरी अन्य विभागांनी त्यातून धडा घ्यावा अशी अपेक्षा सर्वसामान्यांकडून व्यक्त केली जात आहे.

## भैरवनाथ विद्यालयात ओळख श्रीज्ञानेश्वरीची उपक्रम



**आळंदी :** कुरुळी येथील भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात ' ओळख श्री ज्ञानेश्वरी ' ची या शालेय मुलांसाठी असलेल्या संस्कारक्षम उपक्रमाचा प्रारंभ श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांच्या हस्ते झाला. हरिनाम गजरात प्रशालेस अभ्यासक्रमाचे साहित्य देखील यावेळी सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी मुख्याध्यापक भाऊसाहेब थोरात, ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे अर्जुन मेदनकर, बाबाजी गवारी पाटील, आळंदी नगरपरिषद शिक्षण मंडळ माजी सभापती श्रीधर कुऱ्हाडे पाटील, कैलास माळशिकर, सोपान काळे आदी मान्यवर उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवार तर्फे प्रशालेस माऊलींची प्रतिमा भेट देण्यात आली. या प्रतिमेचे पूजन, ग्रंथ पूजन हरिनाम गजरात झाले. यावेळी शालेय मुलासाठी हरिपाठ वाटप आणि भैरवनाथ माध्यमिक विद्यालयातूस ग्रंथालयास संदर्भ ग्रंथ श्री ज्ञानेश्वरी पारायण आणि सार्थ प्रत, सार्थ हरीपाठ आणि मुख्याध्यापक भाऊसाहेब थोरात यांचे सह सर्व उपस्थित शिक्षक यांचे कडे श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे यांचे हस्ते सुपूर्द करण्यात आले. मुख्याध्यापक भाऊसाहेब थोरात यांनी अशा उपक्रमाची गरज आजच्या पिढीला कशी आहे हे सांगितले. तुकाराम गवारी, श्रीधर कुऱ्हाडे, अर्जुन मेदनकर आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. निवृत्ती भुजाडे, संदीप सासवडे, राजकुमार गायकवाड, सरस्वती सोनवणे, सुवर्णा मोरे, कल्पना सरवदे, संगिता भगत, पुनम शिंदे, रसिका घाडगे शिक्षक वृंद यांनी कार्यक्रमाचे यशस्विते साठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कांचन बेल्हेकर यांनी केले, तर आभार सतिश नायकवाडी यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आळंदी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी खांडेकर



**आळंदी :** आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांची आळंदीतील दोन वर्ष कार्यकाळ पूर्ण होत नाही तोच त्याची पदोन्नतीने आळंदी नगरपरिषदेतून थेट लातूर महानगरपालिकेत उपायुक्त पदी पदोन्नती त्यांनी बदली करून घेतली. यामुळे आळंदी नगरपरिषदेच्या रिक्त झालेल्या जागेवर मुख्याधिकारी तथा प्रशासक पदी नातेपुते नगरपंचायतचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांची सोलापूर जिल्हा बदल करून आळंदी नगरपरिषद ( पुणे ) येथे बदली झाली आहे. आळंदीचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी पदोन्नतीने बदली करून घेतल्याने त्यांचा नगरपरिषद कर्मचारी वृंद यांनी निरोपाचे दिनी फुलांचे पायघड्या घालून स्वागत, सत्कार करीत निरोप दिला. आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांची लातूर महानगरपालिकेच्या उपायुक्त पदी नियुक्ती पदोन्नतीने झाली. यामुळे आळंदी नगरपरिषदे मध्ये फुलांच्या पायघड्यांनी त्यांचे निरोपाचे दिनी स्वागत करीत निरोप देण्यात आला. विविध मान्यवर, सेवाभावी संस्था, व्यक्ती, पदाधिकारी यांनी त्यांना भेट वस्तू भेट देत अनेकांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आळंदी नगरपरिषद कर्मचारी वृंद यांचे तर्फे श्रींची मूर्ती, पगडी, शाल, श्रीफळ देत सन्मान करण्यात आला. याशिवाय शहरातील अनेक मान्यवरांनी देखील सत्कार करीत निरोप दिला. शिवतेज मित्र मंडळ, आळंदी ग्रामस्थ,पदाधिकारी आदी मान्यवरांनी देखील सत्कार केला. यावेळी नगरपरिषद विविध विभाग प्रमुख संजय गिरमे, सचिन गायकवाड, सोमनाथ धरम, विष्णूकुमार शिवशरण, अर्जुन घोडे, श्रद्धा गर्जे, सीमा चारभे, मयुरी पाटोदार, संगीता येलमेवाड, रेवती गोसावी, शशांक कदम, विलास भोसले, नाना घुंडरे, दिगंबर कुऱ्हाडे, मिथील पाटील,अरुण घुंडरे, संध्या जाधव ,वैशाली पाटील ,अमित घुंडरे, प्रसाद बोराटे, कर्मचारी वृंद, सेवाभावी संस्थांचे, पक्षाचे पदाधिकारी, नागरिक, ठेकेदार, सत्कारास उस्थितीत होते.

## शेतकऱ्यांचे चार विद्युतपंप चोरी

**शिक्रापूर :** म्हसे बुद्रुक, ता. शिरुर येथील काही शेतकऱ्यांनी घोडनदीवरील बंधाऱ्याच्या पाण्यातून शेताला पाणी देण्यासाठी विद्युतपंप बसवलेले असून सायंकाळच्या सुमारास शेतातील कामे आटोपून शेतकरी घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळच्या सुमरास शेतकरी शेतात गेले असता त्यांना बंधाऱ्यालगत शेतात पाणी नेण्यासाठी लावलेल्या विद्युत मोटार नसल्याचे दिसून आल्याने शेतकऱ्यांनी आजूबाजूला पाहणी केली असता, चोरट्यांनी संतोष खाडे यांच्या दोन तर जालिंदर खाडे व लहू खाडे यांच्या दोन असे चक्क चार विद्युत पंप पाईप व केबल कापून चोरून नेल्याचे समोर आले, याबाबत संतोष प्रभू खाडे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हे दाखल केले आहेत.

## योगेश चितारे यांना डॉक्टरेट प्रदान

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील जिरायती ग्रामीण भागातील कौठळी गावातील अल्पभूधारक गरीब शेतकरी कुटुंबातील योगेश चितारे याला कोल्हापूर येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने भौतिकशास्त्र (फिजिक्स) या विषयामधील डॉक्टरेट ही पदवी दिनांक १८ मार्च रोजी प्रदान करण्यात आली. इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ग्लोबल नेटवर्क फॉर मेडिकल हेल्थ प्रोफेशन अँड बायोथीक्स एज्युकेशनचे महासचिव डॉ. वेदप्रकाश मिश्रा, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा, रजिस्ट्रार डॉ. व्ही. व्ही. भोसले यांच्या हस्ते डॉ. चितारे यांना पदवी प्रदान करण्यात आली. कौठळी गावातील डॉक्टरेट ही पदवी मिळवलेले ते पहिलेच विद्यार्थी असून त्यांनी ही पदवी मिळवून आपल्या गावाच्या नावाबरोबर इंदापूर तालुक्याचे नाव देखील मोठे केले आहे. डॉ. योगेश चितारे यांनी "सोल्युशन ग्रोथ ऑफ टंग्स्टन ऑक्साइड ऑन टू डिमेन्सिशनल टायटनेट अँड हेक्सानायोबेट नॅनोशिट फॉर फोटोकॅटॅलिटिक डाय डिग्रेडेशन" या विषयावरील प्रबंध सादर केला असून आत्तापर्यंत त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर २० पेक्षा जास्त रिसर्च पेपर, ४ पेटंट, २ रिव्हिव पेपर, एक बुक चॅप्टर, व ४ कॉपीराईट प्रसिद्ध केले आहेत. त्यांना संशोधनासाठी मुख्य मार्गदर्शक डॉ. जयवंत गुंजकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर वैज्ञानिक प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे व विद्यापीठातील इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

## गणेश झांबर तोत्रे यांना पीएचडी प्रदान



**राजगुरूनगर :** राजगुरूनगर येथील खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील रसायनशास्त्र या विषयाचे अध्यापक गणेश झांबर तोत्रे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच. डी.पदवी मिळाली. येथील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील रसायनशास्त्र या विषयाचे अध्यापक गणेश तोत्रे यांना रसायनशास्त्र या विषयातील 'सिंथसिस ऑफ ट्रान्झिशन मेटल ऑक्साईड बेस्ड नॅनो कॅटलिस्ट फॉर ऑरगॅनिक ट्रान्सफॉरमेशन या घटकावर आधारित सादर केलेल्या संशोधन प्रबंधास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. ही पदवी प्राप्त झाली. त्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. त्यांच्या या संशोधन प्रबंधासाठी त्यांना प्राचार्य डॉ.प्रकाश पाटील व प्राध्यापक डॉ. प्रमोद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरीभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी व सर्व संचालक मंडळ, प्राचार्या, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी गणेश तोत्रे यांचे अभिनंदन केले.

## नशामुक्त समाजनिर्मितीसाठी लोकसहभाग महत्वाचा



**कारेगाव :** नशामुक्त समाज अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी महत्वाचा असून, नशामुक्त समाज निर्मिती साठी लोकसहभाग अतिशय महत्वाचा असल्याचे प्रतिपादन रांजणगाव एमआयडीसीचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी केले. रांजणगाव एमआयडीसी, ता. शिरुर येथील पोलिस ठाण्याच्या वतीने नशामुक्ती अभियान आयोजित करण्यात आले होते. या वेळी पोलिस पाटील, शाळांचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, तंटामुक्ती समिती अध्यक्ष,विविध गावचे सरपंच यांसह विविध शाळांचे मुख्याद्यापक, शिक्षक यावेळी उपस्थित होते.

## वीजचोरी प्रकरणी सात जणांवर गुन्हे

**शिक्रापूर :** मलठण, ता. शिरुर येथील अष्टविनायक महामार्ग परिसरातील शिंदे मामा व्यापारी संकुल सह परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणी विद्युत वितरण विभागाच्या भरारी पथकाने छापे टाकले असता, अनेकांनी आकडे टाकून वीजचोरी केल्याचे दिसून आले. विद्युत वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत वीजचोरी करणाऱ्या सात जणांवर शिरुर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल केले आहे. मलठण येथील अष्टविनायक महामार्ग परिसरातील शिंदे मामा व्यापारी संकुलसह परिसरातील काही दुकान व हॉटेल येथे विद्युत वितरण विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत आडभाई यांच्या पथकाने छापे टाकले असताना त्यांना थूरकटवाडी मिसळ, मल्लिकार्जुन डेअरी व केक शॉप, राजयोग लॉन्स मंगल कार्यालय व शिंदे मामा व्यापारी संकुल येथे काही इसमांनी आकडे टाकून वीजचोरी केल्याचे दिसून आले. दरम्यान. भरारी पथकाने याबाबत पंचनामे केले.

# भीक नको कुत्रं आवर अशी अवस्था

## अवजड वाहनांच्या बंदीमुळे कवडीपाट येथे वाहनांची होतेय कोंडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणी काळभोर :** पुणे शहरात अवजड वाहनांना दिवसा बंदी घालण्यात आलेली आहे. तर रात्री अकरा नंतर वाहनांना शहरात जाण्यासाठी प्रवेश देण्यात येतो. मात्र, पुण्यातील ही वाहतूक कोंडी प्रशासनाने पुणे-सोलापूर महामार्गाच्या माथी मारल्याचे दिसून येत आहे. या मार्गावरील कवडीपाट (कदमवाकवस्ती, ता. हवेली) येथे अवजड वाहनांना बंदी घातल्याने गेल्या दोन दिवसांपासून वाहनांच्या पाच किलोमीटरपर्यंत लांब रांगा लागत आहेत. या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे रोगापेक्षा इलाज भयंकर अशी म्हणायची वेळ नागरिकांवर आलेली आहे.

पुणे शहरात होणारे अपघात व वाहतूक कोंडी रोखण्यासाठी प्रशासनाच्या वतीने रात्री अकरानंतर अवजड वाहनांना शहरात जाण्यासाठी परवानगी दिली आहे. पुणे शहर पोलिसांनी याबाबत वाहनचालकांना कोणतीही पूर्वकल्पना दिलेली नाही. याउलट वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांना आदेश देऊन कवडीपाट टोलनाक्यापासून पुढे शहरात जाणारी अवजड वाहने अडवा व त्यांना पुन्हा माघारी पाठवा, असे सांगितले आहे. वरिष्ठांनी दिलेले आदेश कर्मचारी अतिशय चांगल्या पद्धतीने पाळत आहेत.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून पुण्याच्या दिशेने जाणारी अवजड वाहने कवडीपाट टोलनाक्यावर अडवून गेल्या दोन दिवसांपासून माघारी पाठवली जात आहेत. त्यामुळे कवडीपाट टोल नाका, लोणी कॉर्नर ते माळी मळ्यापर्यंत वाहनांच्या महामार्गाच्या दोन्ही बाजूला रांगा लागत आहेत. या वाहतूक कोंडीत नागरिकांना तासनतास अडकून पडावे लागत आहे.

दरम्यान, पुणे शहर हे वाहतूक कोंडीने त्रस्त असलेले देशातील एक शहर आहे. शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत असून ती उग्र रूप धारण करीत आहे. पुण्यातून ५ राष्ट्रीय महामार्ग, तर १० पेक्षा अधिक राज्यमार्ग गेले आहेत. या ५ राष्ट्रीय महामार्गांपैकी पुणे-सोलापूर महामार्गावर वाहतूक कोंडीची अवस्था खूप बिकट झाली आहे. हडपसर ते उरुळी कांचन या दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीत नागरिकांचा श्वास गुदमरला आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूककोंडी ही एक प्रचंड मोठी समस्या बनली आहे. वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यात बराच वेळ जातो, आर्थिक प्रगती मंदावते, रस्त्यावरील किरकोळ भांडण वाढतात, वाहन चालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंधन मोठ्या प्रमाणावर जळते. तसेच ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते. पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतूककोंडीच्या समस्यांचा पुणे प्राईम न्यूजने केलेल्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातील? वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका होणार का? हे पाहणेही आता महत्वाचे ठरणार आहे.

### वाहतूककोंडी कमी होऊ शकते?

● पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर थेऊर फाटा हा एक मोठा चौक आहे. या चौकातून लोणीकंदच्या दिशेने पुढे पुणे-नगर रस्त्याला जाता येते. या ठिकाणी जर अवजड वाहने अडवली अथवा येथून वाहने लोणीकंदच्या मार्गाने वळवली, तर सदर महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी थोड्याफार प्रमाणात कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, जर ही वाहने कवडीपाट टोलनाक्यावर अडवली जाणार असतील, तर पुन्हा महामार्गावर दोन्ही बाजूला 5 किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागणार, हे मात्र १०० टक्के खरे ठरणार आहे.

# बलिदानदिनसाठी प्रशासन सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा सर्वांच्या सहयोगातून योग्य समन्वयाने शांततेत संपन्न करु, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांनी केले असून कार्यक्रमासाठी येणाऱ्या शंभुभक्तांना आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सुचना शिरुरच्या प्रांताधिकारी पूनम अहिरे यांनी दिल्या असल्याने शंभूराजांच्या बलिदान दिनसाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

श्री क्षेत्र वढु बुद्रुक (ता. शिरुर) येथे धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी नियोजनाची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व प्रांताधिकारी पूनम अहिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच संपन्न झाली. यावेळी प्रभारी तहसीलदार विनय कौलवकर, गटविकास अधिकारी महेश डोके, शिक्रापूरचे पोलीस निरिक्षक दिपरतन गायकवाड, मंडलाधिकारी विकास फुके, सरपंच ज्ञानेश्वर भंडारे, ग्रामपंचायत सदस्य अनिल शिवले, कृष्णा आरगडे, हिरालाल तांबे, वैभव भंडारे, संजय भंडारे, अंकुश शिवले, धर्मवीर संभाजीराजे स्मृती समितीचे अध्यक्ष सोमनाथ भंडारे, लक्ष्मणराव भंडारे, शांताराम भंडारे, धर्मवीर युवा मंचचे अध्यक्ष अनिल भंडारे, पांडुरंग गायकवाड यांसह आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी येणाऱ्या शंभुभक्तांसाठी बससेवा, पार्किंगसह आवश्यक सुविधांसह पुणे अहिल्यानगर हमरस्त्यावर वढु समाधिस्थळाकडे दिशादर्शक कमान उभारण्याची मागणी स्थानिकी केली. सदर बैठकीनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व प्रांताधिकारी पूनम अहिरे यांनी यांनी शंभुराजांच्या समाधिस्थळी पुष्पहार अर्पण करुन, दर्शनव्यवस्था, पार्किंग, वाहतुक व्यवस्थेतील बदल, पोलिस बंदोबस्त, हेलीपॅडची व्यवस्था, स्वच्छतागृहे, हिरकणी कक्ष, पब्लिक अनाऊंसमेंट, धर्मसभेचे नियोजन, यासह आवश्यक सोयीसुविधांचा आढावा घेत विद्युत वितरण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम यांसह सर्व विभागांना समन्वयाने काम करण्याच्या सुचना दिल्या. तर पुण्यतिथीचा कार्यक्रम शांततेत संपन्न व्हावा यासाठी कोणीही प्रक्षोभक वक्तव्य किंवा वर्तन करु नये, योग्य समन्वयाने सर्वांच्या सहयोगातून हा कार्यक्रम संपन्न करु असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांनी नागरिकांना केले आहे.

## करंदी शाळेचे संगणक कोडिंगमध्ये यश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** करंदी, ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी अमेझॉन फ्युचर इंजिनिअर व लीडर फॉर इक्विटी कोड टू एनवरन्स लर्निंग या दोन्ही संस्थांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय सी एस स्ट्रिंग प्रोग्राम संगणक कोडिंग स्पर्धेत शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी यश संपादित केले आहे. करंदी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींनी अमेझॉन फ्युचर इंजिनिअर व लीडर फॉर इक्विटी कोड टू एनवरन्स लर्निंग या दोन्ही संस्थांच्या वतीने तालुकास्तरीय सी एस स्ट्रिंग प्रोग्राम संगणक कोडिंग स्पर्धेत सहभाग घेऊन यश मिळवीत दोन लॅपटॉप, दोन टॅब, एक अलेक्सा व पदक मिळवले. सातवीत शिकणाऱ्या एकनाथ वर्पे व तनिष्का कैलास बरबाटे या दोघींनी लॅपटॉप, तर आयुष काळू पंचमुख, भार्गवी सचिन भुजबळ व स्वराज सचिन शेळके यांनी टॅबसह पदक मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका कल्याणी उमाप व संगणक शिक्षक तुषार जाधव यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे ग्रामस्थांनी अभिनंदन करत कौतुक केले आहे.

# देवीच्या काठी मिरवणुकीत दोघांना मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कवठे येमाई येथील इचके वाडी येथे रेणुका माता मंदिर परिसरात देवीच्या काठी मिरवणूक कार्यक्रम वेळी गैरसमजुतीतून दोघांना जातीवाचक शिवीगाळ दमदाटी करत मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. शिरूर पोलीस स्टेशन येथे गोरख रामहरी इचके, सार्थक गोरख इचके, प्रतिक नामदेव इचके, संकेत बबन ईचके, यश राजेंद्र इचके व सागर सुरेश इचके यांच्याविरुद्ध मारहाणीसह अॅट्रॉसिटीप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

कवठे येमाई येथील इचके वाडी येथे रेणुका माता मंदिर परिसरात देवीचा काठी मिरवणूक कार्यक्रम सुरु असताना चरणजीत खनपटे हा त्याच्या इंद्रजीत या लहान भावासमवेत मिरवणूक पाहण्यासाठी गेलेला असताना गणेश इचके व विनायक इचके यांच्यासमवेत मिरवणूक पाहत होते, चरणजीत याच्या सोबत असलेल्या मित्रांना पाहून माझ्या विरोधातील लोकांना चरणजीत हा मदत करत असल्याचा गैरसमज करुन घेऊन गोरख इचके याने चरणजीत व त्याचा भाऊ इंद्रजीत यास जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. चरणजीत याने मारहाण का करता असे म्हटले असता गोरखच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींनी सुद्धा इंद्रजीत व चरणजीत यांना जातीवाचक, शिवीगाळ करत मारहाण केली. चरणजीत केशव खनपटे यांनी शिरुर पोलिसांत फिर्याद दिल्याने पोलिसांनी गोरख रामहरी इचके, सार्थक गोरख इचके, प्रतिक नामदेव इचके, संकेत बबन ईचके, यश राजेंद्र इचके व सागर सुरेश इचके(सर्व रा. कवठे येमाई ता. शिरुर जि. पुणे याच्याविरुद्ध अॅट्रॉसिटीप्रकरणी गुन्हे दाखल केले.

## कंटेनरच्या धडकेत युवक ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर-चाकण रस्त्याने प्राजक्त गुंजाळ हा युवक दुचाकीहून चाकण बाजूने शिक्रापूरकडे येत असताना, मांजरेवाडी येथे चाकण बाजूने भरधाव वेगाने आलेल्या कंटेनरची धडक बसून अपघात झाला. या अपघातात प्राजक्त रस्त्यावर पडून जखमी झाला. कंटेनर चालक पळून गेला, तर प्राजक्तला उचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वी प्राजक्त आदिनाथ गुंजाळ (२५, सध्या रा. हिंजवडी पुणे मूळ रा. राहुरी जि. अहमदनगर) याचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. याबाबत किरण नवनाथ गुंजाळ यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

## प्रतिभाताई गारटकर यांचा वाढदिवस उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**इंदापूर :** जिप शाळेत पहिलीचे शिक्षण घेतले त्याच शाळेत जाऊन पुन्हा ९० व्या वर्षी मुलांचा वर्ग घेऊन आपला ९० वा वाढदिवस मुलांना पुस्तके, व खाऊचे वाटप करून शाळेतील मुलांसोबत साजरा केला. ज्येष्ठ कवियत्री, गुरुवर्य श्रीमती प्रतिभाताई गारटकर या शाळा क्रमांक २ च्या माजी विद्यार्थीनी होत. तेथेच त्यांनी बाराखडी शिकली.

पुढे त्याच शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणूनही काम पाहिले. त्यांच्या ९० वा वाढदिवसानिमित्र त्याच शाळेत जाऊन आपल्या ज्युन्या आठवणी मुलांना सांगितल्या. जिप शाळा क्र १ व २ येथे त्यांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य अरविंद गारटकर, तर प्रमुख पाहूणे म्हणून केंद्र प्रमूख चव्हाण हे होते. प्रास्ताविक प्रा. कृष्णा ताटे यांनी केले. यावेळी शाळा नं १ च्या मुख्याध्यापिका मंदाकिनी बोराटे व शाळा नं. २ च्या मुख्याध्यापिका जाई कोळेकर, सामाजिक कार्यकर्ते हमीदभाई आत्तार, महादेव चव्हाण सर, संतोष जामदार, अशोक ननवरे, रघुनाथ खरवडे, धरमचंद लोढा, सचिन चौगुले, शिक्षिका रजिया शेख, भारती पौळकर, मनिषा मोटे, ज्योती पवार, वैशाली वर्तले, पुष्पा दळवी, कृष्णा शिंदे, दत्तात्रय वारे आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन विनय मखरे यांनी केली, तर आभार शिक्षिका जाई कोळेकर यांनी मानले.



# कांद्याची आवक वाढली; दरात घसरण; पालेभाज्यांचे भाव कोसळले

## एकुण उलाढाल ५ कोटी ६० लाख रुपये



चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक. (छाया : अविनाश दुधवडे, चाकण)

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांद्याच्या आवकेत वाढ होऊन दरात घसरण झाली. डांगर भोपळा, बटाटा व लसणाची आवक झाली. पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्याने भावात घसरण झाली. भुईमूग शेंगा व जळगाव भुईमूग शेंगांची आवक झाली नाही. एकूण उलाढाल ५ कोटी ६० लाख रुपये झाली.


चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ८,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३, ५०० क्विंटलने वाढल्याने भावात ४०० रुपयांची घट झाली. कांद्याचा कमाल भाव २,००० रुपयांवरून १, ६०० रुपयांवर स्थिर राहिला. बटाट्याची आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २५० क्विंटलने घटून बटाट्याचा कमाल भाव २ हजार रुपयांवर स्थिर राहिला. लसणाची एकूण आवक २८ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५ क्विंटलने वाढून लसणाचा कमाल भाव १० हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २६५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ८,५०० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,६०० रुपये,भाव क्रमांक २.१,४०० रुपये,भाव ३.१,००० रुपये. बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव२,००० रुपये, भाव १,४०० रुपये, भाव १,२०० रुपये. फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३१६ क्विंटल (६०० ते १,००० रू.),कोबी - २७० क्विंटल (३०० ते ५०० रू.),फ्लॉवर -२६० क्विंटल (६०० ते ८००रू.),वांगी - ८२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),भेंडी - ८४ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.),दोडका - ५८ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),कारली - ७२ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.),दुधीभोपळा - ६२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.),काकडी - ८२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.),फरशी - ५० क्विंटल (३,५०० ते ४,५०० रु.),वालवड - ५२ क्विंटल (३,००० ते ५,५०० रुपये), ढोबळी मिरची -१५८ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.),चवळी -४२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),शेवगा -३५ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.),गाजर - १८० क्विंटल (१,००० ते १,८०० रु.),गवार -४६ क्विंटल (५,००० ते ७,००० ),वाटाणा -२०० क्विंटल (४,५०० ते ५,०००),आले -१९० क्विंटल ( २,००० ते ४,००० ).,

● चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १४ हजार ५०० जुड्या (६०० ते १,२०० रुपये ),कोथिंबीर - एकूण २३ हजार २५० जुड्या (६०० ते १,००० रुपये,),शेपू - एकूण ४ हजार १०० जुड्या (८०० ते १,००० रुपये ),

● चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी ४५ जर्शी गाईपैकी ३३ गाईची विक्री झाली. (१०,००० ते ५०,००० रु.),६५ बैलांपैकी ५५ बैलांची विक्री झाली. (१०,००० ते ४०,००० रु.), १२० म्हशीपैकी १०५ म्हशींची विक्री झाली. (२०,००० ते ८०,००० रु.),१०,५४० शेळ्या - मेंढ्यापैकी १०,३६० शेळ्यांची विक्री झाली. (२,००० ते १५,००० रु.),.

# पाण्याखालचं हॉटेल!



आलिशान आरामदायी हॉटेल ते ही समुद्रात पाण्याखाली असेल, तर ते कुणालाही आवडेल. समुद्राच्या आत जाणाऱ्या लिफ्टमधून बाहेर पडताच एका आलिशान हॉटेलमध्ये प्रवेश होतो. नंतर एका आलिशान बेडरूमकडे दिसते. हा एक लक्झरी किंग साइज बेड आहे, या आलिशान बेडरुममध्ये पर्सनल बसण्याची जागा, सेन्सर-संचलित शौचालय, वॉटर-ग्लास सिलिंग आणि समुद्राच्या आतील सुंदर दृश्य तुम्हाला मोहीत करतील. समुद्राच्या खालील असलेल्या या हॉटेलची मोहिनी कुणालाही होईल.

या हॉटेलमध्ये याआधी राहिलेल्या एका प्रवाशाने लिहिले, 'मी इथे या खोलीत राहिलो होतो, थोडा नर्व्हस होतो; पण हा एक सुंदर अनुभव होता.' अन्य एका युजरने लिहिले, 'कल्पना करा की जेव्हा रात्रीची वेळ असेल आणि येथे अंधार असेल, तुमच्या आजूबाजूला काय आहे हे माहिती नसता तुम्ही येथे झोपू शकता का?' तिसऱ्या एका युजरने लिहिलेय की अंडरवॉटरची मला भीती वाटते.

'द मुराका' नावाचे हे आलिशान दुमजली हॉटेल मालदीव येथील कॉनराड मालदीवच्या रंगाली आयलंड रिसॉर्टमध्ये आहे. वेबसाइट 'द डायजेस्ट ऑनलाइन'च्या मते हे हॉटेल समुद्रपातळीपासून १६ फूट खाली आत आहे, १८०-डिग्रीच्या घुमटाखाली याचे मास्टर बेडरूम आहे. या हॉटेलमध्ये २४-तास बटलर आणि शेफ, स्पा सेंटर, ऑन-कॉल फिटनेस ट्रेनर आणि वैयक्तिक जेट स्की अशा सुविधा आहेत.

# या देशांकडे नाही लिखित संविधान

भारतात लोकशाही आहे. या देशाच्या नागरिकांना संविधानाने विविध स्वातंत्र्यं बहाल केली आहे. भारताचं संविधान लिखित स्वरुपात आहे. आपल्या देशाचा गाडा संविधानानुसारच हाकला जातो. पण काही देशांमध्ये लिखित संविधान नाही. मग या देशांचा गाडा कशा प्रकारे हाकला जात असावा? जाणून घेऊ.

● ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. पण या ब्रिटनकडे स्वत:चं संविधान नाही. वाचून आश्चर्य वाटलं असेल. पण हे खरं आहे. या देशात काही नियम तयार करण्यात आले होते. या नियमांना आधारभूत मानून इथे शासन चालवलं जातं. या नियमांना संविधानाइतकंच महत्त्व आहे. ब्रिटनमधले कायदे वेळ आणि परिस्थितीनुसार बदलता येतात. इथल्या संसदेकडे हे अधिकार आहेत.

● सौदी अरेबियामध्येही चित्रविचित्र प्रथा आहेत. इथल्या नियम, कायद्यांविषयी आपण जाणतोच. या देशालाही संविधान नाही. इथला राज्यकारभार कुराणातल्या वचनांनुसार चालतो.

● इस्रायलकडेही स्वत:चं संविधान नाही. स्वातंत्र्यानंतर इस्रायलमध्ये संविधान तयार करण्याच्या घडामोडींना वेग आला होता. पण संसदेत होणाऱ्या गदारोळामुळे हे शक्य झालं नाही. इथे अलिखित संविधानाला मान्यता देण्यात आली आहे.

● न्यूझीलंडमध्येही लिखित संविधान नाही. इथे अलिखित संविधान आहे. त्यानुसार इथलं शासन चालतं.



ब्रिटन



सौदी अरेबिया



इस्रायल

# बबलमध्ये बसा, वन्यप्राणी बघा



प्राण्यांना जंगलात मुक्तपणे विहार करताना बघणं कोणाला आवडणार नाही... जंगल सफारीदरम्यान विविध प्राणी न्याहाळता येतात. हे प्राणी आपल्या घरात अगदी निवांत फिरत असतात. हा अनुभव खूप अनोखा असतो. हे प्राणी बघण्यासाठी जीप किंवा बसमधून फिरावं लागतं. पण थायलंडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पारदर्शी बबलमध्ये बसून वन्य प्राणी न्याहाळता येणार आहेत. इथल्या अनंतरा गोल्डन ट्रँगल एलिफंट कॅम्प अँड रिसॉर्टमध्ये पारदर्शी बबल्स तयार करण्यात आले आहेत. या तंबूरुपी बबल्समध्ये बसून आजूबाजूचे हत्ती बघता येतील. हा जगातला पहिलाच प्रयत्न असल्याचा रिसॉर्टचा दावा आहे. या बबल्समध्ये मोठ्या आकाराचा बेड आणि लिव्हिंग रुम आहे. अर्थात हा जगावेगळा अनुभव घेण्यासाठी एका रात्रीचे ३५ हजार रुपये मोजून दोनजण बबलमध्ये राहू शकतील. हे बबल्स वातानुकुलीत आहेत. अशा बबल्समध्ये बसून वन्य प्राणी बघण्याचा अनुभव भन्नाट असेल यात काहीच शंका नाही.

# ऑफर मोफत निवासाची!

सिंगापूर:सिंगापूरचे पंचतारांकित हॉटेल त्यांच्या ग्राहकांना व्हाउचरद्वारे मोफत निवासाची ऑफर देतात. तुम्ही आलात आणि पाऊस पडला तर एका रात्रीच्या मुक्कामाचा संपूर्ण खर्च मोफत मिळतो. कोठेही बाहेर जायचे असेल, तर सर्वात आधी विचार येतो, हॉटेलचा. बुकिंग केले आहे का, तिथे काय सोयी आहेत, पैसे किती लागतील, याचा विचार केला जातो; पण एखाद्या हॉटेलने फुकट राहू दिले तर? होय, सिंगापूरमधील एक हॉटेल आपल्या ग्राहकांसाठी अशीच ऑफर देत आहे.



'सीएनए'च्या रिपोर्टनुसार, सिंगापूरमधील एका पंचतारांकित हॉटेलने आपल्या ग्राहकांसाठी एक अनोखी ऑफर आणली आहे. हे हॉटेल आपल्या पाहुण्यांना पावसामुळे त्यांचा दिवस खराब झाल्यास मोफत राहण्याची सुविधा तर देईलच;पण त्यांचा सर्व खर्चही उचलेल. सिंगापूरमध्ये अर्ध्या वर्षात अनेकदा पाऊस पडतो. त्यामुळे सिंगापूरच्या लायन सिटीमधील इंटरकाँटिनेंटल हॉटेलने आपल्या ग्राहकांना खूश करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. यामागील हॉटेलचा उद्देश स्पष्ट आहे की आपल्या पाहुण्यांच्या सुट्ट्या खराब होऊ नयेत. हॉटेलचे व्यवस्थापक अँड्रेस क्रेमर यांनी सांगितले, की एके दिवशी मी माझ्या मित्रांसोबत लक्झरी प्रवास कसा करायचा याबद्दल बोलत होतो आणि एका मित्राने गमतीने मला चांगल्या हवामानाची हमी देण्यास सांगितले. हे माझ्या मनात खटकले आणि मी माझ्या हॉटेलमध्ये ते अंमलात आणले.

हॉटेलने ऑफरसाठी व्हाउचर सिस्टम ठेवली आहे. त्यात चेक इन करणाऱ्या पाहुण्यांना काही व्हाउचर दिले जातील, जे दिवसाच्या कोणत्याही चार तासांच्या ब्लॉकमध्ये पाऊस असल्यास वैध असतील. यासाठी हॉटेलची अट आहे की पाऊस १२० मिनिटे किंवा त्याहून अधिक काळ टिकला पाहिजे. हॉटेलच्या परिस्थितीनुसार, पाऊस पडल्यास, तुमचे व्हाउचर सक्रिय केले जाईल. तुम्ही ६ महिन्यांच्या आत कधीही हॉटेलला भेट देऊन हे व्हाउचर वापरू शकता.

# शुक्राची चांदणी...



चंद्रासह मंगळावरही जीवसृष्टीच्या अस्तित्त्वाच्या खुणा शोधल्या जात आहेत. भविष्यात मानवाला अंतराळात राहता यावं, यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. येत्या काळात अंतराळ पर्यटनाला लोकप्रियता मिळाली तर आश्चर्य वाटायला नको! आता शुक्रावर मानवी वस्ती निर्माण करता येईल का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. शुक्र हा आकाशातला तेजस्वी ग्रह. शुक्राची ही चमचमती चांदणी अनेकांना आकर्षित करते. कविता, गाण्यांमध्ये या शुक्रताऱ्याचा उल्लेख असतो. ग्रहांना स्वत:चा प्रकाश नसतो. त्यामुळे ग्रह आकाशात फार तेजस्वी दिसत नाहीत. पण शुक्र आकाशात चमकत असतो. अर्थात शुक्रावर वसाहत करणं माणसाला शक्य नाही. त्याच्या पृष्ठभागावर सल्फ्युरिक ॲसिडचं भांडार आहे. शुक्रावर सल्फ्युरिक ॲसिडचं ढगांप्रमाणे आच्छादन आहे. त्यामुळे माणूस इथे थांबू शकत नाही. इथे माणसाची हाडंही काही क्षणात वितळून जातात. सूर्याच्या जवळ असल्यामुळे शुक्राचं तापमान ४२५ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचतं. या ग्रहावर प्रचंड उष्णता असते. कोणतंही अंतराळ यान या ग्रहाच्या पृष्ठभागावर दोन तासांपेक्षा अधिक काळ थांबू शकत नाही. शुक्र ग्रहाच्या वातावरणात वायूंनी तयार झालेले ढग आहेत. त्यामुळे शुक्राच्या पृष्ठभागावरून कधीही सूर्याचं किंवा पृथ्वीचं दर्शन होणार नाही. शुक्रावरची परिस्थिती प्रचंड प्रतिकूल आहे. त्यामुळे इथे माणसाचं राहणं जवळपास अशक्य आहे.

# इथे आहे मद्यपानाला परवानगी!

आपल्या देशात बजेटला खूप महत्त्व आहे. बजेट सादर करणारा मंत्री हुशार असावा, त्याला अर्थशास्त्राचं ज्ञान असावं अशी आपली अपेक्षा असते. बजेटमुळे काय स्वस्त होणार, काय महागणार, कोणाला काय मिळालं यावर बरीच चर्चा होत असते. निर्मला सीतारामन या भारताच्या अर्थमंत्री आहेत. विविध देशांमध्ये बजेट सादर होतं. पण ब्रिटनमधलं बजेट खऱ्या अर्थाने अनोखं म्हणता येईल. इथे बजेट सादर करणाऱ्या मंत्र्याला चान्सलर म्हटलं जातं. कोणत्याही देशाची संसद म्हणजे लोकशाहीचं पवित्र मंदिर. अशा मंदिरात मद्यपान करून येणं चुकीचं आहे. पण ब्रिटनमध्ये चान्सलर मद्यपान करून बजेट सादर करू शकतो. त्याला तशी परवानगी असते. ब्रिटनची संसद म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमावलीत या बाबीचा समावेश आहे. मद्यपान करून बजेट सादर करण्याचा अधिकार फक्त चान्सलरला असतो. वर्षातला फक्त एकच दिवस चान्सलर मद्यपान करून संसदेत येऊ शकतो. त्यानंतर त्याला अशी परवानगी नसते. हा नियम ब्रिटनमध्ये अनेक दशकांपासून आहे. इथल्या लोकांना हा प्रकार अर्थहीन वाटतो. इतकंच नाही, तर इथे बजेट सादर करण्यासाठी १०० वर्षं एकाच ब्रीफकेसचा वापर करण्यात आला होता. १८६० मध्ये विलियम ग्लॅडस्टोन यांच्यासाठी ही ब्रीफकेस तयार करण्यात आली होती. स्कारलेट असं या ब्रीफकेसचं नाव होतं. १९६५ पर्यंत याच ब्रीफकेसमध्ये बजेट असायचं. १९६५ मध्ये तत्कालीन चॅंसेलर जेम्स कॅलेघन यांनी स्वत:साठी नवी ब्रीफकेस तयार करून घेतली आणि स्कारलेटला बाद केलं.



# वधूच्या अशाही मागण्या!

लग्न हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. प्रत्येक व्यक्तीला वैवाहिक जीवन जगायचे असते. अशा परिस्थितीत, बरेच लोक त्यांच्या लग्नापूर्वी एकदा तरी बॅचलर पार्टीसाठी बाहेर पडतात. हा मोठ्या शहरांच्या परंपरेचा भाग आहे. परदेशात तर बॅचलर पार्ट्यांमध्ये मर्यादा ओलांडल्या जातात. या मर्यादा लक्षात घेऊन एका वधूने लग्नाआधी बॅचलोरेट पार्टीसाठी आपल्या मंगेतराला एक यादी दिली, जी आश्चर्यचकित करणारी आणि हसवणारी आहे.



इसाबेल ब्लाउंट २४ वर्षांची असून ती इंग्लंडमधील लीसेस्टरशायरमध्ये राहते. अलीकडे हिच्ड नावाच्या वेबसाईटशी बोलताना इसाबेलने तिच्या मंगेतराला बॅचलर पार्टीसाठी दिलेल्या नियमांची यादी समजावून सांगितली. काही दिवसांपूर्वी इसाबेलने 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म टिकटॉकवर एक व्हिडीओ शेअर केला होता आणि त्यासाठी बनवलेल्या नियमांची यादी स्पष्ट केली होती. बॅचलर पार्टीचे नियम शेअर केले होते. जे आता 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहेत. हे नियम विनोदाने बनवण्यात आल्याचे इसाबेलने सांगितले. तिची मंगेतर काही लहान मूल नाही, ज्याला हे सर्व समजावून सांगितले पाहिजे. तरीही हे नियम खूप सोपे आहेत जे त्यांचे भावी पती सहजपणे पाळू शकतात, तरीही मी हे दोन नियम बनवले आहेत, माझ्या पतीने त्यांचे पालन करावे आणि ज्या गोष्टींपासून दूर राहण्यास सांगितले आहे त्यापासून दूर राहावे अशी माझी इच्छा आहे.

इसाबेलने सर्वप्रथम तिच्या पतीला आक्षेपार्ह गोष्टींपासून दूर राहण्यास सांगितले, याशिवाय इसाबेलने तिच्या भावी पतीला संपूर्ण प्रवासादरम्यान स्वतःशी बोलण्यास सांगितले. यादीत पुढे, इसाबेलने तिच्या मंगेतरला मुलींच्या संपर्कात येऊ नका आणि त्यांच्यापासून दूर राहण्यास सांगितले. इसाबेलने तिच्या भावी पतीला नियमांमध्ये सांगितले, की तुम्ही मजा करू शकता; परंतु मी आणि माझे मित्र जे करतात त्यापेक्षा जास्त नाही. याशिवाय इसाबेलने तिच्या भावी पतीला पार्टीचे व्हिडीओ आणि फोटो पाठवण्यास सांगितले. आणि म्हणाली, की मी परत आल्यावर मला माझ्यासाठीही भेटवस्तू हव्या आहेत.नाही. याशिवाय इसाबेलने तिच्या भावी पतीला पार्टीचे व्हिडीओ आणि फोटो पाठवण्यास सांगितले. आणि म्हणाली, की मी परत आल्यावर मला माझ्यासाठीही भेटवस्तू हव्या आहेत.

# स्टंट पडला महागात!

लग्नाची मिरवणूक आणि लग्न हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. आपले लग्न कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्ण व्हावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते; पण जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या लग्नाच्या दिवशी पोलिसांनी पकडले तर? अशी घटना घडली आहे. पोलिसांनी एका वराला त्याच्या लग्नाच्या दिवशी पोलिसांनी पकडले तर? अशी घटना घडली आहे. पोलिसांनी एका वराला त्याच्या लग्नाची मिरवणूक काढताना रस्त्याच्या मध्येच थांबवले नाही, तर वराची गाडीही ताब्यात घेतली.



वरात निघाली, तेव्हा वर उत्साहात होता. उत्साहाच्या भरात तो लग्नाच्या मिरवणुकीच्या गाडीवर चढून स्टंट करू लागला. हायवेच्या मधोमध गाडीच्या छतावर उभे राहून तो स्टंट करीत होता आणि ड्रोनच्या सहाय्याने त्याचे शूट केले जात होते. पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिस प्रशासनाने तात्काळ कारवाई करत वराची गाडी जप्त केली. या वेळी वऱ्हाडी मंडळींनी पोलिसांशी चर्चा केली; परंतु पोलिसांनी कोणाचेही न ऐकून गाडी पोलिस ठाण्यात आणली. मीडिया रिपोर्टस्नुसार, अंकित नावाच्या व्यक्तीची लग्नाची मिरवणूक सहारनपूरच्या भायला गावातून मेरठच्या कुसावली गावात जात होती. त्यानंतर दिल्ली-डेहराडून महामार्गावर असलेल्या मन्सूरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वराने गाडीच्या छतावर चढून गोळी झाडण्याचा स्टंट सुरू केला. पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. वराकडून करण्यात येत असलेला स्टंट तात्काळ थांबवण्यात आला आणि गाडी पोलिसांनी ताब्यात घेतली. वऱ्हाडी मंडळी आणि पोलिसांमध्ये बराच वेळ वादावादी झाली; मात्र पोलिसांनी कोणाचेही न ऐकून कारवाई केली.



# कुत्र्यावरच्या प्रेमापोटी...

पाळीव प्राण्यांवर मालकांचं खूप प्रेम असतं. या मुक्या जीवांसाठी काहीही करायची त्यांची तयारी असते. अमेरिकेतल्या एका सीईओने आपल्या लाडक्या कुत्र्याचा जीव वाचवणाऱ्या डॉक्टरचे आभार मानण्यासाठी एक जाहिरात तयार केली आहे. या सीईओने जाहिरातीवर सहा दशलक्ष डॉलर्स म्हणजे ४२.८३ कोटी रुपये खर्च केले आहेत. या जाहिरातीचं प्रसारण सुपर बाउल फूटबॉल स्पर्धेदरम्यान केलं जाईल. ही स्पर्धा अमेरिकेत खूप लोकप्रिय आहे. चारचाकी वाहनासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंची निर्मिती करणाऱ्या 'वेदरटेक' या कंपनीचे सीईओ डेव्हिड मॅकलिन यांच्या 'स्काउट' नावाच्या कुत्र्याला ट्यूमरचं निदान झालं. यानंतर त्याच्या जिवंत राहण्याची शक्यता खूपच कमी होती. पण आज स्काउट रोगमुक्त झाला आहे. डेव्हिड यांनी स्काउटला वाचवण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला. मग गेल्या वर्षी जूनमध्ये त्याला 'युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉन्सिन स्कूल ऑफ वेटर्नरी मेडिसिन' इथे नेण्यात आलं. तिथे त्याला केमोथेरेपी, इम्युनोथेरेपी आणि रेडिएशन थेरेपी देण्यात आली. सप्टेंबर महिन्यात त्याच्या ट्यूमरचा आकार जवळपास ९० टक्क्यांनी कमी झाला आणि मग ट्यूमर काढून टाकण्यात आला. यामुळे स्काउट पूर्ण बरा झाला. यामुळे डॉक्टरांचे आभार मानण्यासोबतच प्राण्यांना होणाऱ्या आजारांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी तब्बल सहा दशलक्ष डॉलर्स खर्चून एक जाहिरात तयार केली.

# गुमनाम है कोई...

इजिप्तमध्ये असंख्य ममी आहेत. हजारो वर्षांपासूनच्या या ममी पिरॅमिडमध्ये जपून ठेवण्यात आल्या आहेत. या ममीज म्हणजे जगातलं एक आश्चर्यच म्हणता येईल. ममीवर आधारित बरेच चित्रपट आले. या चित्रपटांमधून बरंच काही भयावह दाखवण्यात आलं. ब्रिटनमध्येही असंच काही तरी घडलं. इथे एका पेटीत ममी ठेवली होती. या पेटीतून चित्रविचित्र आवाज यायला सुरूवात झाली. मग शास्त्रज्ञांनी हा आवाज ध्वनिमुद्रित करायचा निर्णय घेतला. रेकॉर्ड झालेला हा आवाज ऐकून शास्त्रज्ञांनाही धक्काच बसला. ब्रिटनमधल्या लीड्स सीटी म्युझियममध्ये एक ममी ठेवण्यात आली आहे. निसियामून असं या ममीचं नाव आहे.



ही ममी तीन हजार वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं. इजिप्तचा राजा फॅरो रामसेस ११ च्या दरबारात काम करणाऱ्या एका पुजाऱ्याची ही ममी असल्याचं बोललं जातं. हा पुजारी राजासाठी खबरी म्हणून काम करायचा. तसंच तो त्याला धार्मिक गाणीही ऐकवायचा. या ममीच्या वरून हवा गेल्यानंतर तिच्या तोंडातून विचित्र आवाज येत असे. हे बघून शास्त्रज्ञांची उत्सुकता चाळवली. त्यांनी हा आवाज रेकॉर्ड करायचं ठरवलं. मग त्यांनी ममीच्या गळ्याचं सीटी स्कॅन केलं. मग थ्रीडी प्रिंटर तंत्रज्ञानाने ममीचं स्वरयंत्र तयार केलं. मग ममीच्या गळ्यातून आवाज काढण्यात आला. त्यावेळी ममीच्या गळ्यातून कण्हण्याचा आवाज आला. ममीवरून हवा गेल्यानंतर येणाऱ्या आवाजाशी हा आवाज तंतोतंत जुळला. ममीच्या जीभेचा काही भाग गायब असल्याचं सीटी स्कॅन दरम्यान लक्षात आलं. गेल्या तीन हजार वर्षांमध्ये ममीची जीभ सडून गेल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सध्या या आवाजाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.



'चेन्नई सुपर किंग्सचा जर इतिहास पाहिला, तर फिरकी आक्रमण असणं हे खूप महत्त्वाचं ठरतं. कारण जेव्हाही चेन्नई सुपर किंग्स आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करते, तेव्हा मधल्या षटकांमध्ये त्यांचे फिरकी गोलंदाजांचं जाळ जेवढं चांगलं विनलं जातं, तेवढ्या चांगल्या प्रकारे चेन्नईला ते सामने सहज जातात. 'मधल्या षटकात गोलंदाजी करणारे फिरकीपटू आणि यष्टीमागील धोनी, हे एक चेन्नईसाठी विजय मिळवून देणारे कॉम्बिनेशन आहे. त्यामुळे मला वाटतं धोनीला स्टम्पमागून "जर सामना जिंकवायचा असेल, तर फिरकीपटू खूप महत्त्वाचे ठरतात. खास करून चेन्नईतील खेळपट्टीवर. त्यामुळे त्यांनी संघ बांधणी करताना तशी केली आहे, ज्यात अष्टपैलू खेळाडू आणि फिरकीपटू आहेत.' 'मला वाटतं की रचिन असा खेळाडू आहे, ज्याची प्रतिभा पाहाता फलंदाजी क्रमवारीने त्याला फरक पडणार नाही. हा हंगाम त्याच्यासाठी खूप महत्त्वाचा ठरेल.

— केदार जाधव

# हैदराबादचा मोठा विजय

## किशनचं शतक; हेड, क्लासेन, नितीशने चोपलं!



इशान किशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने घरच्या मैदानावर दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांनी रविवारी (२३ मार्च) राजस्थान रॉयल्सला ४४ धावांनी पराभवाचा धक्का दिला. यासह गेल्यावेळच्या उपविजेत्या हैदराबादने यंदाच्या हंगामाची सुरुवात विजयाने केली आहे. हैदराबादसाठी त्यांची वादळी फलंदाजी विजयासाठी महत्त्वाची ठरली.

रविवारी झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्ससमोर विक्रमी २८७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सला २० षटकात ६ बाद २४२ धावाच करता आल्या. राजस्थानकडून इम्पॅक्ट प्लेअर म्हणून उतरलेल्या संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांनी चांगली झुंज दिली. पण त्यांचे प्रयत्न तोकडे ठरले.

या सामन्यात राजस्थानने २८७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वालची विकेट दुसऱ्याच षटकात गमावली. जैस्वालला १ धावेवर सिमरजीत सिंगने अभिनव मनोहरच्या हातून झेलबाद केले. पाठोपाठ याच षटकात कर्णधार रियान परागही ४ धावा करून पॅट कमिन्सकडे झेल देत माघारी परतला. नितीश राणाने सॅमसनची साथ देण्याचा प्रयत्न केला. पण त्याला ५ व्या षटकात ११ धावांवर मोहम्मद शमीने कमिन्सच्या हातून झेलबाद केले. पण नंतर संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांनी आक्रमक खेळताना शतकी भागीदारी केली. त्यांनी अर्धशतकेही केली. त्यांच्या भागीदारीमुळे राजस्थानच्या आशा जाग्या झाल्या होत्या. परंतु, संजू सॅमसनला १४ व्या षटकात हर्षल पटेलने यष्टीरक्षक हेन्रिक क्लासेनच्या हातून झेलबाद केले. संजू सॅमसनने ३७ चेंडूत ७ चौकार आणि ४ षटकारांसह ६६ धावांची खेळी केली. पुढच्याच षटकात ध्रुव जुरेलला ॲडम झाम्पाने इशान किशनच्या हातून झेलबाद केले. ध्रुव जुरेलने ३५ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह ७० धावांची खेळी केली. नंतर शिमरॉन हेटमायर आणि शुभम दुबे यांनीही आक्रमक खेळ केला. पण तोपर्यंत उशीर झाला होता. हेटमायर शेवटच्या षटकात २३ चेंडूत ४२ धावा करून बाद झाला. पहिला संघ

तसेच टी२० क्रिकेटमध्ये तीनवेळा २७५ धावांचा टप्पा पार करणारा हैदराबाद पहिला संघ ठरला आहे. तसेच २५० धावांचा टप्पा पार करण्याची हैदराबादची ही चौथी वेळ आहे.

## डेव्हिड वॉर्नर एअर इंडियावर संतापला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ला सुरूवात झाली असून या हंगामात स्फोटक फलंदाड डेव्हिड वॉर्नर खेळाताना दिसणार नाही. असे असले तरी वॉर्नर सध्या चांगलाच चर्चेत आहे. मात्र याचा क्रिकेटशी काही संबंध नाही. ३८ वर्षीय फलंदाज वॉर्नरने त्याला विमान प्रवासात सहन कराव्या मनस्तापाबद्दल एअर इंडियाबद्दल संताप व्यक्त केला आहे. वॉर्नर पायलटच नसलेल्या विमानात चढला, त्यामुळे त्याला बराच वेळ वाट पाहावी लागली. यानंतर त्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट करत संताप व्यक्त केला आहे.

वॉर्नरने लिहिले, "एअर इंडिया आम्ही एका विमानात बसलो आहोत ज्यामध्ये वैमानिक नाहीत आणि कित्येक तास विमानात वाट पाहत आहोत. तुमच्याकडे वैमानिक नाहीत हे माहीत असूनही तुम्ही प्रवाशांना विमानात का बसवाता?" एअर इंडियाने एक निवेदन जारी करून बंगळुरूमधील खराब हवामानामुळे विमान उड्डाणाला उशीर झाल्याचे म्हटले आहे.

## नेमबाजीत एक दशांश गुणाने स्वरूपने मारली बाजी



**पुणे :** खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या नेमबाजीतील लढतीत महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकरने एक दशांश गुणाने सुवर्णपदकावर नाव कोरले. 10 मीटर रायफल नेमबाजीतील एस एच 1 प्रकारात स्वरूपसोबत कविन केगनाळकरने रूपेरी यश संपादन केले. डॉ. कर्णीसिंग शूटिंग रेंजवर सुरू असलेल्या नेमबाजीत स्पर्धेतील पहिल्याच अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या डबल धमाका पहाण्यास मिळाला. 10 मीटर रायफल नेमबाजीतील एस एच 1 प्रकारात पात्रता फेरीत कोल्हापूरचा स्वरूप उन्हाळकर चौथा स्थानावर होता. अंतिम लढतीत अनुभव संपन्न स्वरूपने 16 व्या फेरीपर्यंत प्रथम स्थानावर आघाडी घेतली होती. 17 व्या फेरीत 9.1 गुणांमुळे तो चौथा स्थानावर फेकला गेला. तर अनपेक्षितपणे चौथ्या स्थानावर असणारा 15 वर्षीय कविन केगनाळकरने पहिल्या स्थानी मुसंडी मारली. पदक निश्चित करणाऱ्या 20 व्या फेरीत स्वरूपने आपल्या लौकिकला साजेसा खेळ करीत पुन्हा आघाडी घेत दुसरे स्थान प्राप्त केले. शेवटच्या 23 व 24 फेरीत सुवर्णपदकासाठी महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकर व कविन केगनाळकरमध्ये कमालीची झुंज दिसून आली. 224.2 गुणांसह कविन आघाडीवर तर पाईंट 1 गुणांनी स्वरूप दुसऱ्या स्थानावर होता. 23 व्या फेरीत गुणांची बरोबरी करीत अखेरच्या 24 व्या फेरीत 10.7 गुणांचा अचूक वेध घेत अवघ्या एका गुणांनी स्परूपने बाजी मारली. कोल्हापूरचा स्वरूप उन्हाळकरने सलग दुसऱ्यांदा खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला. पॅरीस ऑलिम्पिकपटू असणाऱ्या स्वरूप हा स्पर्धेतील प्रमुख दावेदार होता. पुण्यातील बालेवाडी स्टेडियममधील कसून सरावामुळे पुन्हा यश हाती आले असे सांगून स्वरूप पुढे म्हणाले की, पॅरीसमधील अपयश मागे टाकून या पदकापासून नवी सुरूवात झाली आहे. आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिक पदक हेच माझे स्वप्न आहे.

## एम.एस.धोनी वयाच्या पन्नाशीपर्यंत आयपीएल खेळणार?

**नवी दिल्ली :** चेन्नई सुपर किंग्ज संघ इंडियन प्रिमिअर लीगच्या १८ व्या हंगामातील पहिल्या सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी मानल्या जाणाऱ्या मुंबई



इंडियन्स विरूद्ध भिडणार आहे. सीएसकेच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच चेपॉकवर हा सामना रंगणार आहे. पण प्रत्येक हंगामातील सिएसकेच्या पहिल्या सामन्यापूर्वी एक चर्चा नेहमीच होते की माजी कर्णधार एमएस धोनी निवृत्ती घेणार का? यावरून अने तर्क लावले जातात. पण यावेळी चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाडनेच धोनीच्या आयपीएलमधील भविष्यावर भाष्य केलं आहे. काल मुंबईविरूद्धच्या सामन्याआधी झालेल्या पत्रकार परिषदेत ऋतुराजने ४३ वर्षीय धोनीच्या रणनितीबद्दल सांगितले. ऋतुराज म्हणाला, " मला वाटतं की त्याचा सराव हा त्याला जे काही साध्य करायचे आहे. त्यापुरता मर्यादित असतो. म्हणून, त्याचा प्लॅन अगदी सोपा असतो, शक्य तितके षटकार मारण्यावर व सर्वोत्तम फॉर्ममध्ये राहण्यावर त्यावे लक्ष केंद्रित केले आहे." ऋतुराज धोनीच्या आयपीएल निवृत्तीबद्दल भाष्य करताना म्हणाला की, "मला पहिल्या दिवसापासून कधीच वाटले नाही की तो तंदुरुस्त नाही. म्हणून, मला वाटतं की तो नक्कीच खास आहे. तो इतक्या वर्षांपासून क्रिकेट खेळत आहे. त्यामुळे तो नक्कीच तंदुरूस्त असेल.

## मेस्सीशिवाय मिळवला उरुग्वेविरूद्ध विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सुपरस्टार लिओनेल मेस्सी आणि लौतारो मार्टिनेझ यांच्या अनुपस्थितीतही विश्वविजेत्या अर्जेंटिनाने दक्षिण अमेरिका विश्वकरंडक फुटबॉल पात्रता गटात उरुग्वेचा १-० असा पराभव केला. अर्जेंटिनाच्या थियागो अल्माडा याने गोलपोस्टच्या कोपऱ्यावरून गोलाकार आणि ताकदवर कीक मारून केलेला गोल सामन्यातील निर्णायक ठरला. येत्या विश्वकरंडक स्पर्धेसाठी थेट पात्र ठरण्याकरिता अर्जेंटिना आता केवळ एक गुण दूर आहे.

या दक्षिण अमेरिका गटात अर्जेंटिनाने १३ सामन्यांतून २८ गुणांची कमाई करून अव्वल स्थान कायम राखले आहे. येत्या मंगळवारी त्यांचा ब्राझीलविरुद्ध सामना होत आहे. या सामन्यात बरोबरी साधली तरी ते पुढील वर्षी होणाऱ्या विश्वकरंडक स्पर्धेस पात्र ठरतील. या गटातील अजून पाच साखळी सामने शिल्लक आहेत.

या अगोदर अर्जेंटिना आणि उरुग्वे यांच्यात रिओ दि जानेरो येथे सामना झाला होता त्या लढतीतही अर्जेंटिनाने १-० विजय मिळवला होता. या दक्षिण अमेरिका गटात इक्वेडोरने वेनेंझुला संघावर २-१ अशी मात केली आणि दुसऱ्या स्थानावर प्रगती केली होती. २१ गुणांवर ब्राझीलचा संघ तिसऱ्या स्थानावर आहे. उरुग्वे आणि पॅराग्वेपेक्षा एकाच गुणाची त्यांच्याकडे आघाडी आहे. कोलंबिया १९ गुणांसह सहाव्या क्रमांकावर आहे.

## पुण्याचा सुहास घोडके ठरला

### महाराष्ट्र कुस्ती महा-वीर किताबाचा मानकरी





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे येथील सुहास घोडके आणि कुर्डूवाडी चा प्रमोद सुळ यांच्यातील चुरशीच्या लढतीत सुहास घोडके यांने ५-० अंकाने महाराष्ट्र कुस्ती महा-वीर हा खुल्या गटातील किताब मिळविला. सव्वा लाख रुपये रोख, चांदीची गदा, सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड स्मृती राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महा-वीर स्पर्धा रामेश्वर (रुई) येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा गेल्या १८ वर्षापासून भरविण्यात येत आहेत. प्रमोद सुळ यांनी उपविजेते पद मिळविले. त्यांना रौप्यपदक व रोख रुपये १ लाखाचे पारितोषिक देण्यात आले. जामखेड येथील सागर मोहोळकर यांला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. त्याला रुपये ५० हजार रोख व कांस्य पदक देण्यात आले. चतुर्थ क्रमांकावर सोलापूर येथील कालीचरण सोलणकर याला २५ हजार रूपये रोख व पदक देण्यात आले. या स्पर्धेत एकूण २०० पेक्षा अधिक मल्लांनी भाग घेतला होता.

हिंद केसरी दीनानाथ सिंग, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते विजेत्यां मल्लांना पारितोषिक देण्यात आले. यावेळी वस्ताद पै. निखिल वणवे उपस्थित होते.

## विराटने ४०० व्या सामन्यात 'क्लास' दाखवला



**कोलकाता :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेची सुरूवात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने रजत पाटीदारच्या नेतृत्वात दणक्यात केली आहे. पहिल्याच सामन्यात गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सला त्यांच्याच घरच्या मैदानात पराभवाचा धक्का त्यांनी दिला. बंगळुरूने ईडन गार्डन्सला झालेला हा सामना ७ विकेट्सने जिंकला. या सामन्यात कोलकाताने बंगळुरूसमोर १७५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. हे लक्ष्य बंगळुरूने १६.२ षटकात १७७ धावा करत पूर्ण केले. गेल्यावर्षी कोलकाताकडून खेळलेला फिल सॉल्टने यंदा मात्र बंगळुरूसाठी शानदार सुरुवात करून दिली. विराट कोहलीचाही फॉर्म कायम पाहायला मिळाला. १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी बंगळुरूकडून नवी सलामी जोडी फिल सॉल्ट आणि विराट कोहली उतरले. विराटने सुरुवातीला सॉल्टची साथ दिली. कारण दुसऱ्या बाजूने सॉल्ट कोलकाताच्या गोलंदाजांवर हल्ला करत होता. त्याने आक्रमक खेळ करत अर्धशतकही झळकावलं. त्यामुळे ९ षटकाच्या आतच बंगळुरूच्या ९० धावा पार झाल्या होत्या. मात्र सॉल्टला अखेर वरुण चक्रवर्तीने ९ व्या षटकात स्पेन्सर जॉन्सनच्या हातून झेलबाद करत माघारी धाडले. सॉल्टने ३१ चेंडूत ५६ धावांची खेळी केली.

## ओम रामगुडे, आशी दलाल, प्रितिका नंदी, रेयांश यादव, मितांश देशमुख, वरद मोरे यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नॉलेज बेस अकादमी यांच्या वतीने आयोजित केबीएज पहिल्या महिला व विविध वयोगटातील रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत ओम रामगुडे, आशी दलाल, प्रितिका नंदी, रेयांश यादव, मितांश देशमुख, वरद मोरे यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.



इचलकरंजी हॉल, महर्षी स्त्रीशिक्षण संस्था, कर्वेनगर पुणे येथे पार पडलेल्या या स्पर्धेत सहाव्या फेरीत पुरुष खुल्या गटात पहिल्या पटावरील लढतीत ओम रामगुडेने भुवन शितोळेला बरोबरीत रोखेल व 5.5 गुणांसह विजेतेपदाचा मान पटकावला. ओमने स्कॉच पद्धतीने डावास सुरुवात केली व १० चालींमध्ये बरोबरीत रोखले. ओम हा लेक्सीकन इंटरनॅशनल शाळेत पाचवी इयत्तेत शिकत आहे. महिला गटात आशी दलालने धनश्री कस्तुरीचा पराभव करून 5 गुणांसह विजेतेपदावर आपले नाव कोरले. आशी हिने स्कॅडन एव्हीएन पद्धतीने डावास सुरुवात करून धनश्रीवर ३५ चालींमध्ये मात केली. अशी हि लॉ कॉलेज येथे एलएलबीचे शिक्षण घेत आहे. 8 वर्षाखालील गटात प्रितिका नंदीने दिवीत सीचा पराभव करून 6 गुणांसह विजेतेपद पटकावले. प्रितिका ही भारती विद्यापीठ शाळेत तिसरी इयत्तेत शिकत आहे. 10 वर्षाखालील गटात पहिल्या पटावर रेयांश यादवने सर्वज्ञ बालगुडेचा पराभव करून 5 गुणांसह विजेतेपद पटकावले.

12 वर्षाखालील गटात मितांश देशमुखने चिराग रेड्डीला बरोबरीत रोखले व 5 गुणांसह विजेतेपदाला गवसणी घातली.मितांश हा २१ के शाळेत सहावी इयत्तेत शिकत आहे. 15 वर्षाखालील गटात वरद मोरेने अनिक भट्टाचार्यला बरोबरीत रोखले व 5 गुणांसह विजेतेपद मिळवले. वरद हा सिंहगड स्प्रिंग डेल शाळेत सातवी इयत्तेत शिकत आहे.

## विराटचं अर्धशतक होताच चाहता घुसला मैदानात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** आयपीएलच्या १८व्या हंगामाला दणक्यात सुरूवात झाली आहे. आरसीबीने गतविजेत्या केकेआरचा पराभव करत विजयाने मोहिमेचा श्रीगणेशा केला. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या पहिल्या सामन्यात आरसीबी संघाचे पूर्ण वर्चस्व दिसून आले, ज्यात त्यांनी ७ विकेट राखून विजय मिळवला. सामन्याच्या सुरुवातीला केकेआरने नक्कीच थोडा आक्रमक खेळ केला, पण आरसीबीने दणक्यात सामन्यात पुनरागमन केलं आणि विजय मिळवून शेवट केला.

आरसीबीने केवळ १६.२ षटकांत लक्ष्याचा पाठलाग करत विजय नोंदवला. यामध्ये संघाचा चेस मास्टर विराट कोहलीने आपल्या ५९ धावांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. या सामन्यात कोहलीने ३१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण करताच अचानक त्याचा एक चाहता मैदानात घुसल्याने खेळ काही काळ थांबवावा लागला. चाहता मैदानात घुसताच त्याने विराटसमोर थेट लोटांगण घातलं. केकेआरने दिलेल्या १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आरसीबीची नवी सलामी जोडी विराट कोहली आणि फिल सॉल्ट उतरली.

## टेनिस स्पर्धेत रियान पाटील, अर्जुन देशपांडे, विहान देवधरे, चिन्मय पाठक यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे व केपीआयटी व सोलींको प्रायोजित 8,10वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील पीएमडीटीए मानांकन आयटीए करंडक टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज 2025 स्पर्धेत रियान पाटील, अर्जुन देशपांडे, विहान देवधरे, चिन्मय पाठक यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.





इंटेंसिटी टेनिस अकादमी, कपिला रिसॉर्ट, खराडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या फेरीत 10 वर्षाखालील मुलांच्या गटात सातव्या मानांकित रियान पाटीलने सानप मल्हारचा टायब्रेकमध्ये 5-4(0) असा तर, अर्जुन देशपांडेने ईशान जेएसचा 5-4(5) असा संघर्षपूर्ण पराभव केला.सहाव्या मानांकित कार्तिकेय सुराने जयवीर सिंघवीवर 5-3 असा विजय मिळवला.

विहान देवधरेने अनय तांबेचा 5-1 असा तर, चिन्मय पाठकने वीर सावंतचा 5-2 असा पराभव करून आगेकूच केली.

## बीबीएसएम क्रिकेट लीग २०२५

# पार्थदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिकेट स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** युवा नेते पार्थदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त माजी स्थायी समिती अध्यक्ष बाबुराव चांदेरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष समीर चांदेरे यांच्या वतीने आयोजित BBSM सोसायटी क्रिकेट लीग 2025 या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाबुराव चांदेरे, सरला बाबुराव चांदेरे, राहुल बालवडकर यांच्या शुभहस्ते पार पडला.

या स्पर्धेच्या अनोख्या प्रवासाला सुरुवात करताना पुणे




शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री.राहुल दादा बालवडकर, पुरुष आयोजन समितीचे अध्यक्ष अमोलभाऊ भोरे, महिला आयोजन समितीच्या अध्यक्षा सौ. पूजा चांदेरे, पुणे शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या सरचिटणीस सौ अक्षता ताई मंगेश विधाते तसेच आयोजन समितीचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत सहभागी सर्व सोसायटी संघांना अधिकृत किट वाटप करण्यात आले.

प्रत्येक संघाच्या २० खेळाडूंसाठी खास डिझाइन केलेल्या जर्सीचा हा सोहळा म्हणजे क्रिकेटप्रेमींसाठी मोठी पर्वणीच! मैदानावर रंगणार्या या रोमांचक स्पर्धेसाठी सुस, बाणेर, बालेवाडी आणि म्हाळुंगेतील खेळाडूंमध्ये उत्साहाचं वातावरण आहे.या उद्घाटन समारंभावेळी क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"युवा नेते पार्थदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त BBSM सोसायटी क्रिकेट लीग 2025 चे आयोजन करताना खूप आनंद होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सुस, बाणेर, बालेवाडी आणि म्हाळुंगेतील सोसायटीतील नागरिकांना आपली क्रिकेटमधील प्रतिभा दाखवण्याची संधी मिळणार आहे. मला विश्वास आहे की, ही स्पर्धा नक्कीच यशस्वी होईल आणि या भागातील क्रिकेटला एक नवी दिशा देईल." – समीर चांदेरे (युवक अध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पुणे शहर)

#रा